सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, १६ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १७५ | पाने : ८ | किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मुख्यमंत्री योजनादूत अर्ज करण्यास १७ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ!

### रायगड जिल्ह्यात १२४०पदवीधर उमेदवारांना संधी

अलिबाग : शासनाच्या विविध योजनांची सर्वसामान्य नागरिकांना माहिती देण्यासाठी मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी मुदतवाढ देण्यात आलेली असून, आता १७ सप्टेंबरपर्यंत नोंदणी अर्ज करता येणार आहे.

रायगड जिल्ह्यात १२४० योजनादूतांची नेमणूक करण्यात येणार असून, इच्छुक उमेदवारांनी www.mahayojanadoot.org या संकेतस्थळावर तात्काळ अर्ज करावेत असे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत मुख्यमंत्री योजनादूत उपक्रम राबविण्यात येत आहे. प्रत्येक ग्रामपंचायत पातळीवर एक आणि शहरी भागात प्रत्येकी पाच हजार लोकसंख्येमागे एक अशा पद्धतीने राज्यात एकूण ५० हजार योजनादूतांची सहा महिन्यांसाठी निवड केली जाणार आहे. या योजनादुतांना दरमहा १० हजार रूपये मानधन दिले जाणार आहे. हे योजनादूत शासनाच्या लोककल्याणकारी योजनांबाबत नागरिकांना माहिती देतील. या उपक्रमासाठी आतापर्यंत १ लाख ६६ हजारांहून अधिक उमेदवारांनी नोंदणी केली आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी इच्छुक उमेदवार १८ ते ३५ वयोगटातील असावा, उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असणे आवश्यक आहे, उमेदवाराकडे महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. उमेदवारास संगणक ज्ञान असावे. त्याच्याकडे अद्ययावत मोबाईल (स्मार्ट फोन) आणि आधारसंलग्न बँक खाते असणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री योजनादूत उपक्रमासाठी केलेला ऑनलाईन अर्ज, आधार कार्ड, पदवी उत्तीर्ण असल्याबाबतची पुराव्यादाखल कागदपत्रे / प्रमाणपत्र इत्यादी अवासाचा दाखला, उमेदवाराकडे आधार जोडणी असलेल्या बँक खात्याचा पुरावा, पासपोर्ट आकाराचा फोटो, हमीपत्र (ऑनलाईन अर्जासोबतच्या नमुन्यामधील) नियुक्तीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

# विलंबाने न्याय मिळत असेल तर तो न्याय नाकारलेला बरा : उद्धव ठाकरे



तभा वृत्तसेवा

पैठण दि १५ :- आमदारांची पक्ष विरोधी भूमिका तसेच शिवसेना पक्षा बाबत उच्च न्यायालयात सुरू असलेल्या प्रकरणात लवकर न्याय मिळत नसल्याने तो न्याय नाकारलेला बरा असे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे म्हणाले.संत एकनाथ सहकारी कारखाण्यावर चेअरमन सचिन भैय्या घायाळ आयोजित भव्य जनसंवाद मेळावा तसेच पक्ष प्रवेश सोहळ्याप्रसंगी उपस्थित जनसामुदायला संबोधतांना ठाकरे बोलत होते.

देशाचे गृहमंत्री गणेशोत्सववात मुंबईला आले असता ते सरन्यायाधीश यांच्याकडे आरतीला गेले. त्यामुळे कदाचित आम्हाला तारीख पे तारीख तर मिळत नाही ना असा सवाल यावेळी ठाकरे यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्री असतांना आपण पैठणला संतपीठ,नवीन पाणीपुरवठा योजना ,संत ज्ञानेश्वर उद्यान सुरू तसेच ग्रामीण भागासाठी अनेक योजना सुरू करण्यासाठी निधी दिला. सत्ता असो वा नसो ठाकरे ब्रॅण्ड जनसेवेचे काम करतच राहणार,पैठण मधून पक्ष विरोधी झालेले काम पैठणकरांनी संपुष्टात आणावे असे उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले.संत एकनाथ सहकारी साखर कारखाण्याचे चेअरमन सीए सचिनभैय्या घायाळ यांनी आपल्या असंख्य समर्थाकासह शिवसेनेत प्रवेश केल्यावर. जसा महाभारतात सचिन होता तसाच सचिन आम्हाला भेटला असल्याचे यावेळी शिवसेना नेते संजय राऊत म्हणाले या मेळाव्याला शिवसेना नेते चंद्रकांत खैरे,विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे, संपर्क प्रमुख विनोद घोसाळकर,आमदार मिलिंद नार्वेकर, उदयसिंग राजपूत,तालुकाध्यक्ष मनोज पेरे सह हजारोंच्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते.

**कारखाना कामगार पुत्र असल्याने आपण अडचणीच्या काळात कारखाना चालवायला घेतला आणि कारखान्याची मरगळलेली परिस्थिती बदलत आज कारखाना संभाजीनगर जिल्ह्यात उसाला सर्वात जास्त दर देत आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या हस्ते झालेले इथेनॉल, वीज निर्मिती प्रकल्प, दाणेदार पोटॅश खते, भव्य मंगल कार्यालयात,डीसलरी, बिसलरी,सीएनजी निर्मिती प्रकल्प लवकरच पूर्णत्वास नेऊन भावी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते त्याचे लोकार्पण करू असे यावेळी चेअरमन सीए सचिन घायाळ म्हणाले,यावेळी घायाळ यांनी खासदार भुमरे यांच्यावर जोरदार टीका केली. विविध उदघाटणाबाबत परवानगी मागणाऱ्या लोंकांनी सभेला जमलेली जनशक्ती पाहून आत्मपरीक्षण करावे असे यावेळी घायाळ म्हणाले.संचाकल आबासाहेब मोरे भाऊसाहेब पिसे, एकनाथ नवले, विक्रम काका घायाळ, भारत घायाळ, कचरू बोबडे, गणेश घायाळ, शिवाजी जाधव, बाबासाहेब खराद,गणेश झिने,रामेश्वर घायाळ, सुरेश थोरात, रवींद्र बोडखे ,बाबासाहेब शिंदे, गणेश पवार, सुनिल घायाळ, अमोल घायाळ, गणेश घायाळ,कामगार अध्यक्ष काकासाहेब गोरे आदींसह शेकडो कार्यकर्त्यांनी यावेळी उ बा ठा शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.**

# हवाई प्रवाशांचा संताप!

### ६ तासांच्या विलंबानंतर मुंबई-दोहा इंडिगो विमान रद्द




मुंबई : मुंबईतील इंडिगो एअरलाईन्सबाबत सातत्याने नवनवीन अपडेट्स समोर येत असतात. अशातच आज इंडिगो विमानतळावर हवाई प्रवाशांचा मोठा खोळंबा झाल्याची माहिती मिळत आहे. मुंबइहून दोहा-कतारला जाणारे इंडिगोचे विमान तब्बल ६ तासानंतर रद्द करण्यात आले. त्यामुळे या विमानाने प्रवास करणाऱ्या प्रवाशांनी इंडिगोबाबत तीव्र संताप व्यक्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज पहाटे ३ वाजून ५५ मिनिटांच्या सुमारास उड्डाण करणार होते. मात्र विमानात झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे हे विमान ६ तासांनंतर रद्द करण्यात आले. या विमानात २०० ते ३०० प्रवासी होते. प्रवाशांना विमानात चढवल्यानंतर विमान तासनतास विमानतळावरच उभे होते. सुमारे ५ तास प्रवाशांनी विमान उड्डाण होण्याची वाट पाहिली तसेच त्यांना विमानातून उतरण्याची परवानगी देखील दिली नव्हती. परंतु प्रवाशांचा संताप वाढल्यावर क्रू मेंबर्सनी त्यांना फ्लाइटमधून उतरण्याची परवानगी दिली आणि इमिग्रेशन वेटिंग एरियामध्ये नेले. तांत्रिक बिघाडामुळे उड्डाण रद्द करण्यात आल्याचे इंडिगोने म्हटले.प्रवाशाने असा दावा केला की, या काळात त्याला पाणी आणि अन्नही मिळाले नाही.

इंडिगो एअरलाइन्सने या प्रकाराबाबत एक निवेदन जारी केले आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, 'आम्ही विमान एकदा किंवा दोनदा उतरण्याचा प्रयत्न केला, परंतु यश आले नाही. त्यामुळे आम्ही फ्लाइट रद्द केली आहे. पुढील फ्लाइटसाठी रिबुकिंग केले जात आहे. तसेच विमानतळावरील आमच्या टीमने त्यांना खाद्यपदार्थ पुरवले आणि प्रत्येक गरजेमध्ये मदत केली. प्रवाशांसाठी हॉटेल्सही बुक केली जात आहेत'.

# याद राखा आमच्या कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल कराल तर : रावसाहेब दानवे

सिल्लोड : शिवना येथे गणेश मंडळातील युवकांवर पालकमंत्र्यांनी अब्दुल सत्तार यांच्या दबावापोटी दाखल झालेले गुन्हे मागे घेण्यासाठी अजिंठा येथे रास्ता रोको शिवना येथे लावतण्यांच्या नावावर अश्लिल भाषा वापरुन कार्यक्रम ठेवुन तो थांबवणार्या युवकांवर राजकीय दबावाखाली खोटे गुन्हे दाखल करून युवकांना अडचणीत आणणार्या मंत्री अब्दुल सत्तार व दबावाखाली पोलीस प्रशासनाने गुन्हे दाखल केल्यामुळे रास्ता रोको व निषेध करण्यात आला गणपती उत्सवाच्या ठीकाणी नृत्याच्या नावाखाली अश्लील कृत्य करायचे व थांबवण्यासाठी गेलेल्या युवकांवर खोटे गुन्हे दाखल करायचा सपाटा अब्दुल सत्तार यांनी केला आहे.

कार्यक्रमात काय घडल...?

शिवना ता सिल्लोड येथे गणपती उत्सवात मंत्री अब्दुल सत्तार यांनी लावण्यांचा कार्यक्रम आयोजित केला होता , त्यात महिला भगिनींसमोर अश्लील नृत्य ,गाणी वाजवली इतक्यावरच ते शांत बसले नाही तर अँकर ने महिलांना सांगितल जी महिला चांगली शिटी वाजवेल तिला १०१रू बक्षीस देण्यात येईल यावरुन काही युवकांनी हे रोखायला सांगितल असता ,त्यांच्यावर दमदाटी करुन वाद घातला व राजकिय दबावापोटी अब्दुल सत्तार यांनी पोलीस निरीक्षक अमोल ढाकणे यांनी भाजपा नेते अरुण काळे यांच्यासह शिक्षण घेणार्या ३०,३२ युवकांवरगुन्हे दाखल केले,व मंत्री अब्दुल सत्तार यांच्या कार्यकर्त्यांची नावे वगळले ,या



सर्व प्रकारामुळे पंचक्रोशीतील नागरिक अंत्यत रोषात असल्यामुळे हजारोंच्या संख्येने आज मंत्री सत्तार ,व पोलीस निरीक्षक ढाकणे यांच्याविरोधात रास्ता रोको ,निषेध मोर्चा ला माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे सुद्धा उपस्थित होते.यासह भाजपा प्रदेश चिटणीस सुरेश बनकर, भाजपा अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इद्रिस मुलतानी, माजी आमदार सांडु पा लोखंडे, तालुकाध्यक्ष अशोक गरुड, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुनिल मिरकर,दिलीप काका दाणेकर, भाजपा किसान मोर्चा प्रदेश सरचिटणीस सुभाष मानकर,पुष्पाताई काळे ,अशोक तायडे,जि प सदस्य गजानन राऊत,माजी जि प सदस्य दिपाली काळे,जि प सदस्य गणेश बनकर ,पंचायत समिती सदस्य अनिल खरात ,शहराध्यक्ष कमलेश कटारिया, मनोज मोरेल्लु, मधुकर राऊत, किशोर जगताप,मेघराज चौंडीये, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष विजय वानखेडे, सरपंच ज्ञानेश्वर जाधव,साहेबराव बांबर्डे ,प्रकाश गाडेकर ,विठ्ठल वानखेडे,संजय अपार राजेंद्र दांडगे,रमेश जाधव ,आत्माराम पाडळे ,सुभाष जेठर ,अण्णा तांगडे ,अनिल काळे ,डॉं राहुल धनवई ,रघुनाथ वाघ,कौशल्याबाई वाघ ,अंकुश सपकाळ ,प्रमोद सपकाळ ,योगेश सपकाळ,बालाजी लोखंडे ,नाटुबा काळे ,विकास मोरे,साहेबराव दांडगे,राजु कालभिले ,अमोल काळे,सुर्यभान बनसोड ,अजिनाथ भिंगारे ,नारायण खोमणे,अंबादास सपकाळ ,सांडु लोखंडे,त्रिंबक सोनवणे ,प्रकाश शिंदे ,विकास मुळे, संतोष जाधव ,अंकुश कोठाळे ,सुभाष जेठर ,कृष्णा उखर्डे आदिंसह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार विलास काळे यांनी मांडले .निवेदन स उपअधिक्षक लांजेवार साहेब ,उपविभागीय अधिकारी कोल्हे साहेब यांनी स्विकारले.

# शेतकऱ्यांच्या हितासाठी सर्वतोपरी प्रयत्न करून निर्णय घेतले जातील!

### पंतप्रधानांनी एक्स पोस्टवर लिहून दिली माहिती

नवी दिल्ली : शेतकऱ्यांचे उत्पन्न आणि ग्रामीण रोजगार वाढवून शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी सरकार वचनबध्द आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

कृषी उत्पन्न आणि ग्रामीण रोजगार वाढविण्याच्या उद्देशाने नुकत्याच घेतलेल्या निर्णयांवर प्रकाश टाकताना पंतप्रधान म्हणाले की, कांद्यावरील निर्यात शुल्क कमी करणे असो किंवा खाद्यतेलांवरील आयात शुल्क वाढवणे असो, अशा निर्णयांमुळे आपल्या अन्नदात्यांना मोठा फायदा होणार आहे. या निर्णयांमुळे त्यांचे उत्पन्न वाढणार आहे, त्याचबरोबर ग्रामीण भागात रोजगाराच्या संधीही वाढणार आहेत.

पंतप्रधानांनी एक्स पोस्टवर काय लिहिले?

'देशाच्या खाद्य सुरक्षेसाठी रात्रंदिवस परिश्रम करणा-या आपल्या शेतकरी बंधू-भगिनींचे हित साधण्यासाठी आमचे सरकार कोणतीही कसर ठेवत नाही. मग यामध्ये कांदा निर्यातीवरील शुल्क कमी करणे असो अथवा खाद्य तेलांवरील आयात शुल्क वाढविणे असो; आम्ही घेतलेल्या अशा अनेक निर्णयांचा खूप मोठा लाभ आपल्या अन्नदाता शेतक-यांना होणार आहे. यामुळे एकीकडे त्यांचे उत्पन्न वाढेल, तसेच ग्रामीण क्षेत्रांमध्ये रोजगाराच्या संधीही वाढतील.'

# जयलक्ष्मी कास्टिंग ण्ड लॉइस कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, फारोळा येथील एका तरुण कामगाराचा मृत्यू

तभा वृत्तसेवा



बिडकीन दि १५ सप्टेंबर : छत्रपती संभाजीनगर ते बिडकीन रोडवरील फारोळा गावाच्या हद्दीत असलेल्या जयलक्ष्मी कास्टिंग ण्ड लॉइस कंपनी प्रायव्हेट लिमिटेड,फारोळा येथील एका तरुण कामगाराचा जागीच मृत्यू झाला असल्याची घटना दि १४ शनिवार रोजी ३:३० दरम्यान दुपारच्या वेळी घडली आहे.मयत कामगाराचे नाव फारुख एजाज शेख,वय.२६ वर्षे.रा.प्रकाश नगर,बिडकीन असे आहे.जयलक्ष्मी कास्टिंग ण्ड लॉइस कंपनी प्रायव्हेट लिमिटेड,फारोळा या कंपनीतील ब्लेड यार्ड या परिसरात गाडी भरण्याचे काम करत असताना हा प्रकार घडला असल्याची माहिती कंपनीतील कामगारांनी दिली आहे.जयलक्ष्मी कास्टिंग ण्ड लॉइस कंपनी मध्ये हा अपघात झाला असुन फारुख एजाज शेख यास उपचारासाठी बिडकीन रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकारी डॉ प्रणिता मात्रे यांनी तपासून मृत्यू घोषित केले,आज दि १५ रविवार रोजी सकाळी शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले, पुढील तपास पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नारायण गिते करीत आहे

# रायगडात डेंग्यू वाढल्याने आरोग्य विभागाची उडाली झोप!

अलिबाग : रायगड जिल्ह्यातील अलिबाग,पेण,पनवेलमधील ग्रामीण भागात सध्या डेंग्यूचे रुग्ण सापडत असून,मागील काही दिवसांपासून येथे डेंग्यूने थैमान घातले आहे.डेंग्यूला रोखण्यासाठी आरोग्य विभाग कामाला लागले असून, जिल्ह्यात दररोज नवीन दहा रुग्ण सापडत असल्याने ऐन गणेशोत्सवात आरोग्य विभागाची पार झोपच उडाली आहे.

रायगड जिल्ह्यामध्ये गेल्या काही दिवसांपासून कधी ऊन,कधी पाऊस असे वातावरण निर्माण झाले आहे. या पावसामुळे अनेक सखल भागात पाणी साचून राहिल्याने डासांचा प्रादूर्भावदेखील वाढू लागला आहे.

# स्व.दिनकरराव जोशी क्रिडा संकुलाच्या कामाला सुरूवात

### संरक्षण भिंत,ड्रेनेज लाईन, रनिंग ट्रॅक साठी १ कोटी २८ लक्ष निधी उपलब्ध

तभा वृत्तसेवा

गंगापुर, दि.१५ सप्टेंबर: गंगापूर येथील स्वर्गीय दिनकरराव जोशी क्रीडा संकुलाच्या कामाचे उद्घाटन गंगापूर च तहसीलदार नवनाथ वागवाड यांच्या हस्ते शुक्रवारी दि. १३ सप्टेंबर पार पडले. शासनाकडून विस्तारित कामासाठी १ कोटी २८ लक्ष रुपये निधी प्राप्त झाला असून या निधीतून क्रीडा संकुलाची संरक्षण भिंत ,ड्रेनेज लाईन ,रनिंग ट्रॅक, अन्य कामाचा यात समावेश आहे.

यावेळी नायब तहसिलदार गौरव खैरनार, क्रिडा अधिकारी लता ढोले,जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे मा.संचालक नंदकुमार गांधीले, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती भाऊसाहेब पदार,भाजपा शहराध्यक्ष मारुती खैरे, तांडा सुधार वस्ती अध्यक्ष राजेंद्र राठोड,संदीप बोजवारे,प्रशांत मुळे,राजेंद्र मोरे, कृष्णकांत व्यवहारे,अथर जहुरी, अरूण सागर, प्रकाश जाधव, क्रीडा शिक्षक रामदास सारसर, आदी उपस्थित होते.



**क्रीडासंकुल देखभाल व दोन प्रशिक्षक तसेच सुरक्षा रक्षकांची नेमणूक करून तालुकास्तरावर विविध स्पर्धेचे आयोजन या ठिकाणी करण्यात यावे. करिता शासनाकडे पत्रकार करण्यात येत आहे, पंधरा वर्षापासून या क्रीडांगणावर स्पर्धा झाल्याचे अवगत नाही.**

**– रामदास सारसर क्रीडा शिक्षक, गंगापूर.**

**शहरातील स्वर्गीय दिनकरराव जोशी क्रिडा संकुलामुळे शहरातील तसेच तालुक्यातील अनेक खेळाडूंना विशेष खेळात प्राविण्य मिळविण्यासाठी क्रिडा संकुलाच्या माध्यमातून सराव करता येणार आहे.अत्यंत अशा विस्तारित क्रीडांगणामुळे खेळाडू तसेच मॉर्निंग वॉकला येणाऱ्या नागरिकांना याचा मोठा लाभ मिळणार आहे.**

# प्रदर्शनाद्वारे पुढच्या पिढीपर्यंत मुक्तिसंग्रामाचा इतिहास पोहोचवा : गृहनिर्माण मंत्री अतुल सावे

छत्रपती संभाजीनगर, दि.१५(जिमाका)- मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास दुर्मिळ छायाचित्रांच्या प्रदर्शनातून मांडण्याचा केंद्रीय संचार ब्युरोचा प्रयत्न वाखाणण्यासारखा आहे. मराठवाड्याच्या मुक्तिसंग्रामाचा हा संघर्ष, त्याग आणि बलिदानाचा जाज्वल्य इतिहास पुढच्या पिढीपर्यंत अशा उपक्रमांद्वारे पोहोचववा,असे आवाहन राज्याचे गृहनिर्माण, इतर मागास वर्ग विकास मंत्री अतुल सावे यांनी आज येथे केले.

भारत सरकारच्या माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या केंद्रीय संचार ब्यूरो, छत्रपती संभाजीनगर आणि महानगरपालिका छत्रपती



संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित, मराठवाडा मुक्ती संग्राम व भारतीय स्वातंत्र्यलढयावर आधारित तीन दिवसीय मल्टीमीडिया चित्रप्रदर्शनाचे आयोजन सिद्धार्थ गार्डन येथे करण्यात आले आहे. या चित्रप्रदर्शनाचे उदघाटन आज मंत्री अतुल सावे, राज्यसभा सदस्य खासदार डॉ. भागवत कराड, जिल्हाधिकारी, दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. महानगरपालिकेचे उपायुक्त रवींद्र जोगदंड, सिद्धार्थ गार्डन उद्यान अधिकारी, विजय पाटील, जिल्हा माहिती अधिकारी, डॉ. मिलिंद दुसाने, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्राध्यपक डॉ. मंगला बोरकर, महानगरपालिका जनसंपर्क अधिकारी तौसीफ अहमद, साईसेवा बहुविध प्रतिष्ठान व राजमाता जिजाऊ विद्यालय व महाविद्यालयचे अध्यक्ष साईनाथ जाधव व भारत सरकारच्या केंद्रीय संचार ब्युरोचे क्षेत्रीय प्रचार अधिकारी माधव जायभाये, सहा. क्षेत्रीय प्रचार अधिकारी, प्रदीप पवार आदी उपस्थित होते.

मंत्री अतुल सावे म्हणाले की, स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाचे आदर्श घेऊन तरुण आपले कार्य करतील.भारतीय स्वातंत्र्य लढा व मराठवाडा मुक्ती संग्राम लढ्याची अत्यंत संक्षिप्त स्वरूपात व दुर्मिळ अशा छायाचित्राच्या माध्यमातून प्रदर्शित करण्यात आलेल्या या प्रदेशास सर्व नागरिकांनी भेटी द्याव्यात असे आवाहनही सावे यांनी केले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यावेळी या मराठवाडा मुक्ती संग्रामाची माहिती व इतिहास या विष मौलिक माहिती दिली. तरुणांनी या मुक्तिसंग्रामाची गाथा जाणून घेऊन त्यापासून प्रेरणा घ्यावी,असे आवाहन केले. शिवदर्शन सांस्कृतिक शाहिरी संच, छत्रपती संभाजीनगर यांनी स्वातंत्र्य लढ्यातील पोवाडे व गीतांचे सादरीकरण केले. हे प्रदर्शन दि.१७ पर्यंत दररोज सकाळी ९ ते सायंकाळी ६ वा. पर्यंत सर्वांसाठी विनामूल्य खुले आहे. तरी नागरिकांनी प्रदर्शनाला भेट द्यावी,असे आवाहन केंद्र शासनामार्फत करण्यात आले आहे.

# रद्दी पेपरमधून बनविली 'श्रीं' ची देखणी आरास

### टाकाऊपासून टिकाऊ कलाकृती

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी : गणेशभक्त लाडक्या गणरायासाठी काय क्लुप्ती लढवतील, याचा नेम नाही. आशा नगर-शिवाजी नगरमधील श्रीराम गव्हाणे दरवर्षी आपल्या घरगुती गणपती बाप्पांसमारे काहीतरी आगळी-वेगळी सजावट करतात.

या वर्षी त्यांनी गणपतीसाठी रद्दी पेपरपासून देखणी आरास केली आहे. गणपतीमागील कमानीसह आरास तयार करण्यासाठी १० किलो रद्दी पेपर लागल्याची माहिती गव्हाणे यांनी दिली. मूर्ती पीओपीची असली तरी टाकाऊपासून टिकाऊ आणि नावीन्यपूर्ण आणि सुंदर अशी आरास त्यांनी केली आहे. 'श्रीं' च्या समोर वेगवेगळ्या प्रकारचे वृक्षांची रोपे असलेल्या कुंड्या मांडून 'झाडे जगवा, झाडे वाढवा' हा पर्यावरणाचा संदेश द्यायलाही गव्हाणे विसरले नाहीत. संपूर्ण शिवाजी नगरमध्ये गव्हाणे कुटुंबीयांचे आगळे-वेगळे बाप्पा गणेशभक्तांचे लक्ष वेधून घेत आहेत. नावीन्यपूर्ण सजावटीची परंपरा आपण जपली असून, यापुढेही ती कायम ठेवणार असल्याचे गव्हाणे यांनी सांगितले.



सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## महाराष्ट्रात विमुक्त जाती प्रवर्गातून मुलींमधून समृद्धी राठोड प्रथम



तभा वृत्तसेवा

कन्नड दि.१५ सप्टेंबर – तालुक्यातील कु.समृद्धी सुभाष राठोड हिने महाराष्ट्रातून विमुक्त जाती प्रवर्गातून मुलींमधून प्रथम क्रमांक पटकावला आहे. तालुक्यातील मुंडवाडी तांडा येथील रहिवासी विद्यार्थ्यांनी समृद्धी राठोड हिने नीट परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून तिने महाराष्ट्रात विमुक्त जाती प्रवर्गातुन मुलींमध्ये ७२० गुणांपैकी ६८४ गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे

तिच्या या घवघवीत यशाबद्दल मुंडवाडी तांड्यातील ग्रामस्थ युवा चैतन्य मित्र मंडळाच्या वतीने सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता,या सत्कारा प्रसंगी समृद्धी राठोड म्हणाली की,जिद्द,चिकाटी च्या जोरावर सहज यश प्राप्त करता येते,मूलभूत सुविधा उपलब्ध नसतील तर खचुन न जाता प्रामाणिकपणाने मेहनत केली तर नक्कीच यश मिळते,आजच्या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी जिद्द,चिकाटी,मेहनत, प्रामाणिकता,संयम गरजेचा आहे,असे मत तिने व्यक्त केले यावेळी साईदास राठोड, निवृत्त प्राचार्य मगनदास राठोड,निवृत्त मुख्याध्यापक शामराव राठोड,माजी सरपंच विठ्ठल राठोड, विष्णु राठोड,उपसरपंच केशवराव पवार,शिक्षक संजय राठोड, उद्योजक अमोल राठोड,बिनूसिंग राठोड,रामेश्वर घनकर, सह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते

# गंगापूर शहरात नृसिंह गणेश मंडळाकडून गणेशोत्सव उत्साहात

तभा. वृत्तसेवा.

गंगापूर, दि.१५ सप्टेंबर: गंगापूर शहरात नृसिंह गणेश मंडळाकडून गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात येत आहे. मंडळाकडून सलग सात वर्षापासून विविध देखावे सादर करण्यात येत आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयांच्यामार्फत गंगापूर तालुक्यातून नृसिंह गणेश मंडळास उत्कृष्ट सजावट द्वितीय पारितोषिक मिळाले होते. मागील वर्षी भारताने चंद्रयान अवकाशात पाठविले होते, त्याचा चंद्रयान देखावा सादर करण्यात आला होता.यावर्षी मंडळाकडून पुरातन विठ्ठल मंदिराचा देखावा सादर करण्यात आलेला आहे.

नृसिंह गणेश मित्र मंडळ कार्यकारिणी अध्यक्ष गणेश आंबिलवादे उपाध्यक्ष अथर्व भालेराव समीयण मालपाणी निखिल जावळे गजानन कुलकर्णी मोहित कुलकर्णी साई कदम संकेत कदम मल्हार मुळे रुद्र जोशी दत्ता कळसकर करण धामणे कृष्णा टेमकर ओमकार बिडकर कलश शर्मा ओम जावळे सुप्रिया कळसकर अक्षय कळसकर जयेश तराडे परितोष कुलकर्णी. आदी सदस्य आहेत.



## श्री.अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्थाच्या चेअरमनदीपदी शेख अंकुर हुस्नोद्दीन यांची बिनविरोध निवड



सोयगाव,दि.१५ सप्टेंबर : श्री.अमृतेश्वर शिक्षक सहकारी पतसंस्था सोयगाव चेअरमन पदाची निवड गुरुवार रोजी अध्यासी अधिकारी संजय गाजुलवाड यांचे अध्यक्षतेखाली व सहकारी गटसचिव दिलीप रावणे यांच्या उपस्थितीत पतसंस्थेच्या कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडली.

शिक्षक सहकार पॅनलचे शेख शकुर हुस्नोद्दीन यांची चेअरमन पदी बिनविरोध सर्वानुमते निवड करण्यात आली.

तसेच मानद सचिव पदी संदीप सोनवणे,व व्हाईस चेअरमन पदी रघुनाथ काटोले यांची निवड कायम ठेवण्यात येऊन पुढील काळासाठी नूतन चेअरमन यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.यावेळी उपस्थित पॅनल प्रमुख दिवाकर चोपडे,भास्कर चौधरी,अनिल निकम,राजेश जंजाळ,माजी चेअरमन कृष्णा पाटील,यांनी तसेच राजेंद्र नगरे व सहकार पॅनलचे संचालक संतोष वाघ,दुर्गादास बलांडे,विठ्ठल राठोड,पंकज रगडे,संदिप चौधरी व सहशिक्षक अनिल ठाकूर,प्रशांत पाटील यांनी नवीन निवड झालेले चेअरमन शेख शकुर,सचिव संदिप सोनवणे,व्हा. चेअरमन रघुनाथ काटोले यांचे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.यावेळी संस्थेचे कर्मचारी रामदास फुसे,प्रमोद जाधव,रमेश वामने उपस्थित होते.म.रा. शिक्षक संघ व समविचारी शिक्षक मित्र परिवार प्रणित शिक्षक सहकार पॅनल चे सर्व समर्थक शिक्षक व मित्र परिवार यांचे आभार नूतन चेअरमन शकुर शेख यांनी आपल्या मनोगतात मांडले.

तसेच यावेळी पतसंस्थेचे कर्मचारी रामदास फुसे,प्रमोद जाधव,रमेश वामने यांनी कार्यक्रमास्थळी मोलाचे सहकार्य केले.

# आत्मा आणि शरीराने तप केल्या शिवाय परमात्मा तत्वाची प्राप्ती होत नाही : आर्यिका विकुंदनश्री माताजी

छत्रपती संभाजीनगर – खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार येथे दहा दिवसीय पर्युषण महापर्वाची आज उत्तम तप या दिवशी आर्यिका विकुंदनश्री माताजी यांनी आज पर्युषण पर्वाच्या सहाव्या दिवशी उदबोधन केले. यावेळी क्षुल्लिका विजीताश्री माताजी यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व प्रथम सकाळी आज भगवान शांतीनाथांचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. तदनंतर बोलीया प्रारंभ होउन भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात आला. यावेळी सौधर्म इंद्र इंद्राणी होण्याचा सौभाग्य ॲड.अनिल सौ.अलकादेवी कासलीवाल परिवार हिराकाका यांना मिळाला. शांतीमंत्राचा सौभाग्य स्व कौशल्याबाई झुंबरलाल पाटनी विजय रमेश चंद्रकुमार पंचायत अध्यक्ष महावीर पाटनी परिवार अमनवाला

यांना मिळाला. तर भगवंताला अर्चनाफळ चढवण्याचा सौभाग्य रमेश अक्षय नितेश कासलीवाल परिवार कांबीवाला यांना मिळाला तर परिवार सर्वऔशधी अभिषेक चे सौभाग्य ऊशादेवी निलेश सेठी परिवार यांना मिळाला. तसेच उत्तम तप धर्माचा कळस सूशीला बाई दीपचंद कासलीवाल सिद्धार्थ ऊमेश कासलीवाल कांबीवाला परिवार यांना मिळाला मुनिश्री सुपार्श्वसागर महाराजयांचा स्मरणार्थ फोटोसमोर माल्यार्पण करण्याचे सौभाग्य ताराबाई हिराचंद कासलीवाल विनोद कांसलीवाल परिवार यांना मिळाला. यावेळेस आर्यिका माताजी उदबोधन करतांना सांगितले की इच्छा निरोधःतपः। अर्थात इच्छांच्या त्यागाला तप म्हणतात। जेवढा सूर्य तप्त होईल तेवढा जास्त पाऊस पडेल। तसेच आत्मा आणि शरीराने तप केल्या शिवाय परमात्मा तत्वाची प्राप्ती होत नाही। मनुष्य जन्मात आयुष्य फार थोडे आहे ।तेही आपण वासनापूर्तीमध्येच व्यतित करतो। आपण थोडासा वेळ तपस्येमध्ये, ध्यान धारणेमध्ये व्यतीत करण्याचा संकल्प केला तर कर्म बंधने तोडून पुण्य प्राप्ती करू शकतो। शरीराला कष्ट का द्यायचे असा प्रश्न अनेकांच्या मनात असतो ।परंतु शरीर कितीही सुंदर ,स्वच्छ असले तरी आत्म्याला शुद्ध करण्यासाठी शरीराला कष्ट देणे अत्यावश्यक आहे। त्यालाच आपण तप म्हणतो.

या संसारात आपण क्षणभंगुर



## सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश त्रैवार्षिक अधिवेशन शिर्डी येथे

ताभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर – सहकार भारती महाराष्ट्र प्रदेशाचे चौदावे त्रैवार्षिक अधिवेशन शनिवार दि. २१ सप्टेंबर व रविवार दि. २२ सप्टेंबर २०१४ रोजी साई पालखी निवारा, शिडी येथे आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनामध्ये महाराष्ट्रातील ३६ जिल्हे व ३०० तालुक्यांमधून सुमारे १५०० च्या वर सहकार भारतीचे क्रियाशील कार्यकर्ते सहभागी होणार असल्याची माहिती सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्षा डॉ. शशीताई अहिरे व महामंत्री विवेक जुगादे यांनी दिली.

या अधिवेशनाचे उद्घाटक या नात्याने केंद्रीय सहकार राज्यमंत्री मा. श्री. मुरलीधर मोहोळ उपस्थित राहणार असून प्रमुख अतिथी या नात्याने महाराष्ट्र राज्याचे सहकारमंत्री मा. श्री. दिलीप वळसे पाटील, सहकार आयुक्त व निबंधक मा. श्री. दिपक तावरे तसेच भारतीय रिजर्व्ह बँकेचे संचालक मा. श्री. सतीशजी मराठे उपस्थित राहणार आहेत. महाराष्ट्र राज्याचे महसूलमंत्री व जिल्ह्याचे पालकमंत्री मा. श्री. राधाकृष्ण विखे पाटील हे अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष असणार आहे. यासोबतच सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. श्री. दिनानाथजी ठाकूर, राष्ट्रीय महामंत्री मा. डॉ. श्री. उदयजी जोशी, राष्ट्रीय संघटनमंत्री, मा. श्री. संजयजी पाचपोर अधिवेशनास पूर्ण वेळ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार असल्याचे विवेक जुगादे यांनी सांगितले.

या अधिवेशनाचे उद्घाटन २१ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता होणार असून अधिवेशनाचा समारोप दि. २२ सप्टेंबर रोजी दुपारी २.०० वाजता होणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील कार्यकत्यांनी आपल्या जिल्ह्याची परिस्थिती व विशिष्ट कामाची गरज लक्षात घेऊन प्रशिक्षण वर्ग, अभ्यास वर्ग, संस्थांचे मेळावे, संचालक व कर्मचाऱ्यांचे अभ्यासवर्ग, चर्चासत्रे, विविध संस्थांच्या प्रश्नावर परिसंवाद इत्यादीद्वारे उपक्रम चालू ठेवले आहेत. नवीन संस्थांची स्थापना व त्यासाठी विविध स्तरांवरील अधिकारी मंडळींशी संपर्क ठेवण्याचे कामही सहकार भारतीने केले आहे. या अधिवेशनाचे प्रदेश अधिवेशन प्रमुख ॲड. रविकाका बोरावके व अधिवेशन सहप्रमुख श्री. अमिनाथ शिंदे राहणार आहेत.

## कै.बाबुरावजी काळे स्कूलच्या गणपती बाप्पाला निरोप




तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१५ सप्टेंबर

येथील कै.बाबुरावजी काळे स्कूल च्या विद्यार्थ्यांनी ढोल ताशा व लेझिम च्या गजरात दिला गणपती बाप्पा ला निरोप रविवार रोजी कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल च्या विद्यार्थ्यांनी गणराया ला ढोल ताशा व लेझिम च्या गजरात बाप्पा ला निरोप दिला.या शाळेची मिरवणूक सोयगाव शहरातील दुर्गा भवानी मंदिर येथून प्रयाण होऊन मार्गे जुना बाजार चौक,महर्षी वाल्मिकी मंदिर,छत्रपती शिवाजी महाराज चौकातून बेलेश्वर मंदिर जवळ असलेल्या तलाव येथे गणपती बाप्पाचे विसर्जन करण्यात केले.या मिरवणुकीत विद्यार्थ्यांनी ढोल पथक,लेझिम च्या तालात नृत्य केले तसेच इयत्ता ७ वी च्या विद्यार्थिनींनी महाराष्ट्रातील क्रांतिकारक यांचा पेहराव केलेला होता जल सुरक्षा व बेटी बचाव यावर मुकअ भिनय करून शहरातील नागरिकांचे मन हेलावणारे नाट्य केले.या मिरवणुकीत संस्थेचे संचालक शिवदीप काळे,रवींद्र काळे,विजय गव्हाड, कृष्णा जुनघरे,संस्थेचे प्रतिनिधी प्रा.कमलेश काळे,शाळेचे मार्गदर्शक प्रा.डॉ.दादासाहेब पवार,मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलीस,उपमुख्याध्यापक सागर घाटे,योगेश काळे,अंजली कथळकर,शीतल पवार,निकिता देशमुख,शीतल गावांडे, रोहिणी पाटील,शीतल काटोले,शहादात्ता तडवी,आशा पंडित,नम्रता पाटील,विद्या पाटील,जयश्री श्रीवास्तव,प्रेरणा मोरे,कीर्ती पाटील,संदीप निकम,संजय डापके,तौफिक पठाण,हरीश कोळी,उमेश जाधव,ज्ञानेश्वर पंडित,आदी या मिरवणुकीत सहभागी होते.

## मुलांचे पालकत्व आई व वडील दोघांनीही स्वीकारले पाहिजे : डॉ. रश्मी बोरीकर



बिडकीन दि. १५ पैठण तालुक्यातील श्री सरस्वती भुवन प्रशाला बिडकीन येथे सखी सावित्री मंच आयोजित आई मेळाव्यात मार्गदर्शन करताना श्री सरस्वती भुवन शिक्षणसंस्था छत्रपती संभाजीनगरच्या सहचिटणीस व सुप्रसिद्ध स्त्री रोग तज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या डॉ. रश्मी बोरीकर यांनी वरील प्रेरणादायी विधान केले.यावेळी पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा व्यासपीठावर उपस्थित होते. प्रतिमापूजन व स्वागतानंतर उपस्थित दीडशेपेक्षाही अधिक माता पालकांना मार्गदर्शन करताना डॉ. रश्मी बोरीकर यांनी सांगितले की मुले आणि मुली यांच्या कामातही भेदभाव करता कामा नये ज्यामुळे स्त्री आणि पुरूष असा भेद निर्माण होईल. स्त्रीलाही माणूस म्हणून जगता आले पाहिजे. मुले ही अनुकरणप्रिय असतात, मुलांनी मोबाईलचा अतिवापर करणे हे त्यांच्यासाठी घातकच आहे. हल्ली मुलामुलींचे वयात येणेही अलिकडे आले आहे. आधुनिक काळात मुलांचे पालकत्व निभावणे खूप कठीण होत चालले आहे. व्यसनमुक्त समाज निर्माण होणे ही काळाची गरज आहे. आधुनिक युगाचे आव्हान स्वीकारणे, मोबाईलपासून स्वतःला दूर ठेवणे आणि मुलांचे पालकत्व निभावणे ही काळाची गरज आहे. आपल्याला प्रत्येक व्यक्ती चांगली घडवायची आहे ज्यातून चांगल्या, सक्षम समाजाची नव्याने उभारणी होईल. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुवर्णा बैरागी आणि आभारप्रदर्शन पर्यवेक्षिका मनिषा मिश्रा यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रशालेतील सर्वच विद्यार्थी, शिक्षकशिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# वेरूळ येथील राष्ट्रीय संत मुरारी बापू यांच्या राम कथेचा भक्ताच्या उत्साहात श्रीरामाच्या गजरात समारोप

तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी : वेरूळ येथे जगद्गुरु जनार्दन स्वामी आश्रमात चालू असलेल्या नऊ दिवसाच्या कथेचा आज दुपारी समारोप करण्यात आला आपल्या मधुर वाणीतून कथे दरम्यान बापूंनी मानव जीवनातील अहंकार नष्ट करून राम भक्तीत तल्लीन होऊन जीवन जगावं कथेसाठी आलेल्या भक्तांसाठी आयोजकाच्या वतीने गेली नऊ दिवस सकाळी चहा नाष्टा कथा संपल्यानंतर दुपारी जेवण. परत संध्याकाळी जेवण अशी उत्तम व्यवस्था आयोजक राजेश भैय्या दोषी मुंबई यांच्या परिवाराच्या वतीने करण्यात आली होती. कथेचाआरतीने समारोप करण्यात आला वेरूळ येथील नाथ आश्रम प्रमुख सद्गुरु अक्काताई महाराज. टाका स्वामी. देशभरातून आलेले भक्त प्रमुख्याने उपस्थित होते.

जनार्दन स्वामी संस्था आणि जागतिक वारसा स्थळ एलोरा लेणी, वेरूळ-छत्रपती संभाजीनगर-औरंगाबाद यांच्या उपस्थितीत रामकथा संपन्न झाल्याच्या दिवशी बापू म्हणाले की, अनेक प्रश्न आले, या दिवसात सर्वच पत्रांनी मनोरथींबद्दल अनादर व्यक्त केला आहे. बापूंनी प्रत्येक प्रकारच्या व्यवस्थेबद्दल आनंद व्यक्त केला.

हे प्रेमयज्ञ आता पूर्ण होणार आहे, असे बापूंनी सांगितले. समारोपापूर्वी सार सूत्राने लंकेतील अंगद संधिचा प्रस्ताव कथेच्या प्रवाहात घेतला. तह अयशस्वी झाला, युद्ध अपरिहार्य झाले.

बापू म्हणाले की, युद्धाची कथा सुंदर असते पण युद्ध कधीच सुंदर नसते, युद्ध खूप कुरूप असते. युक्रेन, रशिया, इस्त्रायल इत्यादी देशांनी युद्ध, दहशतवाद, हिंसाचार आणि संघर्षांबद्दल आपले अपराधीपणा व्यक्त केले.

बापू म्हणाले की, जर आपल्याला आपल्या घरात परिपूर्ण शांती प्रस्थापित करायची असेल, तर शंकराचार्यजींनी पंचक हे साधन दिले आहे, त्याचे अतिशय साधे सार सांगताना बापू म्हणाले की, ज्या साधकाला परिपूर्ण शांती प्राप्त करायची आहे, त्यासाठी पाच सूत्रे आहेत. घर सर्वप्रथम, साधकाने दररोज वेद आणि शास्त्रांचे आत्म-अभ्यास आणि मनन केले पाहिजे. वेदांचा दैनंदिन अभ्यास करणे म्हणजे आपल्या परंपरेतील आवडते धर्मग्रंथ वेद मानणे.

माझ्यासाठी रामचरितमानस आणि भागवत गीता हे वेद आहेत, माझ्या गुरु भगवानांनी मला त्यांचे सतत पाठ करण्यास सांगितले आहे. जगतगुरू तुकारामजींचे दोन अभंग गा, तेही वेदांचे पठण होईल. पण पुस्तक हे चांगलं पुस्तक असायला हवं. दांभिकतेतून निर्माण झालेल्या तथाकथित ग्रंथांना चांगले ग्रंथ म्हणत, त्यात सत्य नसते.

दुसरा: दररोज एकांतात जा आणि एकांताचे तास वाढवत रहा. तिसरे, जर तुमच्या सद्गुरूंच्या पादुका असतील तर रोज पादुका पूजन करा. उपासना म्हणजे विश्वास. माझ्या घरात एक रक्षक बसला आहे, तो माझे रक्षण करेल. बापू म्हणाले की चौथे, शक्यतो वादविवाद टाळा. कोणतीही घटना तुम्हाला भारावून टाकत असेल तर ती देवाची प्रसाद मानून कोणत्याही प्रतिकाराशिवाय सहन करा.

बापूंनी सांगितले की वाद घालू नका, यात खूप ऊर्जा आणि वेळ खर्च होतो, वाद हा एक विकृती आहे.

आणि पाचवे, जेव्हा जेव्हा संधी मिळेल तेव्हा एखाद्या साधूशी करा. बापू म्हणाले की कथा गगन विहारिणी आहे. त्यांना पृथ्वीवर उतरवल्यानंतर त्यांना तुमच्या देशात, तुमच्या प्रांतात आणा. प्रांतातून घरापर्यंत आणि घरातून घाटापर्यंत घेऊन जा. एखाद्याच्या गुरूच्या स्वभावाची स्मरणशक्ती संताकडे असते, जरी संत भौतिक स्वरूपात नसला तरी त्याची स्मरणशक्ती संताकडे असते.



## वीवो ने टी ३ अल्ट्रा ५ जी लाँच केले

नवी दिल्ली : वीवो , या नाविन्यपूर्ण जागतिक स्मार्टफोन ब्रँडने आज वीवो टी३ मालिकेत आपली नवीनतम जोड लाँच केली – वीवो टी३ अल्ट्रा ५जी . टी३ अल्ट्रा ५जी हा वीवो द्वारे ‘अल्ट्रा’ मालिकेतील पहिला स्मार्टफोन आहे आणि टी सीरीज पोर्टफोलिओमधला हा सर्वात प्रीमियम स्मार्टफोन असेल.

# नोकरी मागणारे नव्हे तर नोकरी देणारे व्हा

### उद्योजकता आणि संधी या चर्चासत्रात उद्योजकांनी व्यक्त केले मत

छत्रपती संभाजीनगर: आज घडीला देशाला नोकरी मागणाऱ्यांची नावे तर नोकरी देणाऱ्यांची आवश्यकता आहे. त्यासाठी प्रत्येकाने उद्योगात येण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन पूर्णवाद परिवार आणि लायन्स क्लब ऑफ छत्रपती संभाजी नगर गोल्ड तर्फे समर्थ नगर येथील शिवराम प्रतिष्ठान येथे आयोजित उद्योजकता आणि संधी या चर्चासत्रात उद्योजकांनी नवतरुणांना केले. यावेळी यशश्री प्रेस कॉम्पचे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद कंक, महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळचे उपाध्यक्ष आशिष गर्दे, उद्योजक दुष्यंत पाटील, सायन्स फॉर सोसायटी टेक्नोसर्विसेसचे सहसंस्थापक अश्विन पावडे आणि डिजीवृद्धीचे सहायक उपाध्यक्ष बालसुब्रमण्यम पिल्लई हे मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या चर्चासत्राच्या सूत्रसंचालन रोहन कुलकर्णी आणि नचिकेत पाटील यांनी केले.

यावेळी बोलताना मिलिंद कंक म्हणाले की, पालक शिक्षणासाठी इतकी वर्ष देतात, पालकांनी मुला मुलींना किमान २ वर्ष उद्योजक म्हणून प्रयत्न करण्यासाठी द्यावीत. देशाचे स्वरुप बदलेल. अंथरूण पाहून पाय पसरावे अशा जुन्या म्हणींना बदलण्याची आवश्यकता आहे आपला अंथरूण हे इन्फिनिटी असलं पाहिजे. माणसाने मिळेल त्यात समाधानी असण्याची व्याख्या बदलणे आवश्यक आहे. आहे त्यापेक्षा चांगले प्राप्त करून घेण्याच्या वृत्तीने माणूस उद्योजक होऊ शकतो.

या चर्चासत्रात आशिष गर्दे,सीएमआय चे माजी अध्यक्ष तथा उद्योजक दुष्यंत पाटील,अश्विन पावडे,बालसुब्रमण्यम पिल्लई आदींनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. चर्चासत्राच्या अखेरीस उद्योजकांनी उपस्थित आणि विचारलेल्या प्रश्नांना सविस्तर उत्तरे दिली. यात प्रामुख्याने उद्योग आणि व्यवसायाच्या संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आर्थिक नियोजन, मार्केट रिसर्च, संशोधन, मनुष्यबळ व्यवस्थापन, यासारख्या विविध विषयांवर मार्गदर्शन केले. याप्रसंगी जीवन कला मंडळ संभाजीनगरचे अध्यक्ष गणेशराव जहागीरदार, कार्याध्यक्ष आनंद मुठाळ यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी लायन्स क्लब गोल्ड चे अध्यक्ष मयूर सोनवणे, सचिव रंजीत उरगुंडे,प्रकल्प प्रमुख मनोज अंभोरे, राहुल दाशरथे, किशोर ललवाणी, सुबोध जाधव, प्रसाद पाटणी, सत्यबोधक समाजचे अजिंक्य देशपांडे, सुशांत देशपांडे, ओंकार धाट यांच्यासह सदस्य आणि पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.




## जाहीर प्रगटन

या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस तथा बँका व वित्तीय संस्थांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी मौजे सुलतानपुर (जिकठाण) ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील शेत गट नंबर २० मधील एकुण क्षेत्रफळ १ हे. ८२ आर. पैकी पुर्वेस छत्रपती संभाजीनगर पुणे हायवे रोड व शिवरस्ता, पश्चिमेस गट क्र. १६ मधील जमिन, दक्षिणेस छत्रपती संभाजीनगर पुणे रोडपासुन जिकठाण कडे जाणारा रोड आणि उत्तरेस याच गटातील शिल्लक जमिन, या चतु:सिमेच्या आतील ०० हे. ९० आर. सह पोटखराबा ०१ आर. शेत जमिन खरेदी करण्याचा करार जमिन मालक श्री. जगन्नाथ खंडेराव जाधव रा. शिऊर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या सोबत केलेला असुन, सदर जमिन मालक यांनी ती मिळकत र्निजोखीम, निर्वीवाद असल्याची खात्री माझ्या पक्षकारांना दिलेली आहे.

तरी सदर शेत मिळकतीबाबत कोणाचाही काही हक्क अधिकार, ईसारपावती, दान, गहाण, तारण, बक्षिसपत्र, वाटणी, हिस्सा, कुळ, बोझा, वहिवाट अथवा इतर कोणत्याही मार्गाने काही हक्क निगडीत असल्यास त्यांनी त्यांचे हक्का संबंधीचा आक्षेप सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ०७ दिवसांत गाझ्या वर नगुद पत्यावर लेखी स्वरुपात दाखल करावा, गुदतीमध्ये आक्षेप न आल्यास सदर मिळकत निर्विवाद असल्याचे ग्राह्य धरुन माझे पक्षकार सदर जमिनीचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील.

करीता हे जाहीर प्रगटन.

मार्फत
ॲड. जि. के तारू
१६ महसुल हाऊस्थि सोसायटी, गंगापूर
मो.९४२२२५१९८३,९८८१२८७७८८

## जाहीर नोटिस

तमाम जनतेस भूसंपादन कार्यालय सर्व वित्तीय संस्था शासकीय बँका तसेच शासकीय कार्यालय, सहकारी पतसंस्था तसेच नोटिसमधील नमुद गटाचे मालकांना व त्यांच्या कुटुंबियातील सदस्यांना तसेच इतर वारस हितचिंतक किंवा या मिळकती संबंधीचे हक्कदार यांना आमचे पक्षकार यांनी आम्हास दिलेल्या अधिकार व माहितीवरुन तसेच दाखविलेल्या कागदपत्रांवरुन या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की,

मिळकत वर्णन : मौजे धनवट, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर, येथील १) शेत गट नं. ८ यासी एकूण क्षेत्रफळ ०२ हे. ३२ आर. इतके असुन पैकी ०१ हे. २४ आर., २) शेत गट नं. ९ यासी एकुण क्षेत्रफळ ०६ है. ७६ आर. इतके असुन पैकी ०० हे. ७५ आर., ३) शेत गट नं. १२ यासी एकूण क्षेत्रफळ ०७ हे. ४५ आर. इतके असुन पैकी ०२ हे. ०० आर. या शेत मिळकती जाहिर – नोटिस देणार यांच्या वडिलोपार्जित शेत मिळकती असुन, यावर सध्या मालकी हक्कात नामे दिपक विठ्ठल आगळे व विलास विठ्ठल आगळे यांचे नावे दिसत असले तरी, यावर इतर वारसांचा देखील हक्क व अधिकार आहे. यापैकी विलास विठ्ठल आगळे हे सामाईक क्षेत्रातील निम्मे क्षेत्र विकण्याच्या विचारात असुन, त्यांचा या मिळकतीवर पुर्णपणे कायदेशीर अधिकार नव्हता व नाही. त्यामुळे त्यांचे वारस व त्यांच्या कुटूंबिय नामे धनश्री विलास आगळे व साई विलास आगळे यांचा देखील या मिळकतीवर कायदेशीर रित्या हिस्सा असल्याने त्यांची आई नामे ज्योती विलास आगळे अ. पा. क. यांची संमती घेतल्या शिवाय कुणीही वर नमुद शेत मिळकतीचे हस्तांतरण करु नये. या शेत मिळकतीचे संयुक्त रित्या आमचे पक्षकार हे मालक आहे. या मिळकत उताऱ्यावरील असलेली व्यक्ती सदरची मालमत्ता परस्पर विक्री करण्याच्या विचारात असल्याने सदरची जाहिर नोटिस देणे भाग झालेले आहे.

२/-

तरी तमाम जनतेस तसेच त्यांच्या कुटुंचियातील सदस्यांना व अन्य लोकांना हितचितकांना व वारसांना या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की चर नमुद १ मधील वर्णन केलेल्या शेत मिळकती या सोबत व्यवहार करु नये. ही आमचे पक्षकार जाहिर नोटिस देणार यांच्या संमती शिवाय कुठलाही व्यवहार करु नये. व या व्यतीरिक्त् तो व्यवहार आमच्यावर बंधनकारक नसुन, बेकायदेशीर असल्याने जाहिर नोटिस दिलेली आहे.

स्थळ :- सोयगांव.
दि.१५/०९/२०२४.

ॲड धर्मराज राजाराम सुर्यवंशी.
रा. शेंदुर्णी ता. जामनेर, जि. जळगांव.
मो. नं. :९८९०१६२०६७

## धर्म/अध्यात्म

श्वेता गोयल

# गणपतीला अग्रपूजेचा मान का?

सध्या संपूर्ण देशभरात गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जात आहे. भारतातच नाही तर जगात ज्या ज्या ठिकाणी भारतीय स्थायिक झाले आहेत अशा सर्वच देशात गणेशोत्सवाची धामधूम सुरू आहे. 'गणपती बाप्पा मोरयाचा' सर्वत्र गजर होत होत आहे. भाविक वर्षभर या उत्सवाची आतुरतेने वाट पाहत असतात आणि महिनाभर आधीच त्याची तयारी सुरू करतात. दरवर्षी भाद्रपद महिन्याच्या शुक्ल पक्ष चतुर्थीपासून गणेशोत्सव सुरू होतो, जो १० दिवस चालतो आणि अनंत चतुर्दशीला उत्सवाची समाप्ती होते.

हिंदू धर्मात कोणतेही शुभ कार्य आरंभ करण्यापूर्वी भगवान श्रीगणेशाची पूजा केली जाते. विवाह, मंगल परिणय समारंभ असो वा गृहप्रवेश, वास्तू अथवा सणासुदीची पूजा असो वा व्रतबंध सोहळा असो, अशा प्रत्येक शुभ कार्यापूर्वी श्रीगणेशाचे पूजन करण्याची पद्धत आहे. वास्तविक, यामागची श्रद्धा अशी आहे की भगवान श्रीगणेश सर्व प्रकारचे विघ्न, बाधा, अडथळे दूर करतात. भगवान गणेशाला विघ्नहर्ता तथा रिद्धी-सिद्धीचा स्वामी असे म्हटले जाते आणि श्रीगजाननाचे स्मरण, ध्यान, जप, आराधना आणि उपासना केल्याने केवळ कामनापूर्तीच होत नाहीत तर सर्व प्रकारच्या विघ्नांचा नाश होतो, असे मानले जाते. हिंदू धर्मातील पौराणिक मान्यतेनुसार सर्व देवतांच्या आधी भगवान श्रीगणेशाची अर्थात मंगलमूर्तीची पूजा केली जाते आणि कोणत्याही शुभ कार्याची सुरुवात श्रीगणेशाचे नाव घेऊन किंवा गणपती वंदना करूनच केली जाते. पूजा, प्रार्थना, विधी, अनुष्ठान आणि इतर कोणत्याही कार्यात कुठलाही अडथळा, विघ्ने येऊ नये म्हणून आधी गणेशपूजन केले जाते. कोणत्याही कार्याचा प्रारंभ करण्यापूर्वी उत्तम नियोजन, दूरदर्शी निर्णय आणि कुशल कार्यक्षम नेतृत्व आवश्यक असते, म्हणजेच कोणतेही मोठे काम सुरू करण्यापूर्वी बुद्धीचा उपयोग आवश्यक असतो आणि भगवान श्रीगणेश ही बुद्धी तसेच समृद्धी आणि सौभाग्याची देवता मानली जाते. त्याचे पूजन केल्याने कोणतेही कार्य कुठलेही विघ्न न येता पूर्ण होते.

भगवान श्रीगणेश प्रथम पूजनीय देव का आहे, याविषयी विविध पौराणिक ग्रंथांमध्ये विविध उल्लेख असले तरी प्रत्येक ग्रंथांमध्ये श्रीगणेशाला प्रथम पूजेचा मान दिला आहे. गणेशाला प्रथम पूजनीय देवच म्हटले गेले आहे. आपण वेगवेगळ्या ग्रंथांच्या विविध व्यावहारिक पैलूंवर नजर टाकली तरी गणेश हीच पहिली देवता असल्याचे लक्षात येईल. पौराणिक मान्यतेनुसार श्रीगणेशाच्या पूजनाशिवाय शुभ कार्यात कोणत्याही दिशेकडील कोणत्याही देवी देवतेचे आगमन होत नाही. त्यामुळे प्रत्येक शुभ कार्यप्रसंगी आणि पूजेपूर्वी विघ्नहर्त्या श्रीगणरायाची पूजा केली जाते. प्रथमेश्वर, सिद्धिविनायक अर्थात श्री गणेशालाच अग्रपूजेचा मान का दिला जातो? का त्याचे प्रथम पूजन केले जाते? याबाबत शिवमहापुराणात सांगितले आहे की, स्वत: भगवान शंकरानेच श्रीगणेशाला अग्रपूजेचे वरदान दिले होते. शिवमहापुराणात याबद्दल एक कथा आहे. या कथेनुसार, एकदा भगवान शिवशंकर आणि गणेश यांच्यात युद्ध झाले आणि त्या युद्धात भगवान श्रीगणेशाचे मस्तक त्याच्या शरीरापासून वेगळे झाले. जेव्हा देवी पार्वतीने भगवान शंकरांना सांगितले की गणेश त्यांचाच पुत्र आहे, तेव्हा माता पार्वतीच्या विनंतीनुसार, महादेवाने गणेशाच्या शरीरावर हत्तीचे मस्तक जोडले. हत्तीचे मस्तक धडाशी जोडले गेले तेव्हा देवी पार्वतीने भगवान शंकरांना विचारले की या रूपात माझ्या पुत्राची या सृष्टीत कोण पूजा करेल? तेव्हा भगवान शिवशंकरांनी गणेशाला वरदान दिले की कुठल्याही शुभ कार्यापूर्वी आणि सर्व देवी-देवतांच्या पूजेपूर्वी गणेशाची पूजा केली जाईल आणि त्याचे पूजन न करताच पार पाडलेले कुठलेही अनुष्ठान, विधी अथवा कार्य अपूर्ण मानले जाईल.



श्रीगणेशाच्या पूजेबाबत लिंगपुराणात सांगितले आहे की, श्रीगणेश सर्व प्रकारच्या विघ्नांचा नाश करीत असल्याने सर्वप्रथम त्यांचीच पूजा केली जाते. लिंग पुराणातील कथेनुसार, राक्षसांच्या दुष्टकर्मांमध्ये विघ्न निर्माण करण्यासाठी देवतांनी एकदा भगवान शिवाकडे वरदान मागितले. देवतांच्या विनंतीचा स्वीकार करून शिवशंकरांनी त्यांना वरदान देऊन संतुष्ट केले. समयानुसार श्रीगणेश प्रकट झाले आणि देवतांनी त्यांचे पूजन केले. त्यानंतर भगवान शिवशंकरांनी गणेशाला राक्षसांच्या दुष्टकर्मांमध्ये विघ्न निर्माण करण्याचा आदेश दिला. त्यामुळे प्रत्येक शुभ, मांगलिक कार्यात आणि पूजेमध्ये नकारात्मक शक्तींचे विघ्न व अडथळ्यांपासून बचाव करण्यासाठी विघ्नहर्ता भगवान श्रीगणेशाची पूजा केली जाते. महर्षी पाणिनीच्या मते दिशांचा स्वामी म्हणजेच अष्टवसूंच्या समूहाला गण म्हणतात, ज्याचा स्वामी श्रीगणेश आहे. म्हणूनच त्याला 'गणपती' संबोधण्यात आले आहे. गणेश हा प्रथम पूजनीय असल्याबद्दल महर्षींनी पाणिनींनी म्हटले आहे की, गणेश हा सर्व गणांचा स्वामी आहे, म्हणून तो प्रथम पूजनीय आहे.

एकदंत, वक्रतुंड, चतुर्भुज, देवव्रत, हेरंब, कृष्णपिंगाक्ष, रुद्रप्रिय, सुमुख, वरदविनायक अशी विविध नावे असलेल्या श्रीगणेशाला अग्रपूजेचा मान का दिला जातो या संदर्भात आणखी एक पौराणिक कथा देखील खूप प्रचलित आहे. पृथ्वीवर सर्वप्रथम कोणाची पूजा केली पाहिजे यावरून देवतांमध्ये एकदा वाद निर्माण झाला. सर्व देवता स्वत:ला एकदुसऱ्यापेक्षा श्रेष्ठ मानू लागल्या. अर्थात आपणच सर्वश्रेष्ठ आहोत असे सर्व देवता म्हणू लागल्या. वाद वाढत असल्याने देवर्षी नारदांनी सर्व देवतांना भगवान शिवशंकरांना शरण जाण्याचा सल्ला दिला. नारद मुनींचा सल्ला मान्य करून सर्व देवता भगवान शंकराकडे गेल्या आणि हा वाद सोडविण्याची विनंती केली. गंभीर स्वरूप धारण केलेली ही समस्या सोडविण्यासाठी भगवान शिवशंकरांनी एक स्पर्धा आयोजित करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी सर्व देवतांना आपापल्या वाहनांवर बसून संपूर्ण ब्रह्मांडाची प्रदक्षिणा करण्यास सांगितले आणि जो कोणी या विश्वाची परिक्रमा करून सर्वप्रथम त्यांच्याजवळ येईल, त्यालाच पृथ्वीवर अग्रपूजेचा मान दिला जाईल, असेही भगवान शिव म्हणाले.

भगवान शंकराची परवानगी मिळताच सर्व देव आपापल्या वाहनांवर आरूढ झाले आणि ब्रह्मांडाची प्रदक्षिणा करण्यासाठी निघाले. परंतु गणेश आपले वाहन असलेल्या मूषकावर स्वार झाला नाहीत. परंतु सर्व देव-देवता निघून गेल्यावर ब्रह्मांडाची परिक्रमा करण्याऐवजी गणपतीने आपल्या आई-वडिलांना प्रदक्षिणा मारायला सुरुवात केली. गणपतीने एकूण सात वेळा आपल्या आईवडिलांभोवती प्रदक्षिणा घातली आणि हात जोडून तो नम्रपणे उभा राहिला. जेव्हा संपूर्ण सृष्टीला प्रदक्षिणा घालून सर्व देव भगवान शिवाकडे परतले तेव्हा त्यांना गणेश तिथे उभा असल्याचे दिसले. आता स्पर्धेचा विजेता घोषित करण्याची पाळी भगवान शंकराची होती. जेव्हा शंकरांनी श्रीगणेशाला स्पर्धेतील विजेता घोषित केले तेव्हा सर्व देवतांना अतिशय आश्चर्य वाटले. आम्ही तर संपूर्ण विश्वाला प्रदक्षिणा घालून परत आलो तेव्हा गणेश तर येथेच उभा होता. मग तरीही भगवान शंकरांनी, महादेवांनी त्याला विजेता का घोषित केले? सर्व देवतांच्या शंकेचे समाधान करीत भगवान शिवांनी सांगितले की, संपूर्ण ब्रह्मांडात माता-पित्याचे स्थान सर्वोच्च आहे आणि गणेशाने आपल्या आई-वडिलांभोवती प्रदक्षिणा केल्याने तो सर्व देवतांमध्ये प्रथम पूजनीय आहे. भगवान शंकरांच्या युक्तिवादाशी सहमत होत सर्वांनी त्यांचे म्हणणे मान्य केले. तेव्हापासून पृथ्वीवर श्रीगणेशाचे सर्वप्रथम पूजन केले जाते, अशी मान्यता आहे.

(पांचजन्यवरून साभार)

---

# इंडोनेशियातील ब्रोमो पर्वतावरील प्राचीन गणेशमूर्ती

## ७०० वर्षांचा वारसा

**इंडोनेशियातील माऊंट ब्रोमो येथे भगवान श्रीगणेशाची ७०० वर्षे जुनी मूर्ती आहे. या मूर्तीत दिव्य शक्ती असल्याची, स्थानिकांची श्रद्धा आहे. ही प्राचीन मूर्ती ज्वालामुखीच्या उद्रेकापासून संरक्षण देते, अशी समुदायाची धारणा आहे.**

**इंडोनेशियातील** माऊंट ब्रोमो येथे ज्वालामुखीच्या काठावर, भगवान श्रीगणेशाची ७०० वर्षे जुनी मूर्ती विराजमान आहे. इंडोनेशियात हिंदू मोठ्या संख्येत आहेत. त्यामुळे हिंदू धर्म-संस्कृतीचा येथे मोठा प्रभाव आहे. येथे भगवान गणेशाची असंख्य मंदिरे आहेत. येथे भक्त अतिशय श्रद्धायुक्त अंत:करणाने त्याचे पूजन करतात. या पवित्र स्थळांपैकी, ज्वालामुखीवर असलेली गणेशमूर्ती विशेष पूजनीय आहे. या मूर्तीत विलक्षण शक्ती अर्थात दिव्य शक्ती आहे आणि ज्वालामुखीच्या उद्रेकापासून ती आपले संरक्षण करते, अशी स्थानिक लोकांची श्रद्धा आहे.

असे मानले जाते की सुमारे ७०० वर्षांपूर्वी टेंगर मासिफ जनजातीच्या पूर्वजांनी या गणेशमूर्तीची स्थापना केली होती. स्थानिक लोक ज्वालामुखीच्या उद्रेकापासून संरक्षण मिळवण्याच्या आशेने या मूर्तीची पूजा-अर्चना करतात, तिला प्रसाद अर्पण करतात. आजही ही एक महत्त्वाची परंपरा आहे व तिचे कसोशीने पालन केले जाते. प्रार्थनेबरोबरच, भक्त पूजेचा भाग म्हणून गणपतीला फुले आणि फळे समर्पित करतात. मूर्तीची व्यवस्थित पूजा न केल्यास तिचा सन्मान करण्यात अयशस्वी झाल्यास ज्वालामुखीचा उद्रेक होऊ शकतो आणि स्थानिक समुदायाला धोका निर्माण होऊ शकतो, असा स्थानिकांचा दृढ विश्वास आहे.



इंडोनेशियामध्ये १४१ ज्वालामुखी आहेत, त्यापैकी १३० अजूनही सक्रिय आहेत. यात माऊंट ब्रोमोचा देखील समावेश आहे. 'ब्रोमो' हे नाव ब्रह्माच्या जावानीज उच्चारावरून आले आहे. इंडोनेशियात २०१२ पर्यंत १२७ सक्रिय ज्वालामुखी होते व सुमारे ५ मिलियन लोक धोक्याच्या क्षेत्रात राहत होते, असे तेथील नोंदीवरून स्पष्ट होते. माऊंट ब्रोमो हे ८०० चौरस किलोमीटर पसरलेल्या ब्रोमो टेंगर सेमेरू नॅशनल पार्कमध्ये वसलेले आहे. इंडोनेशियातील इतर ज्वालामुखींच्या तुलनेत हा लहान असला तरी त्याची उंची २,३९२ मीटर एवढी आहे. माऊंट ब्रोमोवरून अतिशय नयनरम्य दृश्य दिसत असल्याने हा पर्वत पर्यटकांना नेहमीच मोहित करतो. या पर्वताच्या उंचीपेक्षा याचे वेगळेपण, दिव्य स्वरूप आणि याच्याशी संबंधित आश्चर्यकारक गोष्टी यामुळे पर्यटकांना हा पर्वत नेहमीच खुणावतो.

(ऑर्गनायझरवरून साभार)

---



## जीवनशैली

# 'मॉर्निंग वॉक' करताना लक्षात ठेवा या ६ गोष्टी

**'मॉर्निंग वॉक' अर्थात सकाळचे/पहाटेचे चालणे-फिरणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. यामुळे तुम्हाला केवळ ताजेतवानेच वाटते असे नाही, तर वजन कमी करण्यासही यामुळे मदत होते. तसेच सकाळी पायी चालल्याने हृदयाचे आरोग्य सुधारण्यात आणि मानसिक शांती प्राप्त करण्यासाठी देखील मदत होते.**

'मॉर्निंग वॉक' अर्थात सकाळचे/पहाटेचे चालणे-फिरणे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. यामुळे तुम्हाला केवळ ताजेतवानेच वाटते असे नाही, तर वजन कमी करण्यासही यामुळे मदत होते. तसेच सकाळी पायी चालल्याने हृदयाचे आरोग्य सुधारण्यात आणि मानसिक शांती प्राप्त करण्यासाठी देखील मदत होते. पण जर ते योग्य पद्धतीने केले नाही तर त्याचा फायदा होण्याऐवजी तुमच्या गुडघे आणि सांध्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. विशेषत: गुडघ्यांवर खूप दबाव येऊ शकतो, ज्यामुळे गुडघे खराब होऊ शकतात. त्यामुळे 'मॉर्निंग वॉक' करताना काही गोष्टी लक्षात ठेवणे आवश्यक आहे. चला जाणून घेऊया 'त्या' सहा गोष्टी ज्या निरोगी गुडघ्यांसाठी लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

### योग्य बूट निवडा

मॉर्निंग वॉक करताना योग्य बूट घालणे खूप गरजेचे आहे. जर तुम्ही योग्य पद्धतीने सपोर्ट देणारे शूज घातले नाहीत तर तुमच्या गुडघ्यांवर खूप दबाव येऊ शकतो, ज्यामुळे वेदना आणि समस्या उद्‌भवू शकतात. नेहमी असे बूट घाला जे तुमच्या पायांना आणि टाचांना योग्य प्रकारे आधार देईल आणि गुडघ्यांवर कमीत कमी दबाव टाकेल.

### सपाट पृष्ठभागावर चालणे

'मॉर्निंग वॉक'साठी मार्ग निवडताना, हे लक्षात ठेवा की तो सपाट असला पाहिजे. खडबडीत आणि असमान पृष्ठभागावर चालण्याने तुमच्या गुडघ्यांवर अनावश्यक दबाव पडू शकतो, ज्यामुळे गुडघे लवकर खराब होऊ शकतात. त्यामुळे उद्यान, रस्ता किंवा इतर सपाट ठिकाणीच 'मॉर्निंग वॉक' केल्यास ते उत्तम ठरेल.

### योग्य पद्धतीने चालणे आवश्यक

व्यवस्थित, नीट, 'पद्धतशीर' चालणे खूप महत्त्वाचे आहे. तुम्ही जेव्हा चालता तेव्हा तुमच्या शरीराचा संपूर्ण भार गुडघ्यांवर असतो. जर चालण्याची पद्धत चुकीची असेल तर त्यामुळे गुडघ्यांवर अतिरिक्त दबाव येऊ शकतो. त्यामुळे चालताना तुमची पाठ सरळ ठेवा, खांदे मोकळे (रिलॅक्स) ठेवा आणि गुडघे हळूहळू वाकवून पावले उचला. यामुळे गुडघ्यांना आराम मिळेल आणि वेदना टाळता येतील.

### सुरुवातीला वेगाने चालू नका

जर आपण अचानक वेगाने चालायला सुरुवात केली तर तुमच्या गुडघ्याला धक्का लागू शकतो. तुमच्या 'मॉर्निंग वॉक'चा प्रारंभ हळूहळू करा आणि नंतर हळूहळू तुमच्या चालण्याचा वेग वाढवा. गुडघ्यांना विश्रांती देण्यासाठी मधूनमधून थांबा आणि स्ट्रेचिंग करा. यामुळे तुमच्या स्नायूंना आणि गुडघ्यांना आराम मिळेल आणि तुमचे गुडघे खराब होणार नाहीत.

### अधिक वजन उचलू नका

मॉर्निंग वॉक करताना जर तुम्ही सोबत जड बॅग किंवा इतर वजनी वस्तू सोबत नेत्या तर त्यामुळे तुमच्या गुडघ्यांवर अतिरिक्त दबाव येऊ शकतो. हे गुडघे खराब होण्याचे एक प्रमुख कारण बनू शकते. त्यामुळे मॉर्निंग वॉक करताना अधिक वजनाच्या वस्तू बाळगू नका आणि आणि शक्यतो जास्तीचे सामान टाळा.

### पाणी पिणे गरजेचे

'मॉर्निंग वॉक' करताना शरीरातील पाण्याची कमतरता गुडघ्यांवरही परिणाम करू शकते. शरीरात पाण्याची कमतरता असल्यास, सांध्यातील लुब्रिकेशन कमी होते, ज्यामुळे गुडघ्यांवर अतिरिक्त दबाव येऊ शकतो. त्यामुळे मॉर्निंग वॉकला जाण्यापूर्वी आणि नंतर पाणी अवश्य प्या जेणेकरून शरीर हायड्रेटेड राहील आणि गुडघे निरोगी राहतील.

(पांचजन्यवरून साभार)

---

## शिक्षण


शिवम दीक्षित

# आता 'अकबर महान' असे शिकवणार नाही

## राजस्थानच्या शिक्षणमंत्र्यांचे मोठे वक्तव्य

शिक्षण क्षेत्रात मोठा बदल होण्याचे स्पष्ट संकेत मिळाले आहेत. राजस्थानचे शिक्षणमंत्री मदन दिलावर यांनी एक महत्त्वाचे विधान केले असून, आता राज्यातील शाळांमध्ये 'अकबर द ग्रेट' शिकवले जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे. मंत्री दिलावर पुढे म्हणाले की, इतिहासात ज्याला महान म्हणून सादर करण्यात आले तो एक लुटारू, दरोडेखोर होता, ज्याने अनेक वर्षे देशाची लूट केली.

'मीना बाजार सुरू करणाऱ्या आणि महिलांना पळवून नेणाऱ्या अशा व्यक्तीला महान कसे म्हणता येईल? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. महाराणा प्रताप यांच्यापेक्षा कोणीही मोठा असू शकत नाही, असेही मदन दिलावर म्हणाले. 'अकबर महान' असे शिकविणारे लोकच राजस्थान आणि मेवाडचे सर्वांत मोठे शत्रू आहेत. आता राजस्थानमधील कोणत्याही पाठ्यपुस्तकात अकबराला या स्वरूपात शिकवले जाणार नाही, असे शिक्षणमंत्र्यांनी ठामपणे सांगितले.



### बदलाचा उद्देश

राज्य सरकारचे हे पाऊल म्हणजे इतिहासाच्या पुनर्लेखनाच्या दिशेने केलेला एक मोठा प्रयत्न मानला जात आहे. इतिहासातील खऱ्या नायकांना त्यांचे योग्य ते स्थान मिळाले पाहिजे, असे सरकारचे मत आहे. मोगलांविरुद्ध सातत्याने संघर्ष करणारे, कधीही स्वाभिमान न सोडणारे, कधीच शरणागती न पत्करणारे व अफाट धैर्याचा परिचय देणारे महाराणा प्रताप यांचा वास्तव इतिहास आता राज्यातील शाळांमध्ये अधिक आदराने शिकवला जाणार आहे. राजस्थानचे शिक्षणमंत्री मदन दिलावर यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळातही खळबळ उडाली आहे. राजस्थान सरकारच्या या निर्णयाचे नागरिक सोशल मीडियावर समर्थन करीत आहेत. तर दुसरीकडे या निर्णयाचा राजस्थानची शिक्षण व्यवस्था व राजकीय पटलावर काय परिणाम होतो हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे.

(पांचजन्यवरून साभार)

---

## वर्तमान

दिनेश मानसेरा

# गंगानगरी हरिद्वारमध्ये उभारली मशीद

## सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाकडे साफ दुर्लक्ष

## वक्फ बोर्डाने दिले संरक्षण



मंगलोर विधानसभा पोटनिवडणुकीच्या आडून गंगा नदीच्या किनाऱ्यावरील तीर्थनगरी हरिद्वारच्या ज्वालापूर भागात मशीद बांधण्यात आली. विशेष म्हणजे हरिद्वार विकास प्राधिकरणाचे सील तोडून त्यांनी इमारत उभी केली. जेव्हा प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी पुन्हा दुसऱ्यांदा कारवाई सुरू केली तेव्हा वक्फ बोर्डाने मशिदीचे बांधकाम करणाऱ्यांना संरक्षण दिले.

एकीकडे जिल्हा प्रशासन हरिद्वारच्या मंगलोर मतदारसंघातील पोटनिवडणूक आणि आचारसंहितेमध्ये व्यग्र असतानाच या संधीचा फायदा घेऊन मुस्लिमांनी हरिद्वारच्या मध्यभागी ज्वालापूरमध्ये मशीद उभारली. नियम व कायद्याचे सर्रास उल्लंघन होऊनही हरिद्वार विकास प्राधिकरण (एचडीए) यावेळी अक्षरश: झोपा काढत होते. सोशल मीडियावर प्रचंड गदारोळ माजल्यावर खडबडून जागे झालेल्या प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी अखेर बांधकामाला सील ठोकले. मात्र, संतापाची बाब अशी की त्यानंतरही मशिदीचे बांधकाम सुरूच होते. हरिद्वारसारख्या प्राचीन, सनातन शहरात भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांकडे साफ दुर्लक्ष करून ज्वालापूर इंटर कॉलेजच्या अगदी शेजारी आलिशान मशिदीचे बांधकाम सुरूच होते. कोणतेही नवे धार्मिक स्थळ किंवा जुन्या धार्मिक स्थळाच्या दुरुस्ती-जीर्णोद्धारासाठी जिल्हा प्रशासन किंवा हरिद्वार विकास प्राधिकरणाची परवानगी घेणे आवश्यक आहे, असे सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट निर्देश आहेत. अशा प्रकरणांवर निर्णय घेण्यासाठी जिल्हास्तरावर एक समितीही स्थापन करण्यात आली आहे. विशेष गोष्ट म्हणजे अशा प्रकरणांवर देखरेख ठेवण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाला दिले आहेत.

एवढे सगळे असूनही एवढी मोठी वास्तू आणि तीही सनातन गंगानगरीत कशी बांधली गेली? असा प्रश्न उपस्थित होतो. यापूर्वी देखील हरिद्वार कुंभमेळा परिसरात मुस्लिम समाजाने बेकायदेशीर मजार बांधली होती. त्यावर कारवाई करण्यात जिल्हा प्रशासन टाळाटाळ करीत होते. हरिद्वार महानगरपालिका क्षेत्रात कुठल्याही मुस्लिम व्यक्तीला रात्री प्रवास करण्यास, आणि घाटांवर जाण्यास मनाई आहे, असे त्यांच्या उपनियमांमध्ये (बायलॉज) लिहिलेले आहे. तरीही या सनातन नगरीत सरकारी जमिनी बळकावून आणि त्यावर धार्मिक स्थळे बांधण्याचे कारस्थान बिगर हिंदूंकडून रचले जात आहे.

हरिद्वार जिल्ह्यात मंगलोर विधानसभा पोटनिवडणुकीमुळे आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन आपल्या कामात व्यस्त आहे. याचा फायदा घेत मुस्लिम समाजाने जी पूर्वी छोटी मशीद होती ती रस्ता आणि शाळेच्या भिंतीपर्यंत आणून आलिशान मशीद बांधली आणि त्यासाठी ना जिल्हाधिकारी किंवा प्राधिकरणाची परवानगी घेण्यात आली, ना कुठला नकाशा मंजूर करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार, या प्रकरणी हरिद्वार रुरकी विकास प्राधिकरण पोटनिवडणुकीच्या निकालानंतर १० ऑगस्ट रोजी सदर इमारत पाडण्याची कारवाई करणार होती. दरम्यान, मशीद व्यवस्थापन समितीने याप्रकरणी वक्फ बोर्डाशी संपर्क साधला असता वक्फ बोर्डाने प्राधिकरणाच्या कारवाईला स्थगिती दिली. वक्फ बोर्डाने प्राधिकरणाच्या कारवाईला तर स्थगिती दिली, पण मशिदीचे बांधकाम थांबवले नाही.

**कोणतेही नवीन धार्मिक स्थळ किंवा जुन्या धार्मिक स्थळाच्या दुरुस्तीसाठी जिल्हा प्रशासन किंवा हरिद्वार विकास प्राधिकरणाची परवानगी घ्यावी लागेल, असे सर्वोच्च न्यायालयाचे स्पष्ट निर्देश आहेत. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांकडे साफ दुर्लक्ष करून उत्तराखंडमधील गंगानगरी हरिद्वारमध्ये मुसलमानांनी मशीद उभारली.**

### अवैध बांधकाम न थांबविल्यास जोरदार आंदोलन : बजरंग दल

या प्रकरणी बजरंग दलाचे प्रांत संयोजक अनुशज वालिया म्हणाले की, हिंदू तीर्थक्षेत्रात प्रशासनाच्या परवानगीशिवाय धार्मिक स्थळांचा विस्तार आम्ही मुळीच खपवून घेणार नाही. गंगा नगरी ही सनातन हिंदू धर्माची नगरी आहे. येथे अन्यधर्मीय लोक नियोजनबद्ध पद्धतीने धार्मिक स्थळे बांधत आहेत. हे अवैध बांधकाम रोखण्याची जबाबदारी प्रशासनाची असून जर बांधकाम थांबवले नाही तर जबरदस्त आंदोलन छेडल्याशिवाय राहणार नाही, असा स्पष्ट अशारा वालिया यांनी दिला.

(पांचजन्यवरून साभार)

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माणुसकीची, लोकशाही मूल्ये जपण्याची अपेक्षा व्यर्थच!

मान कधीही झुकणार नाही, मस्तिष्क भयमुक्त राहील आणि संपूर्ण समाज हा एकसंध राहील, अशी कल्पना ज्यांनी आपल्या काव्यप्रतिभेतून केली होती, त्या जागतिक ख्यातीचे कवी रवींद्रनाथ टागोर यांना आजची परिस्थिती पाहून किती वेदना होत असतील याची कल्पनाही न केलेली बरी! स्वत:चे स्वार्थी, संकुचित राजकारण यशस्वी करण्यासाठी रवींद्रनाथांची ही आभाळाएवढी उंच कल्पना मातीत घालताना ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला, डाव्या विचारसरणीच्या राजकीय नेत्यांना लाज आणि खंत कशी वाटत नाही, याचेही आता आश्चर्य वाटेनासे झाले आहे. बंगाली जनतेने सलग तीस वर्षे डाव्यांची अत्याचारी राजवट अनुभवली. तिला कंटाळून जनतेने ममता बॅनर्जी यांच्यावर विश्वास टाकला. पण, ममतांनीही भ्रमनिरास केला आहे. रवींद्रनाथांची नीतिमूल्ये, त्यांचे विचार पायदळी तुडविण्यात धन्यता मानणाऱ्या तृणमूल काँग्रेसच्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी विरोधी विचारधारेच्या लोकांवर अनन्वित अत्याचार केले आहेत. त्यांनी बंगालमध्ये राहूच नये, असे वातावरण तयार केले आहे. विशेषत: लोकसभेच्या निवडणुका झाल्यापासून भाजपाच्या कार्यकर्त्यांवर आणि संघाच्या स्वयंसेवकांवर, हिंदूंवर जे अत्याचार सुरू आहेत, ते मानवतेला काळिमा फासणारे आहेत.

बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांनी स्वत:ची सत्ता टिकवून ठेवण्यासाठी बांगलादेशी घुसखोरांना हाताशी धरले, हे फारच दुर्दैवी होय. बंगालमध्ये मुस्लिमांची संख्या ३२ टक्के आहे. ही अधिकृत आकडेवारी आहे. हिंदू नावे धारण करून अनधिकृतपणे राहणारे बांगलादेशी घुसखोर मुस्लिम किती आहेत, त्याची तर कल्पनाही न केलेली बरी. लोकसभेची निवडणूक जिंकता यावी, पश्चिम बंगालच्या विधानसभेतही भाजपाला बहुमत मिळावे, यादृष्टीने भाजपाने प्रभावी उपाययोजना आखली होती. पण, धार्मिक कट्टरवादाने भाजपाचे स्वप्न उधळून लावले. कधीकाळी बंगालवर अनभिषिक्त सत्ता गाजवणाऱ्या कम्युनिस्टांनी त्यांची मते ममता बॅनर्जी यांच्या तृणमूलकडे वळवली. जे कम्युनिस्टांनी केले, तेच काँग्रेसनेही केले. बंगालमध्ये एकदा का भारतीय जनता पार्टीची सत्ता आली तर भाजपाला सत्तेबाहेर करणे अवघड होऊन बसेल, असा विचार करून या दोन्ही पक्षांनी स्वत:चे अस्तित्व गहाण ठेवत ममतांना पुन्हा सत्तेत आणले, हे वास्तव आहे.

केंद्रात २०१४ सालापासून भाजपाचे सरकार आहे. मध्यप्रदेश (मधला अपवाद वगळता), गुजरात या राज्यांमध्ये कित्येक वर्षे झाली काँग्रेसला सत्तेत प्रवेश मिळालेला नाही. तिथे दीर्घकाळापासून भाजपाची सत्ता आहे. कारण, जनतेच्या हिताचे निर्णय करणाऱ्या भाजपाला लोकांची पसंती असते. म्हणूनच बंगालमध्ये एकदा का भाजपाची सत्ता आली तर तिथे लोकोपयोगी कामे होतील, बंगालचा औद्योगिक विकास झपाट्याने होईल, तिथल्या लोकांचे दारिद्र्य दूर होईल आणि संपन्नता येईल. असे झाले तर लोक पुन्हा पुन्हा भाजपालाच निवडून देतील, या भीतीने ग्रासलेल्या काँग्रेस आणि कम्युनिस्टांनी त्यांची मते ममता बॅनर्जी यांच्याकडे वळवल्याचे एव्हाना स्पष्ट झाले आहे. आपण आलो नाही तरी चालेल, पण भाजपा येता कामा नये, ही या पक्षांची धारणाच मुळात लोकशाहीला मारक आहे. वास्तविक, विधानसभा आणि लोकसभा निवडणूक प्रचंड मताधिक्क्याने जिंकण्याची व्यूहरचना भाजपाने अतिशय प्रभावी रीतीने केली होती. पण, विरोधकांच्या लांगुलचालनाच्या राजकारणाने भाजपाची व्यूहरचना प्रत्यक्षात येऊ शकली नाही. भाजपाला सत्तेबाहेर ठेवण्यासाठी काँग्रेस आणि कम्युनिस्टांनी स्वत:चे अस्तित्व पणाला लावले, ही बाबही लोकशाहीची थट्टा आहे.

राजकारणात असणाऱ्या राजकीय पक्षांनी प्रामाणिकपणे निवडणुका लढणे अपेक्षित असते. पण, देशात सध्या राजकारणाचा जो कल दिसतो आहे, तो भाजपाला एकटे पाडण्याचा आहे. सगळे मिळून भाजपाला पाण्यात पाहात आहेत. मोदींसारखा मजबूत नेता भाजपाकडे आहे, सातत्याने भाजपाला यश मिळत आहे, ही बाब विरोधकांना चिंता करायला लावणारी आहे. असो. ममतांच्या बंगालमध्ये सध्या जी प्रचंड दहशत आहे, विशेषत: भाजपा आणि संघाचे समर्थन करणाऱ्या हिंदूंमध्ये असुरक्षिततेची भावना आहे, ती काळजी वाढवणारी आहे. कारण, राज्याच्या प्रमुख असलेल्या ममता बॅनर्जी यांना आपल्या राज्यातील हिंदूंपेक्षा बांगलादेशी घुसखोरांची काळजी आहे. त्यांच्या कृतीवरून ते दिसूनही आले आहे. खबरदार, बांगलादेशी घुसखोरांना कुणी हात लावलात तर, असा इशाराही ममता बॅनर्जी यांनी गतकाळात दिला होता. ममता बॅनर्जी या हुकूमशाही वृत्तीच्या नेत्या आहेत. त्यांच्या विरोधात बोलणाऱ्याला त्या सोडत नाहीत. बंगालमध्ये भाजपाच्या कित्येक नेत्यांवर आणि कार्यकर्त्यांवर प्राणघातक हल्ले झालेत, त्यात अनेकांचा मृत्यूही झाला. हल्ले करणारे बांगलादेशी घुसखोर आणि तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्तेच आहेत, हे लपून राहिलेले नाही. आजही बंगालमधील तृणमूलविरोधक हिंदू समाजमन भयकंपित आहे. कारण, मोठ्या प्रमाणात अत्याचार होत आहेत.

एवढ्या मोठ्या प्रमाणात अत्याचार होत असताना, निष्पाप लोकांच्या हत्या होत असताना स्वयंघोषित पुरोगामी निषेधाचा एक शब्दही काढायला तयार नाहीत. पत्रकारितेतही काही स्वयंघोषित पुरोगामी आहेत. ते स्वत:च्या सोयीनुसार लेखणी चालवत असतात. भाजपाशासित राज्यांमध्ये कुठे खुट्ट जरी वाजले तरी यांचे कान टवकारलेले असतात आणि लिहिण्यासाठी लेखणी सिद्ध झालेली असते. पण, भाजपेतर राज्यात कितीही हत्या झाल्यात, कितीही लोकांच्या घरांना आगी लावल्या गेल्यात तरी ही मंडळी मिठाची गुळणी करून गप्प बसली असतात. यांच्या लेखणीची आणि वाणीची धार बोथट झालेली असते. ममता बॅनर्जी दिल्लीचा दौरा करतात, पत्रकार परिषद घेतात तेव्हा बंगालमधील हिंसाचाराविषयी एकही पत्रकार त्यांना साधा प्रश्नदेखील विचारत नाही, यावरून पुरोगामी पत्रकार किती प्रतिगामी आहेत, हे सहज लक्षात येते. पुरोगामी लोक कधीही एकाची बाजू घेत नाहीत. ते अन्यायाविरुद्ध आवाज उठवत असतात. ते कधीच कुणाचा द्वेष करीत नाहीत. मात्र, डाव्यांनी ज्यांना उजवे ठरवले आहे, त्या जमातीच्या एखाद्या पत्रकाराने प्रश्न विचारण्याचे धाडस जरी दाखवले, तर त्याला एकाकी पाडण्यासाठी स्वयंघोषित पुरोगामी पत्रकारांची फौज एकवटली असते, हे निश्चित!

याउलट, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ जेव्हा जेव्हा पत्रकार परिषदा घेतात, तेव्हा जाणीवपूर्वक त्यांना उत्तरप्रदेशातील कथित घटनांबाबत प्रश्न विचारून सतावून सोडले जाते, जाणूनबुजून हिंदू-मुस्लिम शब्द वापरात आणले जातात आणि त्यांच्या तोंडून अनवधानाने एखादा वेगळा शब्द निघाला तर त्याचे भांडवल करून भाजपाला आणि कारण नसताना संघ परिवाराला वादात अडकवण्याचे कारस्थान केले जाते. हा अनुभव आहे.

## कटाक्ष

**गजानन निमदेव**

बंगालमध्ये हजारो निष्पाप लोकांची हत्या झाली, असंख्य लोकांना पलायन करावे लागले, अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार करण्यात आले, गेल्या चारपाच महिन्यांत असंख्य लोकांना धमकावण्यात आले. जगविख्यात कवी रवींद्रनाथ टागोरांच्या राज्यात या घटना घडल्या आहेत. कुणी घडवून आणल्या, हे संपूर्ण देशाला माहिती आहे. सत्तेसाठी काहीही करायला तयार असलेल्या ममता बॅनर्जी यांनी आणि त्यांच्या तृणमूल काँग्रेसने लोकशाही मूल्ये पायदळी तुडविली आहेत. व्वा ममता बॅनर्जी! आता तुम्हाला दीदी म्हणण्याचीही लाज आम्हाला वाटायला लागली आहे. तुम्हाला दीदी म्हणावे असे कोणतेही चांगले वर्तन तुमच्याकडून घडताना दिसत नसल्याने तुमची दीदी ही उपाधी आम्ही काढून घेत आहोत, असे ठासून सांगण्याची वेळ आली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या निकालांनंतर आणि आताही तृणमूलच्या गुंडांनी केलेला अत्याचार ममतांना दिसला नाही. हा अत्याचार म्हणजे भाजपाचे नाटक असल्याचा कांगावा करताना ममतांना थोडी लाजही कशी वाटली नाही. एक महिला एवढी क्रूर कशी असू शकते? बंगालमध्ये मिळालेल्या पाशवी विजयानंतर तृणमूलच्या गुंडांनी प्रचंड मनमानी करीत हिंसाचार केला, भाजपाच्या कार्यकर्त्यांना, त्यांच्या कुटुंबीयांना लक्ष्य केले, त्याबाबत कुणी काही बोलायचेही नाही? ममता, काँग्रेस, डावे यांना सामान्य माणसाशी काहीही देणेघेणे नाही. त्यांना त्यांची राजकीय पोळी शेकायची आहे, आपला उल्लू सीधा करून घ्यायचा आहे. म्हणूनच मोदीविरोधाने आंधळे झालेल्या कुणाकडूनही माणुसकीची, लोकशाही मूल्ये जपण्याची कसलीही अपेक्षा करणे व्यर्थच!

# पाकिस्तान-चीनची अभद्र युती तोडलीच पाहिजे!

आपल्या शेजारचे दोन मोठे देश पाकिस्तान आणि चीन भारताविरुद्ध मोठे कारस्थान करीत आहेत. या दोन देशांमध्ये झालेली युती ही अभद्र आहे. सर्व दिशांनी भारताला घेरण्यासाठी या दोन्ही देशांचे प्रयत्न सुरू आहेत. आशियात भारताचे वर्चस्व स्थापित होऊ नये यासाठी हे दोन देश परस्परांना सहकार्य करीत आहेत. पाकिस्तानने काश्मीरचा भाग बळकावला आहे, तर चीनने अरुणाचल प्रदेशचा. या दोन्ही देशांचे कारस्थान मोडून काढण्यासाठी भारताला आता झपाट्याने पावलं उचलावी लागणार आहेत. स्वत:ची राष्ट्रीय सुरक्षा आणि ऊर्जेसंबंधीची स्थिती मजबूत केल्याशिवाय भारत विश्वशक्तीही बनू शकणार नाही आणि दक्षिण आशियात शांतता प्रस्थापित करण्यातही यशस्वी होऊ शकणार नाही.

भारताच्या सुरक्षेला चीन आणि पाकिस्तान या दोन्ही देशांपासून धोका आहे. या दोन्ही देशांनी केवळ भारताचा भूभागच बळकावला आहे, असे नव्हे, तर बळकावलेल्या भागांचे आदानप्रदानही त्यांनी सुरू केले आहे. शिवाय, भारत सुरक्षेच्या दृष्टीने आज ज्या आव्हानांचा मुकाबला करीत आहे, ते लक्षात घेता चीन आणि पाकिस्तान यांच्यातील अभद्र युतीकडे दुर्लक्ष करूनही चालणार नाही. चीनमध्ये आज हुकूमशाही असल्यासारखीच आहे. तिथे लोकशाही नाही. त्यामुळे चीनमध्ये जोपर्यंत लोकशाही मूल्यांची स्थापना होत नाही आणि मूलभूत हक्कांपासून वंचित ठेवणाऱ्या हुकूमशाहीला मुळासकट उखडून फेकले जात नाही, तोपर्यंत दक्षिण आशियात शांतता नांदू शकणार नाही.

पाकिस्तानने अण्वस्त्र प्रसार चालविला आहे आणि चीन साम्राज्यवादी वृत्तीचा असल्याने समस्या अधिकच गंभीर बनत चालली आहे. पाकिस्तानी सैन्याची वर्तणूक लक्षात घेतली तर अतिरेक्यांचा एक मोठा गट असेच त्या सैन्याचे वर्णन करावे लागेल. आपली अमर्याद सत्ता कायम राखण्यासाठी पाकिस्तानी सैन्य कोणत्याही थराला जायला तयार असते. पाकिस्तानी सैन्याने अफगाणिस्तानात जे अत्याचार केलेत ते जगजाहीर आहेत. शिवाय, ७० च्या दशकात पाकिस्तानी सैन्याने बंगाल्यांवर जे अनन्वित अत्याचार केलेत ते क्रूर या प्रकारात मोडणारेच होते. सध्या कथित चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरच्या नावाखाली बलुचिस्तानमधील लोकांवरही पाकिस्तानकडून अत्याचार केले जात आहेत. बलुचिस्तानमधील सोने, तेल आणि गॅसवर डल्ला मारण्यासाठी पाकिस्तानकडून ग्वादर प्रांतात बंदर उभारले जात आहे आणि तिथल्या भूभागावर रस्ते तयार केले जात आहेत, रेल्वेमार्ग तयार केला जात आहे, तसेच पाईपलाईन टाकल्या जात आहेत. या कथित ग्वादर मेगा प्रोजेक्टच्या नावावर बलुचिस्तानमध्ये दोन देशांमधील १० कोटी लोकांना वसविण्याचा पाकिस्तान-चीनचा कट आहे. पाकिस्तानने कब्जा केलेल्या बलुचिस्तानात मूळ बलुची लोकांची संख्या फक्त दोन कोटी आहे. त्यांचाच प्रांत असलेल्या बलुचिस्तानातून मूळ बलुची लोकांना हुसकावून लावण्याची पाकिस्तानी सैन्याची योजना आहे. अतिशय सुनियोजित पद्धतीने पाकिस्तानी सैन्य बलुचींना हुसकावून लावत आहे. असेच सुरू राहिले तर आपल्या काश्मीरमधून जसे सगळे पंडित विस्थापित झाले, तसेच सगळे बलुची लोक बलुचिस्तानातून लवकरच विस्थापित होतील, अशी भीती आहे. चीनची मर्जी सांभाळण्यासाठी पाकिस्तान चीनला बंदर तयार करून देत आहे आणि बळकावलेला बलुचिस्तान प्रांतही देण्याची योजना आहे. आपले हे कृत्य बिनबोभाट करता यावे यासाठी पाकिस्तानी सैन्याकडून जी कारवाई केली जात आहे, त्यात आतापर्यंत लाखो बलुची लोकांवर अत्याचार झाले आहेत. काहींची हत्या झाली, काही महिलांवर बलात्कार झाले, काहींचे अपहरण झाले. पाकिस्तानी सैन्याकडून होत असलेल्या अनन्वित अत्याचाराला बलुची लोक बळी पडले आहेत. तसे तर बलुची लोक १९४७ पासूनच पाकिस्तानी सैन्याच्या अत्याचाराचा मुकाबला करीत आहेत. लाखो बलुची लोक त्यात मारले गेले आहेत. आता जे दीडदोन कोटी उरले आहेत, त्यांना लवकरच संपविण्याचा कट पाकी सैन्य अमलात आणत आहे. अशी परिस्थिती असतानाही बलुचिस्तानमधील जनता 'आझादी'साठी कोणत्याही आंतरराष्ट्रीय मदतीशिवाय पाकिस्तानी सैन्याशी लढत आहे. पण, पाकिस्तानच्या ताकदीपुढे बलुची लोकांची ताकद कमी पडत आहे.

दक्षिण आशियातील बहुतांश देशांवर जेव्हा इंग्रजांची राजवट होती, तेव्हाही बलुचिस्तान हा एक स्वतंत्र देश होता. बलुचिस्तानला एक निर्धारित अशी सीमा होती, घटना होती, संसदही होती आणि तिथे कायद्याचे राज्य होते. पण, भारताची फाळणी झाल्यानंतरच्या काळात पाकिस्तानने बलुचिस्तानवर हल्ला केला आणि तो प्रदेश बळकावला. पाकने हल्ला करण्याआधी बलुचिस्तानने पंडित नेहरूंना हस्तक्षेप करण्याची विनंती केली होती. पण, नेहरूंनी ती फेटाळून लावल्याने पाकिस्तानचा हल्ला यशस्वी झाला आणि बलुचिस्तानवर पाकिस्तानला कब्जा करता आला. आता पाकिस्तान स्वत:च्या स्वार्थासाठी आणि भारताला घाबरवण्यासाठी हाच बलुची प्रांत चीनला आंदणात द्यायला निघाला आहे. चीनला खुश करून आपल्या बाजूने वळवायचे आणि भारताला डिवचायचे हाच एकमेव उद्योग पाकिस्तानने चालविला आहे. त्यावेळी नेहरूंच्या नेतृत्वातील भारताने हस्तक्षेप केला असता अन् ठोस पावलं उचलली असती तर कदाचित बलुचिस्तान आजही स्वतंत्र देश राहिला असता. पण, नेहरूंनी धाडस दाखविले नाही. आज बलुचिस्तान हा स्वतंत्र देश असता तर त्याचा भारताला भरपूर फायदा झाला असता. बलुचिस्तानशिवाय पाकिस्तान जगूच शकत नाही. बलुचिस्तान जर पाकिस्तानच्या ताब्यात नसते तर पाकिस्तानची आर्थिक स्थिती आणखी बिकट झाली असती. अजूनही बलुचिस्तानला स्वतंत्र केले तर पाकिस्तान एक भिकारी देश बनेल यात शंका नाही.

आपल्याकडे नैसर्गिक साधनसंपत्ती मोठ्या प्रमाणात आहे असा दावा पाकिस्तान केवळ बलुचिस्तानच्या भरवशावरच करत आहे. त्यामुळे बलुचिस्तानला पाकिस्तानच्या तावडीतून मुक्त करणे हा प्राधान्यक्रम असला पाहिजे. १९४० साली मुस्लिम लीगने जेव्हा स्वतंत्र पाकिस्तानची कल्पना मांडली होती, तेव्हा असा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता की पाकिस्तान आर्थिकदृष्ट्या कमजोर राहील. पण, त्यावर मुस्लिम लीगच्या नेत्यांनी अतिशय निर्लज्ज युक्तिवाद केला होता. स्वतंत्र पाकिस्तान बलुचिस्तानवर आक्रमण करून ताबा मिळवेल अन् स्वत:ला साधनसंपन्न करेल. तो युक्तिवाद पाकिस्तानने खराही करून दाखविला. यावरून हेच स्पष्ट होते की निर्मितीच्या आधीपासूनच पाकिस्तानचा बलुचिस्तानवर डोळा होता. बलुचिस्तानातील लोक आजही 'आझादी'ची लढाई लढत आहेत आणि त्यांना भारताकडून अपेक्षा आहेत. पण, आंतरराष्ट्रीय समुदायाच्या दडपणामुळे भारत बलुचला मदत करू शकेल का, हा प्रश्नच आहे. बलुचिस्तान हे एक धर्मनिरपेक्ष राष्ट्र होते आणि आता स्वतंत्र झाल्यावरही ते तसेच राहील यात शंका नाही. बलुचिस्तानला स्वतंत्र करण्यासाठी अमेरिकेने पुढाकार घेतला तर भारतालाही मदत करणे शक्य होऊ शकते. दहशतवादाविरुद्धची लढाई यशस्वी करण्याची अमेरिकेची प्रामाणिक इच्छा असेल तर अमेरिकेने बलुचिस्तानवर झालेला अन्याय दूर करण्यासाठी पाकिस्तानवर दबाव आणला पाहिजे. अन्यथा, अमेरिका दहशतवादाच्या बाबतीत दुटप्पीच भूमिका घेते आहे, हेच अधोरेखित होईल. जेवढे म्हणून प्रगत पाश्चिमात्य देश आहेत, ते ढोंगी आहेत. मानवाधिकाराच्या बाता तर ते मारतात. पण, प्रत्यक्षात त्यांना सोयीचे नसेल तिथे ते काहीच बोलत नाहीत. मानवाधिकाराच्या नावाखाली भारतासारख्या देशांची गळचेपी करण्यात हे देश वस्ताद आहेत. युरोप आणि अमेरिकादी देश भारताला शहाणपणा शिकवतात. मात्र, स्वत:वर वेळ आली तर मानवाधिकाराचे सर्रास उल्लंघन करतात. अमेरिकेने ट्विन टॉवरवरील हल्ल्याचा बदला घेताना इराक आणि अफगाणिस्तानवर जे हल्ले केलेत, त्यात हजारो निष्पाप नागरिकही मारले गेले होते, याचा अमेरिकेलाही विसरच पडलेला दिसतो. त्यामुळेच भारताने आंतरराष्ट्रीय दबावाचा विचार न करता आपल्याला योग्य वाटेल तो निर्णय घेतला पाहिजे. चीन आणि पाकिस्तानची अभद्र युती कशी तोडता येईल, यावर चिंतन करून त्यादिशेने यशस्वी प्रयत्न करायला हवेत.

## रविवारची पत्रे

### मुख्यमंत्रिपदाची अवाजवी लालसा

पाच वर्षांपूर्वी साधे भोळे, राजकारणाची फारशी जाण नसलेले उद्धव ठाकरे शिवसेना भाजपाच्या भांडणात सहज गळाला लागतील, हे पाहून सत्ता हातात घेण्याची संधी सोडायची नाही असे शरद पवारांनी ठरवले व स्वार्थी, मतलबी शरद पवारांनी उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाची लालूच दाखवून मुसलमानांची मांडलिक असलेल्या काँग्रेसशी शिवसेनेला हात मिळवणी करण्यासाठी भाग पाडले. मुख्यमंत्रिपद तर मिळाले पण त्यामुळे नक्कीच जाज्वल्य हिंदुत्वाचा नेहमी सतत विचार करणाऱ्या बाळासाहेब ठाकरे यांना स्वर्गातसुद्धा किती क्लेश झाले असतील, किती यातना झाल्या असतील याचा विचार बाळासाहेबांच्या सपूताच्या सतत मनात झोपेत अजूनही घोळत नसेल, हे खरे वाटत नाही. मुख्यमंत्रिपदाच्या लालसेपोटी आपल्या वडिलांचे विचार धुडकावून टाकल्याची सततची टोचणी त्यांना अजूनही खात असल्यास नवल नाही. ती जन्मभर त्यांची पाठराखण करणार, हे नक्की. कारण संपूर्ण महाराष्ट्रभर बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वासाठी जो नावलौकिक होता, जो दरारा होता, जो धाक होता, जी जरब होती ती उद्धव ठाकरे यांनी भूईसपाट केली, नेस्तनाबूत केली, उद्ध्वस्त केली. मात्र, याबाबत शरद पवार, राहुल गांधी छद्मीपणे अनेक वेळा मनातल्या मनात हसले असल्यास नवल नाही.

फक्त आपल्या स्वार्थासाठी म्हणजे भाजपाला धडा शिकवण्यासाठी भाजपाचे २०१९ मध्ये १०५ आमदार येऊनही त्यांना न्यायाने मिळणारे मुख्यमंत्रिपद न देता दोन हिंदुत्ववादी पक्षांमध्ये वैर निर्माण करणाऱ्या शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला आणि काँग्रेसला जाऊन मिळणे म्हणजे बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्व विचारांना तिलांजली देण्यासारखेच होते. शरद पवारांनी त्यावेळी साध्या भोळ्या उद्धव ठाकरे यांना गळाला मुख्यमंत्रिपदाचे पॉपलेट लावून अलगद गळात अडकवले व आपला सत्ता हस्तगत करण्याचा डाव साधला. शरद पवारांच्या भूमिकेला संजय राऊतांनी त्यांच्याकडे डोळे मिचकावून उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदाच्या हरभऱ्याच्या झाडावर चढवले व असंगाशी संग करायला लावले. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. बाळासाहेब ठाकरे यांच्या तालमीत हिंदुत्वावर निष्ठा आणि हिंदुत्वाबद्दल स्वाभिमान असणाऱ्या खऱ्या ४० शिवसैनिकांची घुसमट, गळचेपी झाल्यामुळे त्यांनी आपला पूर्वीचा सहकारी भाजपाशी सलोखा करून जो अन्याय शरद पवारांनी केला होता आणि स्वार्थी डाव खेळला होता, जी चलाखी शरद पवारांनी केली होती त्याला काटशह देऊन ती अडीच वर्षे उशिराने का होईना पण बाळासाहेब ठाकरे यांना शांती मिळावी यासाठी सच्च्या ४० शिलेदारांनी उद्धव ठाकरे यांनी केलेली चूक यशस्वीपणे दुरुस्त केली व शरद पवारांचा कपटी डाव उधळून लावला. यालाच म्हणतात बाळासाहेबांचे सच्चे हिंदुत्ववादी शिवसैनिक! हे सर्व आठवायचे कारण म्हणजे नाहीतरी सुरुवातीला किंगमेकरची भूमिकाच उद्धव ठाकरे यांना बाळासाहेबांसारखीच बजवायची होती. आदित्य ठाकरे यांनाच मुख्यमंत्री करायचे होते पण मुख्यमंत्री म्हणून आदित्य ठाकरे यांच्यासमोर जाणे शरद पवार व इतरांना मानहानिकारक झाले असते. म्हणून उद्धव ठाकरे यांनाच मुख्यमंत्रिपदासाठी शरद पवारांनी भरीस पाडले. त्यानंतर अडीच वर्षे खरी सत्ता राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस यांनीच उपभोगली. गुळाचा गणपती म्हणून उद्धव ठाकरे मातोश्रीवर मुख्यमंत्री होते. या सर्व गोष्टींचा ऊहापोह यासाठी करायचा की त्यावेळी शिवसेनेने सत्तेसाठी शरद पवारांचा हात धरला आणि शिवसेनेची वाताहात करून घेतली. त्यात सत्तेसाठी संजय राऊत बरोबर येत असतील तर नाहीतर त्यांना डावलून स्वतःच्या बुद्धीने अजूनही उद्धवजींनी भाजपाचा हात धरावा व शिवसेनेची धूळधाण करणाऱ्या बाळासाहेब यांच्या शिवसेनेला नेस्तनाबूत करणाऱ्या शरद पवारांचा हात आणि साथ सोडून चुकीचे परिमार्जन करावे व अशक्य ते शक्य करून दाखवून पाच वर्षांपूर्वीची परिस्थिती निर्माण करावी व बाळासाहेबांसारखी शिवसेनेची सर्वेसर्वा म्हणून उद्धव ठाकरे यांनी भूमिका बजवावी व मातोश्रीवर बसून सर्वदूर शिवसेनेवर लक्ष ठेवावे व मातोश्रीला शिवसेनेचे पूर्वीचे वैभव प्राप्त करून द्यावे ज्याची शरद पवारांमुळे वाट लागली. एवढी हिंमत उद्धव ठाकरे दाखवतील का? नव्हे झालेल्या चुकीबद्दल जी अजूनही भोवते आहे. बाळासाहेबांच्या पैतृक ऋणातून मुक्त व्हायचा हाच खरा मार्ग आहे. स्व. बाळासाहेब ठाकरे उद्धव ठाकरे यांना त्यांनी योग्य वाटचाल करावी यासाठी बुद्धी देतील का? की उद्धव ठाकरे यांच्या नशिबी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचे पाईक म्हणून आता नेहमी करता राहणेच नशिबी आहे, हे काळच ठरवेल! मला वाटतं उद्धव ठाकरे यांनी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांचे उदाहरण लक्षात घ्यावे.

**प्रा. अनिल पळणीटकर**/९३७३२१३६१०

### लाडकी बहीण...

महाराष्ट्रात सध्या लाडकी बहीण, लाडका भाऊ, किसान सन्मान निधी, आयुष्मान भारत, महात्मा फुले इत्यादी शासकीय योजनांचा सुळसुळाट सुरू आहे. राज्य व केंद्र शासनाचे या योजना राबवण्याचे धोरण अतिशय वाखाण्ण्याजोगे आहे. या योजना राबवताना शासनाने निश्चितच सकारात्मक विचार केला असेल. 'लाडकी बहीण'ला माता-भगिनींचा प्रचंड प्रतिसाद आहे. तोही इतका प्रचंड की घरकाम करणाऱ्या बायका ८-८ दिवस सुटी घेऊन कागदपत्रे व इतर प्रक्रियेसाठी धावपळ करीत होत्या.

परवा एक शेतकरी भेटला. मी म्हटलं, काय म्हणते पीक पाणी, तर म्हणे काही नाही भाऊ सोयाबीन फेकलं आहे. आलं तितकं आलं आपण टेन्शन घेत नाही. ६ एकर जमीन आहे. २-२ एकर माझ्या आईच्या आणि बायकोच्या नावाने आहे. ६-६ हजार प्रत्येकी वर्षाचे मिळतात. आता लाडकी बहीणमध्ये बायको आणि आई दोघीही आहेत. रेशनकार्ड वेगवेगळे करून टाकले आहेत. म्हणजे १८-१८ हजार वर्षाचे मिळणार हे नक्की. बाकी अतिवृष्टी आणि इतर समस्यांसाठी आम्ही पीकविम्याचे १०-१५ हजार वेगळे जमवतो. म्हणजे किसान सन्मान, लाडकी बहीण आणि पीक विमा मिळून आम्हाला ७० एक हजार मिळतील. म्हणजे ५-६ हजार रुपये महिना. बाकी पीक जे येईल ते बोनस. शिवाय धान्य फुकटचे शासन देतच आहे आणि कर्जमाफी आणि मेडिकल फॅसिलिटी तर आहेच, आपलं मस्त चाललंय्.

अशा योजनांना चालना देऊन शासन आपल्याच पायावर धोंडा पाडून घेत आहे. बेरोजगारीच्या नावाने बोंबा मारणारे लोक शासनाच्या अशा योजनांचा पुरेपूर लाभ घेत आहेत. या सर्व योजनांचा कहर म्हणजे लाडकी बहीण योजना. फुकटचे



१८,००० मिळवण्यासाठी सर्व महिलांमध्ये चढाओढ आहे. सत्ताधारी पक्ष कार्यकर्ते तनमनधनाने, तत्परतेने या महिलांना सहकार्य करत आहेत. इतकंच काय, मी काही उच्चभ्रू सुशिक्षित महिलांनासुद्धा रांगेत बघितले आहे. मुळात असे फुकटचे पैसे देऊन जनतेला निष्क्रिय करणे हे कितपत योग्य आहे?

मी विद्यार्थी चळवळीतला आणि शिक्षण क्षेत्रात काम करणारा कार्यकर्ता आहे. सध्या शिक्षण क्षेत्रात सर्व शाळा-महाविद्यालयांमध्ये वर्ग-३ आणि वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांचा प्रचंड तुटवडा आहे. शासनाला पैसेच वाटायचे आहेत तर अशा महिलांना दिवसाला फक्त १-१ तास शिफ्ट वाटून स्थानिक शाळा-महाविद्यालयांत कामे दिली आणि हे पेमेंट त्या-त्या खात्याकडून वळते केले तर लाखो विद्यार्थी आणि शाळा, महाविद्यालये, विद्यापीठांवर अनंत उपकार होतील आणि फुकटचे पैसे घेऊन महिलांना आपला सन्मान गमावण्याची वेळ येणार नाही. माझ्या या लिखाणामुळे विद्यमान शासक, पक्ष कार्यकर्ते, विशेषतः महिला निश्चितच नाराज होतील. परंतु असे पैसे वाटण्यापेक्षा रोजगार निर्मितीसाठी काही प्रयत्न व्हावेत, ही इच्छा. जेणेकरून भविष्यात निष्क्रिय पिढी निर्माण होणार नाही. गेल्या लोकसभेच्या निकालावरून सत्ताधाऱ्यांना हे लक्षात यायला हवे की, मतदारांना कितीही योजना, पैसे वाटा त्यांना जे करायचे तेच करतात. कारण, लोकसभा निवडणुकीपूर्वी शासनाने पेट्या, भांडीकुंडी, शिलाई मशीन, बचतगटांना पैसे इत्यादी भरपूर वाटले. पण फलित काय, आज पण शासकांना असे वाटत असेल की पैसे वाटल्याने मतदान मिळेल तर ते चूक आहे, सत्ताधारी पक्षांना तीव्र आत्मचिंतनाची गरज आहे.

**उत्पल टोंगो**/७५०७६२२५८४

### आकाशवाणीने पुन्हा जुन्या रूपात यावे!

आज व्हॉट्सॲपवरील एका कट्ट्यावर आकाशवाणीच्या संगीतातील विविध प्रकारांतील कलावंतांसाठी ऑडिशनची सूचना वाचली. ही सूचना नागपूर विभागातील कलावंतांसाठी होती. सूचना वाचून आनंद झाला. कदाचित सोशल मीडियावर अशा प्रकारची सूचना मी पहिल्यांदाच बघितली असावी. आकाशवाणीवर त्यांच्या ऑडिशनची माहिती पूर्वी नेहमी यायची, मात्र या सूचनेमुळे नागपूर आकाशवाणीमध्ये स्थानिक कलावंतांसाठी काही कार्यक्रम होतात, हे वाचून आनंद झाला आणि मग आकाशवाणीवरील दिवस आठवले. एक काळ होता आकाशवाणी हा दैनंदिन जीवनाचा एक भाग होता, सकाळी संगीताच्या तालावर, बातम्यांच्या माहितीवर दिवस जात होता अनेक महिला तर स्वयंपाक घरात रेडिओवर कायम गाणी ऐकत, आकाशवाणी नागपूरवर सर्वच भागांमध्ये स्थानिक कलावंतांची मांदियाळी असायची मात्र हळूहळू आकाशवाणीवरील कार्यक्रमांमध्ये स्थानिक कलावंतांचा सहभाग जवळपास कमी झाला. याला जबाबदार कोण? सरकारची पॉलिसी नभोवाणी विभागाची कार्यशैली की नागपूर आकाशवाणीच्या कार्यक्रम अधिकाऱ्यांचा निरुत्साहीपणा, निष्काळीपणा? एक काळ होता ज्यावेळी नियमितपणे रविवारी, गुरुवारी नभोनाट्य सादर होत. महिलांच्या अनेक कार्यक्रमांमध्ये भगिनींचा सहभाग असायचा. विविध क्षेत्रातील कार्यरत महिलांना त्यात आवर्जून आमंत्रण असायचं. तरुणांसाठी युवावाणी आणि बालांसाठी बालविहार हे सर्व कार्यक्रम आता इतिहास जमा झाले आहेत, याकरता आकाशवाणीच्या कार्यकर्त्यांनी किंवा स्थानिक अधिकाऱ्यांनी काय प्रयत्न केले, हा एक प्रश्न आहे. काही वर्षे मी जेव्हा नैमित्तिक करारावर आकाशवाणीवर उद्घोषक म्हणून काम करत होतो त्यावेळी एक आकाशवाणीचे संचालक होते. एक साधं पोस्टकार्ड आकाशवाणीत आलं की, दुपारी दक्षिणात्य संगीताचा कार्यक्रमाचा सहभाग असावा. एवढ्या एका पोस्ट कार्डवर त्या कार्यशील अधिकाऱ्यांनी एक तासाचा रोजचा दाक्षिणात्य संगीताचा कार्यक्रम सुरू केला, याचा अर्थ असा की आकाशवाणी संचालकांनी मनात आणलं तर ते काहीही करू शकतात, नभोनाट्याच्या बाबतीत जनार्दन शिंदे, गुणवंत थोरात हे आवर्जून चांगल्या चांगल्या लेखकांना आमंत्रित करून त्यांच्याकडून लिहून घ्यायचे. नागपूरपुरतेच त्याचे सादरीकरण मर्यादित न राहता ते संपूर्ण महाराष्ट्रात त्याचं सादरीकरण व्हायचं, तेही आता संपल, ज्याप्रमाणे आकाशवाणीच्या संगीत विभागाची ऑडिशनची सूचना आहे तशी नभोनाट्यासाठी ऑडिशन देऊन बी ग्रेड, बी प्लस, ए ग्रेड, ए प्लस अशी आवाजाची परीक्षा उत्तीर्ण केली पण कार्यक्रमाचं काय? त्याबद्दल मात्र उदासीन असाच हा उपक्रम असावा का? बालांसाठी अनुराधा जोशी, अरविंद जागीरदार अशी नाव आजही स्मरणात आहेत. पुढे पुढे जे कलावंत त्या ठिकाणी भेटी देतात अशांनाच कार्यक्रम मिळायचे त्यापुढे जाऊन तर काही मर्जीतील लोकांनाच कार्यक्रम मिळत गेली, पण तेही आता नाहीच असं म्हणावं लागेल. याबाबत सध्याच्या आकाशवाणीतील कार्यरत आकाशवाणी संचालकांनी निश्चित आपली भूमिका मांडावी, पुन्हा स्थानिक कलावंतांना त्यांच्या गुणांना वाव देणारे कार्यक्रम सुरू करावेत जेणेकरून आकाशवाणीचा श्रोता वर्ग वाढेल आणि अशा व्हॉट्सॲप दुनियेत आपली जाहिरात करून किंमत करावी लागणार नाही.

**संजय पेंडसे**/९४२२४४३२९५

### वास्तव की अवास्तव

प्रचलित दूरदर्शन मालिका आणि चित्रपट वास्तवापासून 'दूर' राहून चित्रीकरण करतात. कथानुषंगाने चित्रित झालेल्या प्रसंगात अपघात झालेल्या व्यक्तीला 'सिटी हॉस्पिटल' या अद्ययावत महागड्या खाजगी, सर्व सुखसोयींनी युक्त अशा हॉस्पिटलच्या आय. सी. यू. अर्थात 'अतिदक्षता विभागात' दाखल केले जाते. त्या विभागात केवळ 'क्रिटिकल' म्हणजे जीवन-मरणाच्या सीमारेषेवर असणाऱ्या व्यक्तींची देखभाल अपेक्षित असते. तज्ज्ञ वैद्यकीय चमू चोवीस तास रुग्णाची तपासणी, विविध मॉनिटर्स व तपासणीद्वारे करून योग्य उपचार करीत असतात. प्रत्येक बाबतीत जागरूकता दाखविली जाते. आगंतुकांना प्रवेश निषिद्ध असतो. केवळ जवळचे नातेवाईक ओळखीनंतर प्रवेश करू शकतात, हे सर्वविदितच आहे. मालिकेत मात्र या यंत्रणेला छेद देऊन खलनायक अथवा खलनायिका राजरोसपणे ही 'सुवर्ण संधी' साधून त्या व्यक्तीला यमसदनी पाठवण्यास उत्सुक असतात. दुष्कृत्यासाठी सहजपणे वावरतात. ऑक्सिजन मास्क काढणे, निषिद्ध इंजेक्शनचा वापर करणे इत्यादी. अत्यवस्थ अगदी 'भगवान भरोसे' टाकून वैद्यकीय मंडळी रान मोकळे सोडून जातात किंवा इतर कामात व्यस्त असल्याचे दाखवितात. हा अतिदक्षता विभाग की मृत्यूचा सापळा वाटावा अशी परिस्थिती. असले प्रसंग कथेची 'मागणी' असेलही कदाचित, पण त्यासाठी वेगळी 'मांडणी' अंगीकारता येऊ शकते. अवास्तव चित्रीकरणाने जनमानसात चुकीचा संदेश प्रस्तुत होऊ शकतो. एका गाजलेल्या मराठी मालिकेत एक अशिक्षित गुंड व्यक्ती पिस्तुलाच्या धाकावर डॉक्टरांना 'मृत घोषित केलेल्या' रुग्णावर डी-फिब्रीलेटर वापरण्यास सांगतो. आणि गंमत म्हणजे बाई चक्क जिवंत झाल्याचे दिसते. त्यावर सुशिक्षित, सुविद्य डॉक्टर त्याचे आभार मानतात. मेडिकल रिपोर्टसचा हवा तो गोंधळ घालणे जणू डाव्या हाताचा मळच असतो या खलप्रवृत्ती मंडळीचा. त्याशिवाय कथेला पूर्तता येत नसावी. आजकाल उपलब्ध असलेल्या प्रेग्नन्सी टेस्टद्वारे मातृत्वाची खात्री पटत असेल तर गैरसमजापोटी घटस्फोटापर्यंतची वेळ का दाखवण्यात यावी, हेच आकलन होत नाही. तेही सुशिक्षित जोडप्यात?

संबंधित व्यक्तींनी या बाबतीत थोडी खबरदारी घेऊन किंवा तारतम्य बाळगून मनोरंजनाबरोबरच प्रबोधनही करावे, ही नम्र विनंती.

**डॉ. प्रमोद कोरान्ने**/७०३०९५५०१९

### उत्सवांचे विकृतीकरण थांबवा

आपली भारतीय संस्कृती खूप महान आहे. हजारो वर्षे गुलामगिरीत गेल्यानंतरही आपण धर्माचरण सोडून उत्सव साजरे केले नाहीत, असा आपला पूर्वजांचा इतिहास आहे. परंतु आज शाळा-महाविद्यालयांत कुठेही धर्मशिक्षण न दिल्या गेल्यामुळे उत्सवांचे विकृतीकरण केले जात असल्याचे दृष्टीस पडते. कृष्ण जन्माष्टमीच्या वेळी जिथे एका ठिकाणी भावपूर्ण उत्सव साजरा केला जातो, तेथेच दुसऱ्या ठिकाणी दहीहंडीच्या वेळी सिनेमाचे गाणे लावून, मोठमोठ्याने डीजे लावून, दारू पिऊन कार्यक्रम पार पडल्याचे दिसते तसेच गणेशोत्सवाच्या काळात बाप्पाची मूर्ती आणताना व ती विसर्जन करताना, नवरात्र उत्सवात देवीची मूर्ती भावपूर्णरीत्या आणणे अपेक्षित असताना, कोलाहलात तिचं आगमन आणि विसर्जन मद्य प्राशन करून, हिडीस नृत्य करून होत असेल तर हे कुठेतरी अयोग्य पद्धतीने उत्सव साजरा केला जातो आहे. हिंदू धर्मामध्ये उत्साहाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. संघटनभाव वाढावा, ईश्वराप्रती आपली श्रद्धा वाढावी, पूजा, आरती करताना सर्वांना अनुभूती यावी, त्यातून धर्माचरण घडावे, समाजप्रबोधन व्हावे, अन्नदान व्हावे इत्यादी अनेक उद्देश ठेवून सार्वजनिक उत्सव साजरे केले जातात. प्रत्यक्षात ज्ञानाच्या अभावामुळे ते भावपूर्ण, श्रद्धेने करण्याचा भाग कमी होऊन त्यातून आसुरी आनंद कसा मिळविता येईल, असा विचार होत असेल तर या भरकटलेल्या पिढीला धर्मशिक्षणाची खऱ्या अर्थाने गरज आहे. माझी सर्व आध्यात्मिक संस्थांना विनंती आहे की, या संस्थांनी अशा प्रकारे उत्सव साजरे करणाऱ्यांचे प्रबोधन करावे आणि योग्यरीत्या उत्सव साजरे करण्याचे महत्त्व जनमानसाच्या मनावर बिंबवावे.

**डॉ. भारती हेडाऊ**/९४२१७७३९९९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### सोनपेठ तालुका पोलिस पाटील संघटनेच्या अध्यक्षपदी मुंजाभाऊ घुमरे व पूजा बोकरे यांची बिनविरोध निवड

**सोनपेठ,/प्रतिनिधी:** सोनपेठ तालुका पो पाटील संघटनेच्या अध्यक्षपदी :- मुंजाभाऊ घुमरे व पुजा ताई बोकरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

सोनपेठ तालुक्यातील ५४ गावच्या प्रशासन नियुक्त पोलीस पाटील यांच्या दि ९ सप्टेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह सोनपेठ येथे संपन्न झालेल्या बैठकीतुन सर्वानुमते नवनि पोलीस पाटील संघटना कार्यकारिणी निवडण्यात आली यामध्ये तालुका पोलीस पाटील संघटना अध्यक्षपदी मुंजाभाऊ भुमरे व सौ पूजाताई बोखरे. उपाध्यक्षपदी रितेश पवार व राधिका राठोड कोषाध्यक्षपदी नागनाथ रोडे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली या बैठकीत नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा एकत्रित सत्कार करण्यात आला या निवड प्रक्रियेमध्ये ज्येष्ठ पोलीस पाटील अश्रुबा कुरवाडे, शेषराव चव्हाण, सुनील गोरे, तानाजी आचार्य, अच्युत सावंत, मदन सोनवणे, ताटे इत्यादी पोलीस पाटलांचे मार्गदर्शन लाभले.

### जागा सुटली म्हणून भाजपाव्दारे आनंदोत्सव साजरा- महायुतीतील जागा वाटप

**परभणी,/प्रतिनिधी:** आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमिवर भारतीय जनता पार्टी, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व अन्य घटक पक्षांच्या महायुतीतून परभणी विधानसभा मतदारसंघाची जागा भारतीय जनता पार्टीस सुटल्याचा दावा करीत पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांनी शुक्रवारी परभणीतील छत्रपती शिवाजी चौकात फटाक्यांची आतिषबाजी करीत आनंदोत्सव साजरा केला.

भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते विजयराव वरपुडकर, उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर, भाजप महानगराध्यक्ष राजेश देशमुख, पार्टीचे जिल्हा सरचिटणीस तथा बाजार समिती सदस्य विलास बाबर, डॉ. केदार खटींग, बाळासाहेब जाधव, सुनील देशमुख, माजी नगराध्यक्ष कमल किशोर अग्रवाल, माजी नगरसेवक मधुकर गव्हाणे, प्रदेश कार्यकारणी सदस्य मोहन कुलकर्णी, राजेश देशपांडे, माजी नगरसेविका सौ. मंगल मुदगलकर, विजय गायकवाड, राधाजी शेळके, शिवाजीराव मवाळे, सुरेश गिरी, संजय रिझवानी, सुरेश भुमरे, अनुप शिरडकर, दिनेश नरवाडकर, ॲड. एन.डी. देशमुख, नागसेन पुंडगे, सुभाषराव आंबट यांच्यासह अन्य पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शुक्रवारी सकाळी छत्रपती शिवाजी चौकात फटाक्यांची जोरदार आतिषबाजी केली. या आतिषबाजीने संपूर्ण परिसर दणाणला.

### लायन्स क्लबकडून महारक्तदान शिबीर

**परभणी,/प्रतिनिधी:** परभणी लायन्स क्लब परिवाराचे भिष्मपितामह माजी प्रांतपाल स्व. डॉ. के.सी. पारख यांच्या जन्म दिनानिमित्त लायन्स क्लब परिवारातर्फे २२ सप्टेंबर रोजी महाविक्रमी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

स्टेडिअम जवळील नूतन जिल्हा परिषदेच्या इमारतीत सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत हे महाविक्रमी रक्तदान शिबीर होणार असून रक्तदान केलेल्या प्रत्योकाला १ लाख रुपयांचा मोफत अपघाती विमा काढून मिळणार आहे. या महारक्तदान शिबीरात रक्तदान करुन नागरीकांनी राष्ट्रसेवेत सहभाग नोंदवावा, असे आवाहन उपक्रम प्रमुख लायन्स क्लब परभणी प्रिन्सचे रितेश झांबड जैन, सहउपक्रमप्रमुख लायन्स क्लब परभणी मेनचे हैदरअली जीवानी, विजय श्रीमाळी, रिजन चेअर पर्सन तथा मार्गदर्शक प्रिया ठाकूर, झोन चेअर पर्सन शिवकुमार पुरे, झोन चेअर पर्सन तुषार मराठे, माजी रिजन पर्सन डॉ. प्रविण धाडवे, लायन्स क्लबचे अध्यक्ष पंडीत बरदाळे, लायन्स क्लब परभणी प्रिन्सचे अध्यक्ष उल्हास नाव्हेकर, लायन्स क्लब परभणी रायझिंग वुमन्सच्या अध्यक्षा पुनम मराठे, लायन्स क्लब परभणी मेनचे अध्यक्ष अरुण टाक यांनी केले आहे.

### परळीकर यांनी साकारला सामाजिक संदेश देणारा देखावा

**परभणी,/प्रतिनिधी:** मंगळमुर्ती त्रिमूर्ती नगरातील रहिवाशी महेश सुधाकरराव परळीकर यांनी गणेशोत्सवानिमित्त 'झाडे लावा झाडांचे संगोपन करा' असा सामाजिक संदेश देणारा देखावा आपल्या निवासस्थानी उभा केला आहे.

'झाडे लावा झाडांचे संगोपन करा' या संकल्पनेवर स्वहस्ते श्रीगणेश झाडं लावत असलेली, मूषकराज पाणी घालतोय अशी शाडूच्या मातीपासून पार्थिव मुर्ती तयार केली आहे. आपल्या महाराष्ट्रात पर्जन्यवृष्टी कमी आहे ती वाढविण्यासाठी जास्तीत जास्त झाडे लावून झाडाला एक वर्ष पाणी देवून संवर्धन करणे आवश्यक, प्राणीमात्रांना जीवदान देणाऱ्या या उपक्रमाला प्राधान्य देऊन मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्यावर भर द्यावा लागेल. अन्यथा पुढच्या पिढीला वन्य प्राणी हे चित्रातच पाहावे लागतील. वन्यजीव राहात असलेल्या जागांवर टोलेजंग टॉवर्स उभे राहून त्यांच्या हक्काच्या जागा अतिक्रमीत होत आहेत त्यामुळे वनसंवर्धन हीच काळाची गरज आहे, अशी प्रतिक्रिया परळीकर यांनी व्यक्त केली.

### गांधीच्या वकत्व्या विरोधात भाजपाव्दारे निदर्शने

**परभणी,/प्रतिनिधी:** काँग्रेसचे नेते तथा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आपल्या अमेरिकेच्या दौऱ्यात एका विद्यापीठात आरक्षणा संदर्भात केलेल्या आक्षेपार्ह विधानाच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टीच्या ग्रामीण व महानगर शाखेच्या वतीने शुक्रवारी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने करण्यात आली.

भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस तथा कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती विलास बाबर, उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर, महानगराध्यक्ष राजेश देशमुख, डॉ. केदार खटिंग, सुरेश भुमरे, बालाजी रुद्रवार, राधाजी शेळके, दत्ता साबळे, शिवाजी मोहाळे, सौ. मंगला मुदगलकर, सुभाष आंबट, ऋषिकेश शेकनुर, बोरुळकर, प्रकाश गोरे, दिनेश नरवाडकर, संजय रिझवानी, मधुकर गव्हाणे, पांडुरंग राठोड, संतोष सिंग टाक, अनंता गोलाईत, मोहन कुलकर्णी, भालचंद्र गोरे, पांडुरंग वाळवटे, पांडुरंग नखाते, श्रीराम राठोड यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते या निदर्शन आंदोलनात सहभागी होते. लोकसभा निवडणुकीत संविधान बदलण्याचा खोटा प्रचार करून दिशाभूल करणाऱ्या राहुल गांधींनी अमेरिकेत जाऊन दलित, आदिवासी बांधवांबद्दल त्यांच्या आरक्षणाबाबत केलेले वक्तव्य निषेधार्य असून खरा चेहरा काँग्रेस व एनडी आघाडीचा समोर आला आहे. गेल्या दहा वर्षापासून मोदी सरकारने दलित आदिवासी घटकाचा केलेला विकास काँग्रेस जणांना पाहवत नाही.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# सेलूत गोदामावर पोलिसांची धाड, स्वस्त धान्याचा साठा पकडला

**सेलू,/प्रतिनिधी:** शहरातील फुले नगर परिसरात जिल्हा परिषद शाळेच्या मागे अजय दळवे यांच्या आखाड्यावर गोदामात स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी साठवून ठेवलेला अवैध धान्य साठ्यावर पोलिसांनी धाड टाकली. २ लाख १२ हजार ३७५ रुपये किंमतीचा धान्य साठा जप्त करण्यात आला. ही कारवाई १२ सप्टेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास करण्यात आली. या प्रकरणी दोघांवर गुन्हा नोंदविण्यात आला असून एकाला ताब्यात घेण्यात आले आहे.

पोलिस निरिक्षक दिपक बोरसे, के. आर. मुलगीर, सुरेश पुलाते, गुलाब राठोड यांच्या पथकाने १२ सप्टेंबरला सायंकाळच्या सुमारास जि.प. शाळेच्या पाठीमागे शेत गट नंबर १९५

### दोन लाखाचा मुद्देमाल जप्त दोघांवर गुन्हा दाखल, एक ताब्यात

मध्ये असलेल्या गोदामावर धाड टाकली. या ठिकाणी ५ हजार ६७४ किलो तांदूळ, २ हजार ४११ किलो गहू, इलेक्ट्रीक लोखंडी काटा आदी जप्त करण्यात आला. या प्रकरणी सपोनि. पांडुरंग भारती यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अत्यावश्यक वस्तू अधिनियम अंतर्गत जावेद शहा मयकाईल शहा रा. आयेशा कॉलनी, अजय शिवाजीराव दळवे रा. फुले नगर यांच्यावर गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी जावेद शहा याला ताब्यात घेतले आहे. तपास पोनि. दिपक बोरसे करत आहेत.





**मानवत- शहरात नगर पालिकेचे पाणी पुरवठा करणारे पाईप लाईन लिकेज झाल्याने लाखो लिटर पाणी शहरातील मेन रोडवर वाया जात नागरिकांतून आश्चर्य व्यक्त केल्या जात आहे. आणी काही ठिकाणी नाली चे पाणी पाईप मध्ये जावून शहरातील नागरकांना नाईलाजाने पिण्यास वापरावे लागत आहे.**

# राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धेत नूतनचा पार्थ चौधरी जिल्ह्यातून प्रथम तर कु.सान्वी शितळे दुसरी

**सेलू,/प्रतिनिधी-**शासकीय बाल चित्रकला स्पर्धा २०२४ या राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धेत नूतन विद्यलाय सेलू चा पार्थ चौधरी याने चौथ्या गटात जिल्ह्यातून प्रथम तर तिसऱ्या गटात कु. सान्वी शितळे हिने दुसरा क्रमांक प्राप्त केला आहे.

शासकीय बाल चित्रकला स्पर्धा या दि.१३ ऑगस्ट २०२४ रोजी परभणी जिल्ह्यात विविध केंद्रावर व नियुक्त शाळेत संपन्न झाल्या होत्या.



या स्पर्धेतील जिल्हास्तरीय उत्कृष्ट कलाकृतींची निवड शिक्षण विभाग जि.प.परभणी येथे दि.१२/०९/२०२४ रोजी करण्यात आली. ही निवड शिक्षणाधिकारी ( माध्य.) मा.श्रीमती आशा गरुड यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उप शिक्षणाधिकारी श्री.गणराज यरमळ,शिक्षण विस्तार अधिकारी श्री.गोविंदराव मोरे,नव निर्वाचित सांखिकी अधिकारी सौ.कोकुलवार मॅडम यांच्या उपस्थितीत ही निवड करण्यात आली आहे. याप्रसंगी कलाध्यापक तथा मुख्याध्यापक श्री.दिलीप सोनकवडे,कलाध्यापक संघाचे विभागीय उपाध्यक्ष श्री.माधव घयाळ,परभणी जिल्हा समन्वयक तथा जिल्हाध्यक्ष श्री.केशव लगड यांनी परीक्षण कार्य करून प्रत्योक गटात १५ उत्कृष्ट कलाकृती अश्या एकूण ४ गटातील ६० कलाकृती निवडल्या आहेत.

या कलाकृतींना राज्यस्तरीय स्पर्धेसाठी मा.सचिव,महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात आल्या आहेत. या यशा बद्दल संस्था पदाधिकारी आणि शाळेचे मुख्याध्यापक संतोष पाटील, उपमुख्याध्यापक किरण देशपांडे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.विद्यार्थ्यांना कलाशिक्षक आर डी कटारे, फूलसिंग गावित यांचे मार्गदर्शन लाभले.

# आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजनेत सहभागी व्हा

## सहाय्यक आयुक्तांचे आवाहन : २० सप्टेंबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते होणार उद्घाटन


**परभणी,/प्रतिनिधी :** बेरोजगार उमेदवारांना विविध क्षेत्रात रोजगार उपलब्ध करुन देणे, स्वयंरोजगार करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना अर्थसहाय्य प्रदान करणे, कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून उमेदवारांना रोजगारक्षम बनविणे यासाठी महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र योजनेचे प्रशिक्षण घेण्यासाठी जास्तीत-जास्त युवक-युवतींनी सहभागी होण्याचे आवाहन कौशल्य विकास विभागाचे सहायक आयुक्त यांनी केले आहे.

योजनेचे उद्घाटन प्रधानमंत्री यांच्या हस्ते दिनांक २० सप्टेंबर रोजी जिल्ह्यातील परभणी, पालम, मानवत, जिंतूर, पुर्णा, गंगाखेड आणि सेलू तालुक्यातील नोंदणी केलेल्या महाविद्यालयामध्ये ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. बेरोजगार उमेदवारांना विविध क्षेत्रात रोजगार उपलब्ध करुन देणे, स्वयंरोजगार करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना अर्थसहाय्य प्रदान करणे, कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या माध्यमातून उमेदवारांना रोजगारक्षम बनविणे ही सध्याच्या काळाची गरज असून, ती पूर्ण करण्याच्या हेतूने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत कौशल्य विकास प्रशिक्षणाच्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. महाविद्यालयामध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करण्यासाठी आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ही नाविन्यपूर्ण योजना सुरु केली आहे. या कौशल्य विकास केंद्राद्वारे ते१५४५ वयोगटातील युवक-युवतींना महाविद्यालयातील पायाभूत सुविधांचा वापर करून पदवीतील कोर्सशी निगडीत कौशल्य प्रशिक्षण प्रदान करावयाचे आहे, त्यांना त्याद्वारे आपल्या पायावर उभे राहण्यासाठी रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करुन देणे हा शासनाचा मानस आहे.

### रविवारी जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा

**परभणी,/प्रतिनिधी:** वीर सावरकर विचारमंच परभणीतर्फे रविवारी (दि.१५ सप्टेंबर) सकाळी ९ वाजता शहरातील वसमत रोडवरील श्री शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उद्घाटन सकाळी ९ वाजता जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी बाबासाहेब जामगे यांची उपस्थिती राहणार आहेत.

### येलदरी जलाशयात ७४.७० टक्के पाणीसाठा



**परभणी,/प्रतिनिधी:** पूर्णा पाटबंधारे प्रकल्पाच्या येलदरी जलाशयाच्या पाणी पातळीत दिवसेंदिवस वाढ होत असून या जलाशयात सध्या ७४.७० टक्के एवढा जिवंत पाणीसाठा शिल्लक आहे.

या जलाशयात १२४.६७० दशलक्ष घनमीटर मृत तर ८०९.७७० दशलक्ष घनमीटर जीवंत पाणीसाठा उपलब्ध आहे. या जलाशयात ९३४.४४० दशलक्ष घनमीटर एवढ्या पाणीसाठ्याची क्षमता आहे. त्या तूलनेत बुधवारी (दि.११) सकाळी ८ वाजेपर्यंत या जलाशयात १२४.६७० दशलक्ष घनमीटर मृत, ६०४.९०२ जिवंत तर ७२९.५७२ मीटर एवढा एकूण पाणीसाठा उपलब्ध आहे. जलाशयातील पाणी पातळी ४५९.६८० मीटर एवढी असून मागील २४ तासात या जलाशयात ११.९३८ दशलक्ष घनमीटर एवढी पाण्याची आवक झाली. जलाशयात सध्या ७४.७० टक्के एवढा जिवंत पाणीसाठा शिल्लक आहे, अशी माहिती पूर्णा पाटबंधारे खात्याच्या अधिकाऱ्यांनी दिली.

### महामेष योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**परभणी,/प्रतिनिधी:** राज्यामध्ये मेंढी पालन व्यवसायास प्रोत्साहन देणे तसेच राज्यातील भटकंती करणा-या भटक्या जमाती व तत्सम समाजामधील पशुपालकांना बळ देणाऱ्या राजे यशवंतराव होळकर महामेष योजना अधिक प्रभावीपणे राबविता यावी यासाठी शासनाने अनुदान योजनेला मान्यता दिलेली आहे.

राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेमुळे धनगर व तत्सम जमातीला फायदा होत आहे. या अनुदान योजनेतून मेंढ्यासाठी चराई अनुदान, मेंढी-शेळी पालनासाठी जागा खरेदी अनुदान तसेच कुक्कुट पक्षांच्या खरेदी व संगोपनासाठी अनुदान दिले जाणार आहे. यासाठी १२ ते २६ सप्टेंबर पर्यंत या कालावधीत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. राजे यशवंतराव होळकर महामेष योजनेमध्ये स्थायी आणि स्थलांतरित पद्धतीने मेंढीपालनासाठी पायाभूत सोई-सुविधेसह २० मेंढया आणि १ मेंढानर अशा मेंढी गटाचे ७५ टक्के अनुदानावर वाटप, सुधारित प्रजातींच्या नर मेंढ्यांचे ७५ टक्के अनुदानावर वाटप, मेंढी पालनासाठी पायाभूत सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ७५ टक्के अनुदान दिले जाईल, तसेच पशुखाद्य कारखाने उभारण्यासाठी ५० टक्के अनुदान इ. घटकांचा समावेश केला आहे. मेंढ्यासाठी चराई अनुदान या योजनेमध्ये ज्या मेंढपाळ कुटुंबाकडे किमान २० मेंढ्या व १ मेंढानर एवढे पशुधन आहे, अशा कुटुंबांना माहे जून ते सप्टेंबर या चार महिन्याच्या कालावधीसाठी प्रतिमाह रु. ६ हजार असे एकूण २४ हजार चराई अनुदान वाटप केले जाईल.

# जिंतूर येथे जामा मस्जिदमध्ये रक्तदान शिबीराचे आयोजन



**जिंतूर,/प्रतिनिधी-** जिंतूर येथे जामा मजीद मध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. जिंतूर शहरात मजीदयेथे सकल मुस्लिम समाजाच्या पुढाकारातून मिलाद उन नबिचया निमित्त भव्य रक्तदान शिबिरराचे आयोजन केले होते या प्रसंगी शिवसेना महिला संघटक उभाठागटाच्या सुरेखा शेवाळे टाले व त्यांची पती मुन्ना भाऊ टाले या कुटुंबाने रक्तदान केले त्या रक्तदान शिबिरामध्ये जिंतूर रक्तदान ही एक महत्त्वपूर्ण कार्य आहे ज्यांनी लाखो रुग्णाची जीवनवाची व्यास आणि परिवर्तन करण्यात मदत केली आहे अशी मानतात की रक्ताची सर्वात मौल्यवान वस्तू आहे जी तुम्ही दुसऱ्या माणसाला देऊ शकतात भारतात दरवर्षी सुमारे १४.६ दशलक्ष रक्तदानाची आवश्यकता असताना रक्त संक्रमणाची गरज दरवर्षी वाढत आहे भारतात दर दोन सेकंदात रक्त सकर्माची गरज भासते आणि रक्तदात्यांच्या तुकडा आहे एवढी गरज असूनही अनेक रक्तदानाची महत्त्व त्यांची रक्त एखाद्या प्राण कसे वाचू शकते आणि रक्तदात्यांसाठी रक्तदान करण्याचे आरोग्य फायदे याबद्दल अनभित्त आहेत म्हणून आपण सर्वांनी रक्तदान करायला हवे असे मत व्यक्त केली शिवसेना महिला परभणी जिल्हा संघटक उद्धव बाळासाहेब गटाच्या सुरेखा शेवाळे टाले यांनी असे मत व्यक्त केले.

# परभणी जिल्हयात स्वच्छता ही सेवा अभियानाचे आयोजन

## दि.१७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान होणार अभियान

**परभणी,/प्रतिनिधी:**राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्या साधून दिनांक २ ऑक्टोबर हा दिवस "स्वच्छ भारत दिवस" म्हणून साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्ताने दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२४ या कालावधीमध्ये "स्वच्छता ही सेवा अभियान" राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर यांनी दिली आहे.

यावर्षीच्या स्वच्छता ही सेवा २०२४ अभियानासाठी "स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता" ही संकल्पना निश्चित करण्यात आली आहे. या संकल्पनेच्या अनुषंगाने स्वच्छता ही सेवा अभियान कालावधीमध्ये केंद्र आणि राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार जिल्हाभरात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

दिनांक १७ सप्टेंबर २०२४ रोजी "स्वच्छता ही सेवा" अभियानाचा शुभारंभ जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत स्तरावर होणार आहे. सदर अभियान प्रभावीपणे राबविण्या बाबतच्या सूचना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथुर, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक शिवराज केंद्रे यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या आहेत.

अभियान कालावधीमध्ये सफाई मित्र सुरक्षा शिबिर, एक दिवस श्रमदानासाठी, कचऱ्याची




विल्हेवाट लावणे, सांस्कृतिक कार्यक्रमातून जनजागृती करणे, एकल प्लास्टिक न वापरणे, स्वच्छता ज्योत, मॅरेथॉन, सायकल मॅरेथॉन, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे, सार्वजनिक शौचालयाची साफसफाई व दुरुस्ती करणे, वारसा हक्काने कचऱ्याच्या ठिकाणांची साफसफाई करणे, स्वच्छतेची वाहने - उपकरणे यांची स्वच्छता व सुशोभीकरण करणे, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) अंतर्गत निर्मिती करण्यात आलेल्या प्रकल्पांचे उद्घाटन करणे, स्वच्छता प्रतिज्ञा घेणे याप्रमाणे नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

दि. १७ सप्टेंबर २०२४ पासून जिल्ह्यात स्वच्छता ही सेवा अभियानाला सुरुवात होत आहे. गावागावात स्वच्छतेची लोकचळवळ उभी राहावी यासाठी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी सक्रिय सहभाग नोंदवावा.

शिवराज केंद्रे
प्रकल्प संचालक
जल जीवन मिशन
जिल्हा परिषद, परभणी

गेल्या काही वर्षापासून शहरातील पाणी प्रश्न बिकट बनला आहे. पाणी पुरवठा करणाऱ्या धरणात साठा कमी असल्याने पाणी कपात केली जात आहे. त्यामुळे नागरिक पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. मात्र, या योजनेची अंमलबजावणी झाल्यास पूर्ण शहराचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटण्यास मदत होईल.

दरम्यान, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम २००५ मधील कलम १६ नुसार नियोजित सिंचन प्रकल्पातून पिण्यासाठी पंधरा टक्के औद्योगिक क्षेत्रासाठी दहा टक्के व सिंचनासाठी ७५ टक्के क्षेत्रिय वाटप निर्धारित करण्यात आलेले आहे त्याच नियमानुसार हे पाणी वाटप केले जाणार आहे. ..

# कलिका स्टीलने 'क्रिएट' स्पर्धेतून विद्यार्थ्यांना दिली नवकल्पनांना चालना

## पुण्याच्या डॉ. भानुबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर विमेन च्या विद्यार्थ्यांनी 'कराटे' स्पर्धा जिंकली, ज्यामध्ये महाराष्ट्रभरातून १००० विद्यार्थ्यांचा सहभाग होता

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

महाराष्ट्र – १५ सप्टेंबर २०२४: कलिका स्टीलने 'घीशरींश' नावाची स्पर्धा आयोजित केली, ज्याचा उद्देश विद्यार्थ्यांना संयुक्त राष्ट्रांच्या १७ शाश्वत विकास उद्दिष्टांनुसार (डऊॠ) व्यावहारिक उपाय शोधण्यासाठी प्रोत्साहन देणे हा होता. ही स्पर्धा रविवारी आयोजित केली गेली आणि यात महाराष्ट्रभरातील सिव्हिल इंजिनीअरिंग व आर्किटेक्चरचे विद्यार्थी सहभागी झाले होते. 'डळषश ळप डींशशश्र: डींी-ींळपरलश्रश ऊर्शींशश्रेशिपी ींथश्री' या थीमवर आधारित, या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी स्टीलचा वापर करून जागतिक शाश्वत विकासाच्या आव्हानांना सामोरे



जाण्यासाठी नवीन उपाय सादर केले.

या स्पर्धेत २०० महाविद्यालयांमधून एकूण १००० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला आणि ४८ संघांनी त्यांच्या मॉडेल्सचे प्रदर्शन केले. कलिका स्टीलचे संचालक गोविंद गोयल यांनी सांगितले, जी कल्पना लहान स्वरूपात होती, ती आज इतक्या मोठ्या कार्यक्रमात परिवर्तित झाली आहे. घीशरींश चा प्रवास हा कलिका स्टीलच्या प्रवासासारखा आहे – लहान सुरुवातीपासून ते मोठ्या यशापर्यंत. विद्यार्थ्यांनी आमच्या स्टील ढचढ बार्सचा वापर करून आश्चर्यकारक शाश्वत मॉडेल्स तयार केली आहेत हे पाहणे खूप प्रेरणादायक आहे. येथे प्रत्येक टीम विजयी आहे कारण त्यांनी खूप मेहनत घेतली आहे.

या स्पर्धेचे परीक्षण नामांकित आर्किटेक्ट्स, इंजिनीअर्स आणि बिल्डर्सनी केले. तीन विजेत्या संघांना रोख पारितोषिक देण्यात आले. पहिल्या क्रमांकाचे बक्षीस, १ लाख रुपये, पुण्याच्या इछउ- कॉलेजच्या शगुन शाह, सुदिक्षा अनंथारामन, रेहान देशमुख आणि मौसुमी टाटिया यांना मिळाले. दुसरे बक्षीस, ७५,००० रुपये, कोल्हापूरच्या डझड चइक्ड कॉलेजच्या रंजना तुरे, शांभवी जोशी, शर्वत हवाल आणि आयुष मिरजकर यांना मिळाले. तिसरे बक्षीस, ५०,००० रुपये, नाशिकच्या चझतड कॉलेजच्या श्रावणी रापुट, परी बिरार, आर्या धकने आणि मनस गायकवाड यांनी जिंकले.

विद्यार्थ्यांनी न्याय, शांती, स्वच्छ पाणी, लैंगिक समानता आणि गरिबी निर्मूलन यांसारख्या विविध विषयांवर प्रकल्प सादर केले. कलिका स्टीलचे घनश्याम गोयल, अरुण अग्रवाल, अनिल गोयल, गोपाल गोयल आणि मनोज जिन्दाल यांच्यासह गोविंद गोयल, अनुज बन्सल, आदित्य जिन्दाल आणि यश गोयल उपस्थित होते आणि त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. घीशरींश ही स्पर्धा कलिका स्टीलच्या शाश्वत विकास आणि नवकल्पना वाढवण्याच्या कटिबद्धतेचे प्रतीक आहे.

# आ.बबनराव लोणीकर यांच्या विशेष प्रयत्नातून ५३ ग्रामपंचायत इमारतीसाठी १० कोटी ९५ लक्ष रूपयांचा निधी

**तभा वृत्तसेवा**
**परतुर/प्रतिनिधी**



गाव पातळीवर ग्रामीण भागातील जनतेचे कामे सुरळीतपणे पार पडावी यासाठी परतूर मंठा जालना ग्रामीण मधील नवीन ग्रामपंचायत कार्यालयांच्या इमारतींना मंजुरी भेटली असून लवकरच या कामाला सुरुवात होणार असल्याची माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रसिद्ध दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. पुढे या पत्रकात माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी म्हटले आहे की, ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना, सरपंच उपसरपंच सदस्य व प्रशासकीय अधिकाऱ्यांना काम करण्यासाठी उत्तम व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी या नवीन इमारतीचा उपयोग होणार असून या माध्यमातून गाव गाड्यांचा कारभार जलद गतीने चालावा अशी अपेक्षा असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी पत्रकार नमूद केले आहे. मंठा तालुक्यातील अर्डा खारी (२०) लक्ष, कटाळा बुद्रुक(२०) लक्ष जांभरुण(२०) लक्ष ठेंगेवडगाव (२०) लक्ष पोखरी टकले (२०) लक्ष केंदळे पोखरी(२०) माळकिनी(२०) लक्ष रामतीर्थ (२०) लक्ष वाटुर तांडा(२०) हनवत खेडा(२०) अंभोरा शेळके( २०) लक्ष केहाळ वडगाव (२०) कीर्तापूर(२०) लक्ष करणावळ (२०) लक्ष गुळखंड (२०) लक्ष टोकवाडी (२०) लक्ष टाकळखोपा(२०) लक्ष तळतोंडी (२०) लक्ष दहा (२०) लक्ष पाडळी दुधा (२०) लक्ष गडदे पांगरा (२०) लावणी(२०) लक्ष लिंबे वडगाव (२०) लक्ष वीरगव्हाण(२०)लक्ष वाघोडा तांडा (२०) सोनूनकरवाडी (२०) लक्ष दहिफळ खंदारे (२५) लक्ष पांगरी बुद्रुक(२५) लक्ष माळेगाव (२५) लक्ष शिवनगिरी(२५) हेलस (२५) लक्ष तर परतूर तालुक्यातील बामणी (२०) हनुवडी(२०) लक्ष श्रीधर जवळा (२०) अंगलगाव (२०) आसनगाव (२०) लक्ष सावरगाव बुद्रुक (२०) माव पाटोदा (२०) लक्ष चांगतपुरी (२०) लक्ष फुलवाडी (२०) लक्ष मापेगाव बुद्रुक (२०) लक्ष डोलारा (२०) लक्ष परतवाडी (२०) तर जालना ग्रामीण तालुक्यातील नेर शेवली भागातील शंभू सावरगाव (२०)लक्ष सोनदेव (२०) लक्ष ढगी (२०)लक्ष पळसखेडा (२०) लक्ष काकडा (२०) लक्ष डांबरी (२०) लक्ष रुपयांचा निधी मंजूर झालेला असून लवकरच नवीन ग्रामपंचायत इमारतीच्या बांधकामाला सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली आहे.

## संक्षिप्त

### तपा शिवाय मुक्ती नाही हे – श्र्म्रण मुनिश्री विशेषसागर



**तभा वृत्तसेवा**
**अंबड प्रतिनिधी**

अंबड १५ सप्टेंबर उत्तम तपाचा दिवस आहे. तपाचा अर्थ असा आहे, ज्यामधुन आत्माला तपवले जाते त्याचे नाव आहे तप. तपा शिवाय कर्माचे खंण्डण, निर्जरा आणि मोक्ष संभव नाही. तपाचा अर्थ आहे जो सम्यकदर्शन, सम्यकज्ञान आणि सम्यकचारित्र सोबत कर्माचे क्षय करण्यासाठी तप करतो तेच खरे सम्यक तप आहे. ख्याती, पुजा व सन्मानासाठी जो तप करतो, ते तप नाही कुतप आहे. उक्त उद् गार पं.पू. गणाचार्य १०८ श्री विरागसागरजी महाराज के सुशिष्य पं.पू. श्रम्रण मुनिश्री १०८ विशेषसागरजी महाराजीनी श्री १००८ शांतिनाथ भगवान जैन मंदिर अंबड येथेपर्युषण पर्वातील दशलक्षण धर्मातील उत्तम तप धर्म बद्दल प्रवचनामध्ये बोलताना सांगितले आपल्या प्रवचनात सांगितले. आज उत्तम तपाचा दिवस आहे. तपाचा अर्थ असा आहे, ज्यामधुन आत्माला तपवले जाते त्याचे नाव आहे तप. तपा शिवाय कर्माचे खंण्डण, निर्जरा आणि मोक्ष संभव नाही. तपाचा अर्थ आहे जो सम्यकदर्शन, सम्यकज्ञान आणि सम्यकचारित्र सोबत कर्माचे क्षय करण्यासाठी तप करतो तेच खरे सम्यक तप आहे. ख्याती, पुजा व सन्मानासाठी जो तप करतो, ते तप नाही कुतप आहे. उक्त उद् गार पं.पू. गणाचार्य १०८ श्री विरागसागरजी महाराज के सुशिष्य पं.पू. श्रम्रण मुनिश्री १०८ विशेषसागरजी महाराजीनी श्री १००८ शांतिनाथ जैन मंदिर अंबड येथे आपल्या प्रवचनात सांगितले. पं.पू. श्रम्रण मुनिश्री नी पुढे सांगीतले की, चार ज्ञान धारण तीर्थकर का असो ना त्यांना सुध्दा तपश्चर्या केल्या शिवाय सिध्दी प्राप्त होऊ शकत नाही. दिगंबर दिक्षा घेऊन त्यांना देखिल तप करावेच लागते. तेव्हाच मुक्तीची प्राप्ती होते. आकांशाचा निषेध करणे हेच सर्वात मोठे तप आहे. शुध्द आत्माची चर्चा केल्यावर शुध्दत्माची प्राप्ती होत नाही. तप करावेच लागते. इच्छाचा विरोध करणे हेच सगळ्यात मोठे तप आहे. इच्छा वाढत जाणे आणि आपण तपस्या करत जाणे म्हणजे ते फुटलेल्या मडक्या प्रमाणे होते. ही भारताची भुमि कणा कणामध्ये तपस्वीच्या पाऊलांनी पावन झालेली आहे. तपाची प्रशंसा फक्त मनुष्य किंवा विद् वाना कडुन देखिल होते. देव सुध्दा तपस्वीयांची स्तुती करतात. तप फक्त मनुष्य गतिमध्येच संभव आहे. गृहस्थ सुध्दा घरात राहुन यथाशक्ती तप करु शकतात. आचार्य भगवान म्हणतात, जो पर्यंत शरिर स्वास्थ आहे. इंद्रिय सम्पदा आहे. तप करण्याची क्षमता आहे. तो पर्यंत तप केले पाहिजे. कारण वृध्दावस्था मध्ये जेव्हा शरिर साथ देत नाही. इंद्रिय काम करणे कमी



जालना : सुप्रसिद्ध सिनेअभिनेते नानाजी पाटेकर यांच्या सिहगड पुणे येथील घरच्या गणपतीचे शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी मनोभावे दर्शन घेतले व नानाजींचा सत्कार केला याप्रसंगी त्याच्या समवेत शिवसेना शहरप्रमुख विष्णु पाचफुले ,अमोल कारंजेकर, रामेश्वर दराडे ,पांडुशेठ खैरे यांची उपस्थीती होती

# कोदोली येथील भाजप पदाधिकाऱ्यांचा काँग्रेस मध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील कोदोली येथील कार्यकर्त्यांनी भाजपला सोडचिठ्ठी देऊन काँग्रेस पक्षाच्या ध्येय धोरणांवर व काँग्रेस जिल्हाध्यक्ष तथा मा. नगराध्यक्ष श्री. राजाभाऊ देशमुख यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आज भोकरदन तालुक्यातील कोदोली गावातील ग्रामस्थांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला आहे.



यावेळी ज्ञानेश्वर पाटील गिरणारे, सुरेश गिरणारे, परमेश्वर गिरणारे, गजानन शिंदे, दिलीप मगरे, सुनील गिरणारे, समाधान मगरे, दत्तू ल गिरणारे, भागवत गिरणारे, प्रभाकर गिरणारे, संजय गिरणारे, दादाराव गिरणारे, प्रवीण गिरणारे, भरत मगरे, राजू मगरे, अरुण गिरणारे, सखाराम गिरणारे, अशोक गिरणारे, शेषराव गिरणारे, विश्वास गिरणारे, नारायण गिरणारे, माणिकराव गिरणारे, नामदेव गिरणारे, नायबराव गिरणारे, आनंदा वाघ व शेषराव पाटील गिरणारे यांनी काँग्रेस पक्षाचा झेंडा हाती घेतला. प्रवेश प्रसंगी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, युवक जिल्हाध्यक्ष राहुल देशमुख, मा नगरसेवक रमेश जाधव यांच्यासह काँग्रेस पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

# विश्वेश्वरअय्या यांच्याप्रमाणे महान कार्य करून नावलौकीक वाढवावा –अभय कुलकर्णी



**जालना/प्रतिनिधी**

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेशरैया यांची जयंती दि. १५ सप्टेंबर रोजी क्रेडाई जालनातर्फे अभियंता दिन म्हणून साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी क्रेडाईचे अध्यक्ष अभय कुलकर्णी होते. अध्यक्ष भाषणात ते म्हणाले की, सर विश्वेश्वरअय्या यांनी जे महान कार्य केले, तशाच पद्धतीने अभियंत्यांनी काम करून आपला नावलौकीक वाढवावा. अभियंता रविंद्र हुशे यांनी भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेशरअय्या यांचे जीवन चरित्र व त्यानी केलेल्या कामा विषयी माहीती विषद केली. याप्रसंगी क्रेडाईचे सदस्य असलेल्या सर्व अभियंत्यासह क्रेडाईचे सचिव अविनाश भोसले, माजी अध्यक्ष संजय मुथा, सहसचिव शरद जैस्वाल, दिपक अंभोरे, अकींत आबड, नितीन सातपुते, सुशील पितांबरे, सत्कारमूर्ती रितेश मंत्री, विनोद यादव, सय्यद महेबुब, कैलास पवार, गोपाल पवार, अनुराग अग्रवाल, पकेंश खुरूद, अवेश नाथानी, शरद बारगजे, वैभव बंब, संदीप राठी, दिपक बदर यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रेडाई जालनाचे उपाध्यक्ष डॉ. विठ्ठल पवार यांनी केले.

# १५ वर्षापासून प्रलंबित असलेले शेतरस्ते 'समृद्धी' ने केले दुरुस्त

## स्वखर्चातून रस्ते तयार केल्याने शेतकऱ्यांनी मानले सतीश घाटगेंचे आभार



**तभा वृत्तसेवा**
**अंबड/प्रतिनिधी**

अंबड दि १४ सप्टेंबर गेल्या पंधरा वर्षापासून शेकडो शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा असलेला अंबड तालुक्यातील धाकलगाव ते नावडे वस्ती व घनसावंगी तालुक्यातील हरसिंग नाईक तांडा ते राणी उंचेगाव हा शेत रस्ता नादुरुस्त होता. वारंवार हे रस्ते दुरुस्त करण्याची मागणी शेतकरी करत होते.

परंतु त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. पाच वेळा स्थानिक आमदाराने या रस्त्यावर नारळ फोडले पण काम काही केले अन्ही. शेवटी समृद्धी कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी स्वखर्चातून हे दोन्ही रस्ते शुक्रवारी तयार करायला सुरुवात केली. यामुळे दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी सतीश घाटगे यांचे आभार मानले. घनसावंगी तालुक्यातील हरसिंग नाईक तांडा ते राणी उंचेगाव हा रस्ता नादुरुस्त असल्याने येथील शाळकरी मुलांना शाळेत जाता येत नव्हते. तसेच शेतकऱ्यांना शेतात जाणे जिकरीचे बनले होते. अशीच स्थिती धाकलगाव ते नावडे वस्ती या रस्त्यामुळे दाखल गाव येथील शेतकऱ्यांची होती या दोन्ही गावातील शेतकऱ्यांनी सतीश घाडगे यांची भेट घेऊन हे रस्ते दुरुस्त करून देण्याची मागणी दोन दिवसापूर्वी केली होती. या मागणीची तात्काळ दखल घेऊन सतीश घाटगे यांनी या दोन्ही रस्त्याचे काम स्वखर्चातून सुरू केले अगोदर काम सुरू करून नंतर या रस्त्याचे उद्घाटन त्यांनी केले. यावेळी दोन्ही गावातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक वर्षापासूनची मागणी दोन दिवसात पूर्ण केल्यामुळे सर्व शेतकरी आनंदी झाले. त्यांनी सतीश घाटगे यांचे आभार मानले.

# वडगाव पवार तांडा येथील युवकांचा राष्ट्रवादीत प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील मौजे वडगांव ग्रा. पं. सदस्य राजू गुलाब राठोड यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते राष्ट्रवादीत प्रवेश केला. यावेळी पवार तांडयामधील अनेक युवक कार्यकर्त्यांनीही राष्ट्रवादीत प्रवेश केला. याप्रसंगी विष्णू पवार, गणेश पवार, संजय राठोड, रवी पवार, बबन पवार, गजानन पवार, संदीप राठोड यांनी प्रवेश केला. यावेळी जालना तालुकाध्यक्ष संतोष ढेंगळे, जेष्ठ कार्यकर्ते विष्णूदादा भुतेकर, रायुकाँचे तालुका कार्याध्यक्ष समाधान राठोड,माजी सरपंच भानुदास राठोड, गोरख राठोड,संदीप राठोड, भोरू पवार, बिसन पवार, उत्तम राठोड यांच्या सह कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# नागापूर व वैजोडा पाडळी वस्ती येथील ग्रामस्थांच्या वतीने भाजपा प्रदेश सचिव पदी निवड झाल्याबद्दल राहुल लोणीकर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या माध्यमातून भारत देश हा विकसित देशांच्या यादीत जाऊन बसला असून, राज्यातील शिंदे फडणवीस अजित पवार यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने युवक युवतींसाठी मोठ्या प्रमाणावर योजना कार्यान्वित केल्या असून या माध्यमातून युवक युवतींना रोजगार उपलब्ध होत असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले.

ते नागपूर व वैजोडा पाडळी वस्ती येथे संपन्न झालेल्या सत्कार कार्यक्रमाला उत्तर देताना बोलत होते. यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले पुढे बोलताना ते म्हणाले की परतुर विधानसभा मतदारसंघासाठी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी गेल्या पंचवीस तीस वर्षापासून सातत्याने संघर्ष करत मोठ्या प्रमाणावर निधी खेचून आणत मतदार संघाचा कायापालट केला असल्याचे यावेळी



बोलताना त्यांनी सांगितले पुढे बोलताना ते म्हणाले की देशासह राज्यातील व मतदार संघातील युवक वर्ग हा खऱ्या अर्थाने भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी असून भाजपामध्ये रोज येणारे युवकांचे लोंढे हे येणाऱ्या विधानसभेत विजयाची नांदी ठरणार असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले, यावेळी गावकऱ्यांच्या वतीने प्रदेश सचिव पदी नियुक्ती झाल्याबद्दल राहुल लोणीकर यांचा सत्कार केला यावेळी शत्रुघ्न कणसे, पद्माकर कवडे भगवान पाटोळे विष्णू डोने, राहुल काळे काकासाहेब शिंदे रामा चव्हाण अरुण वाघमारे, संदीप तनपुरे सुनील गुजर विठ्ठल महाराज जाधव सुनील महाराज बोराडे दत्ता रोकडे उद्धव मांडगे, माऊली शिंदे एकनाथ खामकर गजानन वैद्य कृष्णा रोकडे गोविंद यादव, तुकाराम चव्हाण, आकाश रोकडे, दत्ता जाधव दौलत जाधव विष्णू टोणपे, संतोष बोराडे नारायण दत्ता मांडगे विठ्ठल रायकर, अनंत तुमचे अनंत टोणपे, अर्जुन मांडगे एकनाथ रोकडे कांता गायकवाड, विठ्ठल मस्के बाळू मस्के पिंटू बोराडे पप्पू मस्के राजेश काकडे हनुमान बोबडे रामचंद्र टोणपे अनिल गुजर विठ्ठल पवार राजू वाघ कैलास जगताप यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती

# पत्रकार बालाजी कुलकर्णी यांना मातृशोक

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**



उमरखेडा (ता.मंठा) येथील सौ रेखाताई रंगनाथराव कुलकर्णी यांचे रविवार ता. १५ रोजी सकाळी सहा वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले, मृत्यूसमयी त्यांचे वय ७३ वर्षे होते. त्यांच्यावर उमरखेडा येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी सर्व प्रमुख पक्षाचे राजकीय पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार, आप्तेष्ट – नातेवाईक व ग्रामस्थांची उपस्थिती होती. मंठा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सचिव रंगनाथराव कुलकर्णी यांच्या पत्नी तर पत्रकार बालाजी कुलकर्णी यांच्या त्या आई होत. त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली, जावई, सुना, नातवंड असा मोठा परिवार आहे.

# सोन्याच्या दिवसांवरून खा.काळे, आ.गोरंट्याल यांची टोलेबाजी!

## अनोखा : साई दरबार,नाग–नागीन नृत्य, गंगेचा जीवंत देखावा

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

श्री अनोखा गणेश मंडळाने यंदा चांदीच्या मूर्तीला सोन्याचा मुलावा दिल्यानंतर जिल्ह्याला सोनियाचे दिवस आले आहेत. सर्व गणेश भक्तांची दुःखे, संकटे ,विघ्न दूर व्हावीत आणि प्रत्येकाच्या आयुष्यात सोन्याचे दिवस यावेत अशी प्रार्थना खा. डॉ. कल्याण काळे यांनी विघ्नहर्ता गणरायाच्या चरणी केली. तर सोन्याचे दिवस कोणाचे येतील हा येणारा काळ ठरवेल. असे सूचक विधान करत आ. कैलास गोरंट्याल यांनी आपल्या स्टाईल मध्ये चांगलाच षटकार मारला.

छत्रपती शिवाजी महाराज स्मारका जवळील श्री अनोखा गणेश मंडळातर्फे आयोजित गणेशोत्सवात शनिवारी ( ता. १४) खा. डॉ. कल्याण काळे ,आ. कैलास गोरंट्याल,माजी



नगराध्यक्षा सौ. संगीताताई गोरंट्याल, शिवसेना उबाठाचे नेते डॉ. संजय लाखे पाटील यांच्या हस्ते श्रींची महाआरती करण्यात आली. यावेळी गौतमसिंह मुणोत,राम सावंत,राजेंद्र राख,शरद देशमुख,सुनील गोयल, श्रावण भुरेवाल,जीवन सले, हरेश देवावाले,संजय भगत, रमेश गोरक्षक, दुर्गेश काठोठीवाले, राजेंद्र जाधव, मंडळाचे अध्यक्ष अनिल गोयल, योगेश मानधना, संस्थापक अजय ( जगदीश) भरतिया, कार्याध्यक्ष संजय अग्रवाल ( रूपम),धीरेंद्र मेहरा, आशीष जेथलिया,धर्मेंद्र भानुशाली,अनिल लदनिया,राजेश ( पापा) लुणिया,राहुल अग्रवाल,किशोर अग्रवाल, हर्षद चोरडिया, राजेश अग्रवाल ( रूपम),पुरूषोत्तम भक्कड, गौरीशंकर देविदान,जगदीश मुंदडा, राजकुमार दायमा ( सरकार),महेश सारस्वत, गणेश तिवारी, रोहित भुरेवाल,रवी अग्रवाल,आलोक गोरंट्याल,गणेश भुरेवाल, मनोज बंब, सज्जन सकलेचा, सचिन लोढा,महावीर मरलेचा,दीपक पंच, आदींची उपस्थिती होती. मंडळाच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.तसेच भाविकांना साबुदाणा खिचडी चे वाटप करण्यात आले. हरियाणा येथील सुनील – अनिल तिलकधारी आर्ट्स ग्रुपच्या कलापथकाने भगवान शंकराचे अर्धनारेश्वर रूप, साईबाबांचा दरबार, पाण्यात पेटवलेला दिवा, गंगेचा उगम ,तिच्या भावना, नाग– नागीन नृत्य, जिवंतपणे साकारत भाविकांना वेगळा अनुभव दिला. डम , ,डम,,डमरू बाजे ...., गौराजी के सन्मुख शंकर झुमे, नाचे...,शिर्डीवाले साईबाबा...बंदा गरीब है..., मानो तो मै गंगा हू..., ओम नमः शिवाय,,,तीन शब्द मे सृष्टी का सार समाया ......, या गीतांवर एकापेक्षा एक बहारदार नृत्यांचे सादरीकरण केले. तसेच नाग– नागिन च्या वेशात कलावंतांनी मेरे ढोलना....सून....,छेड मिलन के गीत....! या गीतांवर कसदार अभिनयाने सादरीकरण करून उपस्थितांना मोहित केले. सप्तसुरांच्या तालावर नाग –नागिन यांच्या चित्तथरारक जुगलबंदीला उपस्थितांनी चांगलीच दाद दिली.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## चौफेर

सुनीता मिश्रा

# ‘हे वीर विवेकानंद हिंदू यशमूर्ती’

## ऐतिहासिक शिकागो भाषणातील अमृत कण

स्वामी विवेकानंद यांनी ११ सप्टेंबर १८९३ रोजी शिकागो येथे झालेल्या विश्व धर्म संसदेत हिंदू संन्यासीच्या रूपात भारताचे प्रतिनिधित्व करणारे ऐतिहासिक भाषण दिले. त्यावेळी स्वामीजींचे वय अवघे ३० वर्षे होते. इतक्या लहान वयातही लोक त्यांच्या भाषणामुळे इतके प्रभावित झाले होते की त्यांना पुढील पंधरवड्यात पाच वेळा संमेलनात बोलण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यांच्या भाषणानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी प्रकाशित ‘न्यूयॉर्क हेराल्ड’ने लिहिले - ‘विवेकानंद हे नि:संशयपणे धर्म संसदेतील सर्वात महान व्यक्ती आहेत.’

स्वामी विवेकानंदांनी आपल्या भाषणाची सुरुवात "sisters and brothers of America' या शब्दांनी केली आणि त्यानंतर त्यांनी हिंदूंच्या वतीने आभार व्यक्त केले. आपल्या भाषणाच्या प्रारंभीच ते म्हणाले - ‘आपल्या या स्नेहपूर्ण आणि हृदयपूर्वक केलेल्या जोरदार स्वागताने माझे हृदय अपार आनंदाने भरून गेले आहे आणि मी जगातील सर्वांत प्राचीन संत परंपरेच्या वतीने तुमचे आभार मानतो. मी आपले सर्व धर्मांच्या जननीच्या वतीने आभार मानतो, सर्व जाती, संप्रदायांच्या लाखो, करोडो हिंदूंच्या वतीने मी आपले आभार मानतो.

स्वामीजींचे हे भाषण केवळ ४६८ शब्दांचे होते. एवढ्या कमी कालावधीतील आपल्या भाषणातही त्यांनी जागतिक स्तरावर आपली मुद्रा उमटविली. - ज्या धर्माने जगाला सहिष्णुता आणि सार्वत्रिक स्वीकृती दोन्ही शिकवले आहे, अशा धर्माचा मला अभिमान आहे. सहिष्णुता आणि सार्वत्रिक स्वीकृती या दोन्ही गोष्टींना त्यांनी हिंदू धर्माचा गाभा मानले आणि ती जगात सर्वांत मौल्यवान तत्त्वे आहेत, असे प्रतिपादन केले. ते म्हणाले की आमचा केवळ सार्वत्रिक सहिष्णुतेवरच विश्वास आहे असे नसून आम्ही सर्व धर्म सत्य आहेत, असे मानतो. मला त्या देशाचा अभिमान आहे, ज्याने सर्व धर्मांना आणि पृथ्वीवरील सर्व राष्ट्रांकडून छळ झालेल्यांना व शरणार्थींना आश्रय दिला आहे. बंधूंनो, मी तुम्हाला एका स्तोत्रातील काही ओळी ऐकवत आहे, ज्या मी लहानपणापासून वाचत आलो आहे आणि ज्याचा पाठ दररोज लाखो लोक करतात :

**रुचिनां वैचित्र्यादृजुकुटिलनानापथजुषाम्।**
**नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव ॥**

ज्याप्रमाणे निरनिराळ्या नद्या भिन्न, भिन्न स्रोतांतून उगम पावून महासागरात विलीन होतात, त्याचप्रमाणे हे परमेश्वरा! भिन्न भिन्न रुचीनुसार वेगवेगळ्या वाकड्या किंवा सरळ मार्गावर चालणारे लोक शेवटी तुझ्याशीच एकरूप होतात.



स्वामीजींनी धर्मसंसदेत जे काही भाषण केले ते त्यांचा अनुभव आणि त्यांच्या अंत:करणातून निघालेली वाणी होती. त्यांनी आपल्या भाषणात जे काही सांगितले, त्यामुळे तेथे उपस्थित श्रोत्यांना भारतीय संस्कृती आणि हिंदुत्वावर चिंतन करण्याची प्रेरणा मिळाली. स्वामीजींच्या उद्बोधनाने त्यांच्यापूर्वी भाषण करणाऱ्या अनेक वक्त्यांना प्रभावित केले.

स्वामी विवेकानंद म्हणाले की -‘सांप्रदायिकता, कट्टरता आणि त्याच्या भयंकर वंशजांच्या धार्मिक आडमुठेपणाने या सुंदर भूमीला फार पूर्वीपासून जखडून ठेवले आहे. त्यांनी ही पृथ्वी हिंसाचाराने भरली आहे आणि कितीतरी वेळा ही पृथ्वी रक्ताने लाल झाली आहे. किती संस्कृती नष्ट झाल्या आणि किती देश उद्ध्वस्त झाले कुणास ठाऊक? जर हे भयंकर राक्षस अस्तित्वात नसते तर मानवी समाज आजच्यापेक्षा खूप चांगला झाला असता. मला आशा आहे की या संमेलनाचा बिगुल सर्व प्रकारची कट्टरता, दुराग्रह व दु:खाचा विनाश करणारा ठरेल. मग तो तलवारीने असो वा लेखणीने.

स्वामी विवेकानंदांनी आपल्या अल्पायुष्यात जे अफाट कार्य केले आणि जो भव्य, उदात्त संदेश दिला यामुळे संपूर्ण जग विस्मयचकित झाले. अशा व्यक्तीने या राष्ट्राच्या भूमीत जन्म घेतला आणि त्याच्या पावलावर पाऊल ठेवून मार्गक्रमण केले. नि:संशयपणे स्वामी विवेकानंद हे हिंदू होते आणि त्यांना हिंदू असल्याचा अभिमान होता. परंतु त्यांच्या तत्त्वज्ञानाने धर्माच्या ज्या स्वरूपाचा प्रसार केला त्याच्या केंद्रस्थानी माणूस होता आणि त्यांचे मूलभूत योगदान हे आहे की त्यांनी ‘हिंदुत्वा’ला मनुष्य निर्माणाच्या, मानवी विकासाच्या सर्वोत्तम स्वरूपाच्या अग्रस्थानी आणले. विश्व धर्म संसदेत जगभरातील प्रमुख धर्मांचे प्रतिनिधी होते ज्यात हिंदू धर्म, यहुदी धर्म, इस्लाम, बौद्ध, पारशी, कॅथलिक आणि प्रोटेस्टंट इत्यादींचा समावेश होता. पण स्वामी विवेकानंदांचे उद्बोधन सर्वांत यशस्वी व प्रभावी ठरले.

स्वामी विवेकानंदांच्या मते- मला अशा धर्माचा अनुयायी असल्याचा अभिमान वाटतो ज्याने जगाला सहिष्णुता आणि सार्वत्रिक स्वीकृती या दोन्ही गोष्टींची शिकवण दिली आहे. आम्ही केवळ सर्व धर्मांप्रती सहिष्णुतेवरच विश्वास ठेवत नाही तर समस्त धर्मांना सत्य मानून त्यांचा स्वीकार करतो. मला अशा देशाचा नागरिक असल्याचा अभिमान आहे ज्याने या पृथ्वीवरील सर्व धर्म आणि देशांतील अत्याचारित आणि शरणार्थींना आश्रय दिला आहे. सांप्रदायिकता, कट्टरतावाद आणि त्यांच्या धर्मांध वंशजांनी या सुंदर पृथ्वीवर दीर्घकाळ राज्य केले आहे. त्यांनी पृथ्वीवर प्रचंड हिंसाचार, रक्तपात घडवून आणला आहे, त्यांनी मानवतेचा वारंवार नाश केला आहे, जगभरातील सभ्यता, संस्कृती नष्ट केली आहे आणि त्यांनी सर्व देशांना निराशेच्या गर्तेत बुडवले आहे. जर हे भयंकर राक्षस अस्तित्वात नसते तर मानवी समाज आजच्या तुलनेत खूप उन्नत, प्रगत झाला असता.

हिंदू समाजाने आपला धर्म श्रुती-वेदांपासून प्राप्त केला आहे भावना आहे. हिंदू धर्म मानवतेच्या भावनेला सर्वोच्च मानतो आणि ‘वसुधैव कुटुम्बकम्’ ही भावना त्यात अंतर्भूत आहे, अशा शब्दात त्यांनी हिंदूधर्माचे वैशिष्ट्य मांडले. हिंदुत्व हे कोणत्याही विशिष्ट जाती किंवा पंथापुरतेच मर्यादित नसून सर्वांना एकता आणि बंधुत्वाच्या मार्गावर चालण्याचे आवाहन करते, असा संदेश स्वामीजींनी या माध्यमातून दिला.

स्वामी विवेकानंदांच्या या भाषणाने पाश्चात्त्य विश्वाला हिंदू धर्माच्या गहनतेचा आणि सार्वत्रिकतेचा नवीन दृष्टिकोन प्रदान केला. त्यांनी स्पष्ट केले की हिंदू धर्म ही केवळ सांस्कृतिक किंवा धार्मिक ओळख नाही तर तो एक व्यापक आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन आहे जो संपूर्ण मानवतेला एकजूट करू पाहतो. स्वामी विवेकनंदांचे शिकागोतील भाषण जगभरात हिंदू धर्माची नवी प्रतिमा निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे होते. या भाषणात त्यांनी हिंदू धर्माची उदात्त तत्त्वे आणि त्यांचे सार्वजनिक महत्त्व यावर सखोल प्रकाश टाकला -

### हिंदुत्वाची व्यापकता आणि सर्वसमावेशकता

स्वामी विवेकानंदांनी हिंदू धर्माचा एक वैश्विक, सार्वजनिक दृष्टिकोन प्रस्तुत केला. ते म्हणाले की, हिंदू धर्म हा कोणत्याही एका जाती, संस्कृती किंवा प्रदेशापुरता मर्यादित नाही. त्याऐवजी, ही एक अशी प्रणाली आहे जी सर्व धर्म, जाती आणि संस्कृतींचा स्वीकार करते व त्यांच्यात समन्वय प्रस्थापित करते. हिंदू धर्माच्या सर्वसमावेशक दृष्टिकोनाचे वर्णन करताना ते म्हणाले की, भिन्न भिन्न धार्मिक मार्ग म्हणजे एकाच सत्याकडे जाणारे वेगवेगळे मार्ग मानले जातात.

**धर्माची व्याख्या :** स्वामी विवेकानंदांनी धर्माची अनोखी, अद्वितीय व्याख्या केली. त्यांच्या मते धर्म हा केवळ पूजा किंवा कर्मकांडापुरता मर्यादित नाही. त्यांना धर्माकडे मानवतेची सेवा आणि असे मानले जाते की वेद हे अनादि आणि अनंत आहेत. श्रोत्यांना हे हास्यास्पद वाटण्याची शक्यता आहे की एखादे पुस्तक अनादि आणि अनंत कसे असू शकते. पण वेदांचा अर्थ कोणताही ग्रंथ नाही. वेद म्हणजे भिन्नभिन्न कालखंडात भिन्नभिन्न लोकांनी आविष्कृत केलेल्या अध्यात्मिक सत्यांचा संचित कोष. वेद सांगतात की आत्मा हा दिव्यस्वरूप आहे. तो पंचतत्त्वांच्या बंधनांनी बांधलेला आहे आणि जेव्हा ती बंधने तुटतात तेव्हाच त्याला पूर्णत्वाची प्राप्ती होते आणि हे बंधन केवळ परमेश्वराच्या कृपेनेच, त्याच्या दयेनेच तोडले जाऊ शकते आणि ती कृपा पवित्र लोकांना प्राप्त होते. त्यामुळे त्या परमात्म्याची प्राप्ती करायची असेल तर पावित्र्य व शुद्धता हाच एकमेव मार्ग आहे. शुद्ध व पवित्र अंतःकरणात परमात्मा स्वत:ला प्रकट करतो. पवित्र व निर्मळ मनुष्य याच जीवनात भगवंताची कृपा प्राप्त करून यशस्वी होतो.

### शिकागो भाषण : हिंदुत्वाचा वैश्विक हुंकार

स्वामी विवेकानंदांच्या शिकागो भाषणाने ‘हिंदुत्व’ ची भावना आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रस्थापित केली. आपल्या या ऐतिहासिक भाषणात स्वामीजींनी हिंदू धर्माच्या महान सांस्कृतिक परंपरेवर प्रकाश टाकला. त्यांनी हिंदू धर्माला एक सार्वत्रिक, सार्वजनिन धर्म म्हणून सादर केले, जो सर्व धर्म, श्रद्धा, विश्वास, पंथ, संप्रदाय, उपासना पद्धती याविषयी सहिष्णुता आणि आदराची भावना वाढवतो. हिंदू धर्म हा एक असा धर्म आहे जो विविध पंथ आणि श्रद्धांना एकाच सत्याकडे नेणारे भिन्न मार्ग आहेत असे मानतो, असे स्वामी विवेकांनदांचे प्रतिपादन होते. हिंदू धर्माची मुख्य वैशिष्ट्ये सांगताना ते म्हणाले की, यात सहिष्णुता, मानवता आणि सर्वांचा आदर करण्याची आणि आत्म्याचा शोध म्हणून पाहिले. त्यांनी हिंदू धर्माला एक असा मार्ग सांगितले जो आत्म्याचे अनंतत्व आणि मानवतेचा आदर्श शोधण्यात मदत करते.

**सहिष्णुता आणि सर्वांचा आदर :** हिंदू धर्माचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सहिष्णुता आणि भिन्न भिन्न धार्मिक श्रद्धांचा आदर होय. हिंदू धर्म सर्व धर्मांची समानता आणि त्यांच्याविषयी आदराची भावना वृद्धिंगत करतो, असे स्वामी विवेकानंदांनी स्पष्ट केले. त्यांनी उदाहरण म्हणून भारतीय समाजाला प्रस्तुत केले. ज्यामध्ये विविध धर्म आणि श्रद्धांचे सहअस्तित्व आहे.

**वैश्विक मानवता आणि एकता :** स्वामी विवेकानंदांनी हिंदू धर्म हा वैश्विक मानवतेच्या एकतेचा आणि बंधुत्वाचा मार्ग म्हणून मांडला. हिंदू धर्माचे तत्त्व सर्व मानवांमध्ये एकता, मानवता आणि वैश्विक प्रेमाकडे घेऊन जाते, असे मत त्यांनी मांडले. हिंदू धर्माचा सिद्धांत सर्व मनुष्यांची एकता, मानवता व वैश्विक प्रेमाकडे घेऊन जातो. हिंदू धर्म मानवतेच्या वैश्विक अवधारणेवर विश्वास ठेवतो, जेथे सर्व जीव एकमेकांशी जोडलेले आहेत.

**हिंदू धर्म: एक जीवन दृष्टी :** स्वामी विवेकानंदांनी हिंदू धर्माला केवळ धार्मिक विश्वास म्हणून नव्हे तर जीवनाचा व्यापक दृष्टिकोन या अंगाने प्रस्तुत केले. समाजाला योग्य दिशा देणारी आणि व्यक्तीला प्रोत्साहन देणारी आदर्श आणि मूल्यांची एक प्रणाली या दृष्टीने त्यांनी हिंदू धर्माकडे पाहिले.

### शिकागो भाषण : विश्वबंधुत्वाचा संदेश

स्वामी विवेकानंदांचे शिकागो भाषण हे विश्वबंधुत्व आणि वैश्विक मानवतेच्या महत्त्वावर एक महत्त्वाचा संदेश होता. आपल्या या भाषणात स्वामी विवेकानंदांनी भारताच्या धार्मिक विविधतेचे आणि सार्वत्रिकतेचे उदाहरण दिले आणि जगाला एकता, सहिष्णुता आणि परस्पर आदराची गरज असल्याचे आवाहन केले. आपल्या भाषणात वैश्विक बंधुत्वाची भावना व्यक्त करताना स्वामी विवेकानंद म्हणाले की, सर्व धर्मांचे मूळ एकच असून सर्व मानवता एका कुटुंबाप्रमाणे आहे. स्वामी विवेकानंद असेही म्हणाले की विविध धर्मांमधील मतभेद नकारात्मक दृष्टिकोनातून नाही तर परस्पर सामंजस्य व आदराने सोडवले जावे. सर्व धर्म, संस्कृती आणि जातींनी एकमेकांप्रती सहिष्णुता आणि समजूतदारपणा वाढवला पाहिजे, जेणेकरून संपूर्ण विश्वात शांती आणि एकता निर्माण होईल, असा त्यांचा संदेश होता. ●●

## घरवापसी

दिनेश मानसेरा/कुलदीप सिंग

कर्नाटकातील एका मुस्लिम कुटुंबातील ९ जणांनी उत्तराखंडमध्ये झालेल्या एका विशेष सोहळ्यात हिंदू धर्मात प्रवेश घेतला. या प्रकरणाची सर्वत्र चर्चा होताच ‘ कर्नाटकातील या लोकांनी आमच्याकडे येऊन अर्ज आणि प्रतिज्ञापत्र कार्यालयात सादर केले होते, असे अल्मोडाचे उपविभागीय दंडाधिकारी जयवर्धन शर्मा यांनी सांगितले.

# कर्नाटकातील ९ जणांचा हिंदू धर्मात प्रवेश

## उत्तराखंडमध्ये झाला घरवापसी कार्यक्रम



कर्नाटकातील एक मुस्लिम कुटुंब अल्मोडा येथील सोमेश्वर भागात एक वर्षापूर्वी आले होते. परंतु, इस्लामिक कट्टरतेने दुखावलेल्या या मुस्लिम कुटुंबाने सनातन हिंदू धर्मात प्रवेश घेतला. ‘इस्लाम धर्मात पसरलेल्या धर्मांधतेने व कट्टरवादामुळे मी खूप दु:खी होतो व या सर्व प्रकाराला कंटाळलो होतो, असे हिंदू धर्मात घरवापसी केलेल्या नूर मोहम्मद यांनी सांगितले.

मुस्लिम कुटुंबाचे प्रमुख नूर मोहम्मद म्हणाले की, इस्लाम धर्मातील जुनाट रुढी, परंपरा, धर्मांधता, कट्टरता याला मी कंटाळलो होतो. आम्ही उपविभागीय दंडाधिकारी जयवर्धन शर्मा यांच्याकडे धर्मांतराची परवानगी मागितली होती. त्यांनी आम्हाला लेखी पत्र आणि प्रतिज्ञापत्र देण्यास सांगितले. ६ मे रोजी आम्ही सर्व कायदेशीर औपचारिकता पूर्ण करून संबंधित कागदपत्रे त्यांच्या सुपूर्द केली.

नूर मोहम्मद यांनी सांगितले की, जून महिन्यात दिल्लीतील राजेंद्रनगर येथील आर्य समाज भवनात आमचा शुद्धीकरण यज्ञ पार पडला. सर्व विधी, अनुष्ठान यथासांग पार पडले. कायदेशीर व धार्मिक अशा दोन्ही अंगांनी आता आम्ही सनातन हिंदू धर्मात परतलो आहोत. ते पुढे म्हणाले की आमचे पूर्वज हिंदू होते. पण काही कारणांमुळे त्यांना मुस्लिम धर्म स्वीकारणे भाग पडले. नूर मोहम्मद यांच्यासोबत हिना, आलिशा, सलवा, शाहनवाज, वसीम, कहकशा, युसरा, खालिद यांनीही सनातन धर्मात प्रवेश घेतला आहे.

या प्रकरणाची सर्वत्र चर्चा होताच ‘कर्नाटकातील या लोकांनी आमच्याकडे येऊन अर्ज आणि प्रतिज्ञापत्र कार्यालयात सादर केले होते, असे अल्मोडाचे उपविभागीय दंडाधिकारी जयवर्धन शर्मा यांनी सांगितले. ●●

# मुस्लिम महिलेचा २ मुलांसह हिंदू धर्मात प्रवेश

सनातन हिंदू धर्माचा महिमा एवढा अपरंपार आहे की, जो कोणी या धर्माला जाणून घेण्याचा किंवा समजून घेण्याचा प्रयत्न करतो तो त्या धर्माचाच होऊन राहतो. ताजे प्रकरण मध्यप्रदेशातील मंदसौर जिल्ह्यातून समोर आले आहे. येथे एक मुस्लिम महिलेने आपल्या दोन मुलांसह हिंदू धर्मात प्रवेश केला आहे.

### काय आहे संपूर्ण घटना

हे संपूर्ण प्रकरण मंदसौरच्या धमनार येथील आहे. धमनार येथील मेहनाज ही मुस्लिम महिला दीर्घकाळपासून सनातन हिंदू धर्माचे पालन करीत आहे. ती म्हणाली की, माझे मुस्लिम कुटुंबीय मला अजिबात आदर, सन्मान देत नव्हते. पती माझा खूप छळ करीत होता. शारीरिक-मानसिक छळ असह्य झाल्यावर सनातन हिंदू धर्मात प्रवेश करण्याचा मी निर्णय घेतला, असे मेहनाजने सांगितले.



यानंतर मेहनाजने ठरविल्याप्रमाणे खरोखरच हिंदू धर्माची दीक्षा घेतली. यासाठी तिला शेख जफरने मदत केली. शेख जफरनेही हिंदू धर्मात प्रवेश करून चैतन्यसिंह राजपूत हे नाव धारण केले. मेहनाज आणि तिच्या मुलांना चैतन्यसिंहने एका मंदिरात नेले आणि त्यांना विधीवत हिंदू धर्माची दीक्षा दिली. घरवापसी झाल्यानंतर मेहनाजने आपले नाव बदलून मीनाक्षी असे ठेवले. तर तिच्या फहरान आणि शहजाद या दोन मुलांना आता लव-कुश हे नवीन नाव मिळाले आहे.

आपल्याला आता मोकळा श्वास घेता येत आहे, असे हिंदू धर्मात प्रवेश केल्यानंतर आनंदित झालेल्या मेहजान ऊर्फ मीनाक्षीने हिंदू संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना सांगितले. ‘सासरच्या घरातील दैनंदिन जीवनात माझी खूपच घुसमट होत होती. तुलनेत सनातन हिंदू धर्मात महिलांना खूप स्वातंत्र्य असल्याचे मला स्पष्टपणे जाणवले. त्यामुळे हिंदू धर्माचा स्वीकार करावा असे तीव्रतेने वाटू लागले,’ असे माध्यमांशी बोलताना मेहनाज ऊर्फ मीनाक्षीने सांगितले. २०२२ पासून मंदसौरमधील ४७ परधर्मीयांनी आतापर्यंत हिंदू धर्मात प्रवेश घेतला आहे. ●●

## दखल

कुलदीप सिंह

# अजमेरमध्ये रेल्वेगाडी उलथवण्याचा कट

## १७ दिवसांत तिसरा प्रयत्न

राजस्थानमध्ये गेल्या १७ दिवसांत तीन वेळला रेल्वे गाडी उलथविण्याचा कट रचण्यात आला आहे. अगदी ताजी घटना १० सप्टेंबरला अजमेरमध्ये घडली असून, रेल्वे रुळावर एक क्विंटल वजनाचा सिमेंट ब्लॉक ठेवण्यात आला होता, जेणेकरून गाडीचे डबे रूळावरून खाली घसरतील. मात्र, सुदैवाने रेल्वे गाडीचे इंजिन सिमेंटचा ब्लॉक तोडून तिथून निघून गेले.

वृत्तानुसार इंजिन ड्रायव्हरला याची माहिती मिळताच त्याने आरपीएफला याची माहिती दिली. माहिती मिळताच आरपीएफच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी घटनास्थळ गाठून तपास सुरू केला. अजमेरच्या सरधना आणि बांगड ग्राम रेल्वे स्थानकांदरम्यान दोन ठिकाणी समाजकंटकांनी ७० किलो वजनाचे सिमेंटचे ब्लॉक ठेवल्याचे तपासात समोर आले. एक किलोमीटर पुढे आणखी एक सिमेंट ब्लॉक तोडून बाजूला ठेवण्यात आल्याचेही तपासात निष्पन्न झाले. मात्र दोन्ही ब्लॉक वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्यात आले. नंतर डीएफसीसी आणि आरपीएफ यांनी संयुक्तपणे सराधना ते बांगड ग्राम रेल्वेस्थानक अशी गस्त घातली. या अपघातामुळे मालगाडीच्या इंजिनाचेही नुकसान झाले आहे. यापूर्वी देखील २८ ऑगस्ट रोजी बारा परिसरातील छबडा येथे मालगाडीच्या ट्रॅकवर दुचाकीचा भंगार फेकण्यात आला होता, हे उल्लेखनीय. यामुळे इंजिन बाईकच्या भंगारावर आदळले. तर २३ ऑगस्ट रोजी पाली येथे अहमदाबाद-जोधपूर वंदे भारत ट्रेन मार्गात ठेवलेल्या सिमेंट ब्लॉकला धडकली होती.

**राजस्थानात रेल्वेगाडी उलथवण्याचा अवघ्या १७ दिवसांत तीनदा प्रयत्न करण्यात आला. यापूर्वी २८ ऑगस्ट रोजी बारा येथील छबडा येथे मालगाडीच्या ट्रॅकवर दुचाकीचे भंगार फेकण्यात आले होते. यामुळे इंजिन दुचाकीच्या भंगारावर आदळले. २३ ऑगस्ट रोजी पाली येथे अहमदाबाद-जोधपूर वंदे भारत रेल्वे मार्गावर ठेवलेल्या सिमेंट ब्लॉकला धडकली होती.**



### कानपूरमध्ये रेल्वे मार्गावर ठेवले सिलेंडर

केवळ राजस्थानमध्येच नव्हे तर उत्तर प्रदेशातही रेल्वेमार्गावर घातपात करण्याचे प्रयत्न वारंवार होत आहेत. राज्यातील कानपूरमध्ये कालिंदी एक्स्प्रेस रुळावरून उलथविण्याचा कट रचण्यात आला होता. कानपूरमध्ये रेल्वे ट्रॅकवर एलपीजी सिलेंडर ठेवण्यात आले होते. मात्र, दक्ष रेल्वे कर्मचाऱ्यांमुळे वेळीच अपघात टळला. या प्रकरणी पोलिसांनी दोन स्थानिक सराईत गुन्हेगारांना अटक केली होती. ●●

## आरोग्य

महकसिंह



# वजन नियंत्रित ठेवण्यास फायदेशीर धन्याचे पाणी

आपल्या घरातील कितीतरी गोष्टी आरोग्यासाठी फायदेशीर असतात. त्यातील एक म्हणजे धने. याचे फायदे आणि धन्याचे पाणी बनवण्याची योग्य पद्धत जाणून घ्या. धन्याचे पाणी केवळ तुमची पचनसंस्थाच मजबूत करत नाही तर शरीरात साचलेली विषारी द्रव्ये बाहेर काढण्यास मदत करते.

धने, धन्याची पावडर याचे आयुर्वेदात फार महत्त्व आहे आणि त्यांचे अनेक फायदे आहेत. धन्याचे पाणी केवळ तुमची पचनसंस्थाच मजबूत करीत नाही तर शरीरात साचलेली विषारी द्रव्ये बाहेर काढण्यासही मदत करते. तुम्हालाही तुमचे आरोग्य उत्तम ठेवायचे असेल, तर तुमच्या दैनंदिन दिनचर्येत धन्याच्या पाण्याचा समावेश करणे हा एक सोपा आणि प्रभावी उपाय आहे.

### धन्याचे पाणी पिण्याचे फायदे

**पचनक्रिया सुधारण्यास उपयुक्त-** धन्याच्या बियांमध्ये फायबरचे प्रमाण चांगले असते जे पचनसंस्थेचे कार्य सुरळीत करण्यास मदत करते. यामुळे गॅसेस आणि ॲसिडिटी सारख्या समस्या दूर होतात. धन्याचे पाणी प्यायल्याने पाचक एंझाइम्स सक्रिय होतात आणि अन्नाचे पचन व्यवस्थित होण्यास मदत होते.

**वजन कमी करण्यासाठी उपयुक्त-** धन्याच्या बियांमध्ये डाययुरेटिक गुणधर्म असतात जे शरीरातील अतिरिक्त पाणी आणि विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात. हे चयापचय वाढवते जे वजन कमी करण्याच्या प्रक्रियेस गती देते.

**मधुमेह नियंत्रणात फायदेशीर-** धन्याचे पाणी साखरेची पातळी नियंत्रित ठेवण्यास मदत करते. हे इंसुलिनची संवेदनशीलता सुधारण्यात मदत करते आणि रक्तातील साखरेची पातळी सामान्य ठेवते, ज्यामुळे ते मधुमेहाच्या रुग्णांसाठी खूप फायदेशीर ठरते.

**डिटॉक्सिफिकेशनमध्ये मदत -** धन्याचे पाणी शरीरातील हानिकारक विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते. हे मूत्रपिंड आणि यकृत स्वच्छ करते, ज्यामुळे शरीर आतून निरोगी व कार्यक्षम राहते.

**त्वचेसाठी फायदेशीर-** धन्याचे पाणी त्वचेची चमक टिकवून ठेवण्यास मदत करते. त्यातील अँटिऑक्सिडंट्स गुण त्वचेला नैसर्गिक रीत्या उजळ करतात आणि मुरुमांच्या समस्येची तीव्रता कमी करतात.

**धन्याचे पाणी बनविण्याची पद्धत -** धन्याचे पाणी बनवणे खूप सोपे आहे. यासाठी मोजक्याच गोष्टी आवश्यक आहेत-

### साहित्य-

१ मोठा चमचा धने
१-२ ग्लास पाणी

पद्धत-

एका पातेल्यात १-२ ग्लास पाणी घेऊन त्यात एक चमचा धने घाला.

पाणी अर्धे होईपर्यंत मंद आचेवर उकळा.

आचेवरून पातेले काढून पाणी गाळून घ्या.

पाणी कोमट झाल्यावर सकाळी रिकाम्या पोटी प्या.

आपल्याला हवे असल्यास तुम्ही त्यात थोडे मधही घालू शकता. ●●

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# चोरीची खोटी तक्रार देणाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १५ सप्टेंबर -**
रोख रक्कम लुटून नेल्याची खोटी तक्रार करणाऱ्या एकाविरुध्द अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेड शहरातील मालेगाव रोड अयोध्यानगरी येथील विनायक पुंडलिक कदम यांनी वडिलाने दिलेले दोन लाख ६५ हजार रुपये साखर कारखान्याच्या चेअरमनकडे घेवून जात असताना पिंपळगाव ते येहळेगाव रोडवर अज्ञात तीन जणांनी जबरदस्तीने चोरुन नेल्याची तक्रार अर्धापूर पोलीस ठाण्यात केली होती. दरम्यान त्यांच्या या तक्रारीवरुन पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांना संशय आल्याने त्यांनी पोलीस उपनिरीक्षक भोसले व पोहेकॉ.आडे यांना या तक्रारीची खात्री करण्याची सूचना केल्यानंतर पोलिसांनी या तक्रारीची शहानिशा केली असता हि तक्रार खोटी असल्याचे आढळून आले. वडिलाने दिलेले दोन लाख ६५ हजार रुपये कारखान्याच्या चेअरमनकडे न देता स्वतःवर झालेले कर्ज फेडण्यासाठी नविन मोंढा येथील जयस्वाल यांना दिले असल्याचे विनायक कदम यांनी पोलिसांना सांगितले. तक्रार खोटी असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर खोटी तक्रार देणाऱ्या विनायक पुंडलिक कदम याच्या विरोधात अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डॉ. विक्रम देशमुख यांच्या नेतृवाखाली संतोष वाघमारे यांचासह असंख्य कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादी अजीत पवार गटामध्ये प्रवेश

**तभा वृत्तसेवा**
**उमरी, दि. १५ सप्टेंबर -**
उमरी येथे राष्ट्रवादी काँग्रेस अजीत दादा गटाच्या पक्ष कार्यालयात पक्षाचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी व सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा अध्यक्ष बाळासाहेब सोनकांबळे यांच्या मान्यतेने राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी चे तालुका अध्यक्ष डॉ विक्रम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली वचींत बहुजन आघाडीचे नेते संतोष वाघमारे यांनी व यांच्या सोबत असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला आहे

उमरी तालुक्यातील निमटेक भायेगाव हातनी बेलदारा येथील कार्यकरत्याचा समावेश आहे पक्ष प्रवेशा नंतर या प्रसंगी संतोष वाघमारे यांना तालुका कार्याध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे , रमेश हैबते यांना सामाजिक न्याय विभाग जिल्हा उपाध्क्ष पदी, व साहेबराव गायकवाड निमटेक यांना सामाजिक न्याय विभाग तालुकाध्यक्ष पदी ,बालाजी माधवराव आनेराये यांना राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी तालुका उपाध्यक्ष पदी नियुक्तीचे पत्र डॉ विक्रम देशमुख यांच्या हस्ते देण्यात आले



या कार्यक्रमास अंकुश हणमंते ता अध्यक्ष सामाजिक न्याय विभाग नायगाव तालुका अध्यक्ष, कार्याध्यक्ष यादव गाजभारे यांची उपस्थिती होती येणाऱ्या आगामी निवडणूक काळात लोकसभा असो कि विधानसभा भक्कम पणे उमरी तालुक्यात राष्ट्रवादी कांग्रेस पार्टी मित्र पक्षा सोबत राहुन लोकसभा उमेदवार विधानसभा आमदार राजेश पवार यांच्या सोबत राहून प्रचंड मतानी निवडुन आणु असा विश्वास डॉ विक्रम देशमुख आपल्या मार्गदर्शन करतानां सर्वाना शब्द दिला आहे ,या कार्यक्रमात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टी बाबद शेतकऱ्यांना तत्काळ विमा अतिवृष्टी अनुदान घर पडीचे पंचनामे करून तालुक्यातील वीज वितरण व्यवस्था तत्काळ पूर्ववत करण्याच्या मागणीचे निवेदन तहसीलदार उमरी मार्फत शासनास देण्यात आले या वेळी रा कॉ पार्टी जिल्हा उपाध्यक्ष अमृत पवार ज्ञानेश्वर पाटिल कदम शेलगावकर राष्ट्रवादी ता कार्यध्यक्ष, बालाजी पाटिल पवार यु जिल्हा उपाध्यक्ष, रावसाहेब पाटिल वडजे ता उपाध्यक्ष, अविनास पाटिल,संतोष गुंटे, व्यंटैश पाटिल ढगे, बेलदारा सरपंच पिराजी गायकवाड, माजी सरपंच गंगाधर शिगले, लक्षमन जांगेवड, मारोती आरटवाड, रा कॉ शहर अध्यक्ष महेश पडोळे देविदास दशरथवाड,पदाधीकारी उपस्थित होते

## संक्षिप्त वृत्त

### कसूरदार शिक्षकांवर कार्यवाही करा; पालकांनी दिला आत्मदहनाचा इशारा

**मुदखेड** -मुदखेड तालुक्यातील सरेगांव येथील रहिवाशी चक्रधर कळणे पाटील यांनी मुख्याध्यापक व कसूरदार शिक्षक यांची रीतसर चौकशी करून त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी म्हणून आजपर्यंत संबधित कार्यालयास १०२ निवेदन दिले आहेत व दि. १२ डिसेंबर २०२३ रोजी जिल्हा परिषद कार्यालया समोर अमरण उपोषण आणि दि. १८ जुन २०२४ रोजी पंचायत समिती कार्यालय मुदखेड येथे अमरण उपोषणाला बसले होते. एवढे करूनही त्या शिक्षकांवर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नसल्याने निवेदनकर्ते चक्रधर शामराव कळणे पाटील यांनी दि. ०५ सप्टेंबर रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कार्यालय नांदेड येथे निवेदन दिले आहे.त्यांची या निवेदनाद्वारे अशी मागणी आहे की कर्तव्यात कसुरदार मुख्याध्यापकांवर व त्यांना पाठिशी घालणाऱ्या अधिकाऱ्यावर व त्यांच्या सोबत संगनमतानी काम करणाऱ्या सहशिक्षकांवर तात्काळ गुन्हे दाखल करून एका पाल्याच्या पालकाला न्याय मिळवुन द्यावा. न्याय नाही मिळाला तर आपल्या कार्यालया समोर दि. १७ सप्टेंबर रोजी आत्मदहन करणार असल्याचे चक्रधर कळणे पाटील यांनी निवेदनात नमुद केले आहे.



### श्रुती किन्हाळकरचे वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेत घवघवीत यश



**नायगाव -** किनाळा येथील रहिवासी कु. श्रुती माधवराव किन्हाळकर विद्यार्थ्यांनी ने आपल्या परिश्रम जिद्द व अभ्यासाच्या बळा वर ई.सन. २४-२५ या वर्षामध्ये घेण्यात आलेल्या निट परिक्षेत ६७१ मार्कघेऊन घवघवीत यश प्राप्त करून क्षेत्रात प्रवेश प्राप्त केले. तालुक्यातील किनाळा येथील कु. श्रुती माधवराव किन्हाळकर ह्या विद्यार्थ्यांनी ने प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत. परंतु घरात शैक्षणिक वारसा लाभला असुन आपल्या अथक परिश्रम,जिद्द चिकाटी व अभ्यासाच्या बळावर एस.एस.सी. बोर्डाच्या परिक्षेत तिने ९९ टक्के टक्के घेऊन तालुक्या मधून प्रथम येण्याचा बहुमान मिळविला तर एच.एस.सी.च्या लातूर बोर्डाच्या परीक्षेत विज्ञान शाखेतून ९५ टक्के घेवून केंद्रातून प्रथम येण्याचा बहुमान मिळविला आहे. तर ई.सन. २४-२५ या वर्षांमध्ये घेण्यात आलेल्या निट परिक्षेत अथक परिश्रम जिद्द अभ्यासाच्या बळावर दुसऱ्या प्रयत्ना मध्ये ६७१ मार्क घेऊन घवघवीत यश संपादित करीत वैद्यकीय प्रवेश प्रक्रियेत नॅशनल मेडिकल कॉलेज नायर (टोपीवाला) मुंबई येथील वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश प्राप्त केला आहे. तिच्या या बद्दल तालुक्यातील पोष्ट बेसिक ज्यू कॉलेज चे प्राचार्य विजय कुमार देशमुख ,सहशिक्षक आनंदराव सुर्यवंशी सह, प्राध्यापक काशिनाथ बन, सौ भारती बन, विश्वनाथ स्वामी, पांडुरंग येवले, सरपंच प्रतिनिधी तथा प्रा. यादवराव कोरनुळे, माधवराव वाघमारे, उच्य माध्यमिक ज्यूनियर कॉलेजचे प्राध्यापक गणेश मारताळे कर, शकंर राठोड, शिवशंकर कोरे, दिलीप माने, प्रदिप लापशेटवार सह आदि प्राध्यापक वृदांच्या वतीने श्रुती किन्हाळकराचा व आई वडीलचा पुष्पहार घालून यथोचित सन्मान करुन पुढील वैद्यकीय क्षेत्रातील वाट चालीस शुभेच्छा दिल्या. तालुक्यातील पोष्ट बेसीक ज्यू व उच्च माध्यमिक ज्यू कॉलेजचे प्राचार्य सह सर्व प्राध्यापकांच्या वतीने श्रुती किन्हाळकरांचा यथोचित सन्मान करुन पुढील वैद्यकीय क्षेत्रातील वाट चालीस शुभेच्छा दिल्या

### अविनाश वाघमारे यांची जिल्हा प्रसिध्दीप्रमूखपदी निवड

**भोकर** -येथील सामाजीक कार्यकर्ते अविनाश वाघमारे यांची भारतीय जनता पार्टी नांदेड उत्तर अनुसुचित जाती मोर्चा जिल्हा प्रसिद्धी प्रमुख पदि निवड करण्यात आली. भोकर येथील सामाजीक कार्यकर्ते अविनाश वाघमारे यांनी मागील अनेक वर्षापासून सामाजीक धार्मिक कार्यात अग्रेसर असून त्यांनी आजपर्यंत केलेल्या सामाजीक कार्याची दखल घेवून त्यांची भाजपा नांदेड उत्तर अनूसूचित जाती मोर्चा जिल्हा प्रसिध्दीप्रमूख पदी नियूक्ती करण्यात आली जिल्हाध्यक्ष विलास साबळे यांनी तसे नियूक्ती पत्र दिले. वाघमारे यांच्या निवडीबद्यल मित्र परिवाराकडून त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



### ईद-ए-मिलाद सणानिमित्त सुटी कायम

**नांदेड-** मुस्लिम बांधवांना ईद-ए-मिलाद हा सण मोठ्या प्रमाणात साजरा करण्यासाठी नांदेड जिल्ह्यासाठी सोमवार १६ सप्टेंबर २०२४ रोजीची सार्वजनिक सुटी जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी कायम ठेवली आहे. यासंदर्भात जिल्हादंडाधिकारी अभिजीत राऊत यांनी अधिसूचना जारी केली असून सोमवार १६ सप्टेंबर रोजी ईद-ए-मिलाद या सणाची सुटी असेल असे सर्वांना सूचित केले आहे.

### प्रकाश वीर लोहगांवकर यांचे निधन



**नांदेड**-शहरातील पोर्णिमा नगर येथील रहीवाशी प्रकाश गोपाळराव वीर लोहगावकर यांचे दि. १४ सप्टेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्युसमयी ते ५५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी व मुलगा, तीन भाऊ असा परिवार आहे. विजय लोहगावकर,राजेश लोहगावकर व सामाजिक कार्यकर्ते पवन वीर लोहगावकर यांचे ते बंधू होत.

# मुदखेड तालुक्यातील ४० गावच्या दिड हजार जेष्ठ नागरीकांचे अर्ज समाज कल्यान विभागाकडे दाखल

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड, दि. १५ सप्टेंबर -**
मुख्यमंत्री वयोश्री योजनाचा लाभ मिळवा म्हणून तालुक्यातील चाळीसगावच्या १५०० लाभधारकांनी केले समाज कल्याण कडे अर्ज

मुदखेड तालुक्यातील चाळीस गावच्या १५०० जेष्ठ नागरिकांनी महाराष्ट्र शासनाची नव्याने सुरू झालेली मुख्यमंत्री वयोश्री योजनेचा लाभ घेण्यासाठी समाज कल्याण विभागाकडे माजी नगरसेवक संजय आऊलवार यांच्या मार्गदर्शनाखाली अर्ज सादर केली आहेत.

महाराष्ट्र शासनाने लाडकी बहीण योजनेसह वयोवृद्ध ज्येष्ठ नागरिकांसाठी मुख्यमंत्री वयोश्री योजना मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनाही चालू केली असून या अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांना लाभ मिळवून देण्यासाठी तालुका महामंत्री पुरुषोत्तम चांडक,माजी नगरसेवक तथा भाजपाचे शहर समन्वयक संजय आऊलवार, शहराध्यक्ष संजय सोनटके, शहर महामंत्री, प्रभाकर पांचाळ, माजी नगरसेवक गंगाधर डांगे, सुशिल मुंगल , व त्यांच्या सहकाऱ्यांनी मुदखेड तालुक्यातील चाळीस गावांमध्ये जाऊन जेष्ठ नागरिकांची भेट घेत त्यांच्याकडून सर्व कागदपत्रांची पूर्तता करून घेत अर्ज पूर्ण करून घेतले व नांदेड येथील समाज कल्याण विभागाकडे ही सर्व अर्ज सादर केली आहेत. त्यामुळे संजय आऊलवार यांचे मुदखेड तालुक्यातून मोठे कौतुक होत आहे. यामध्ये मुदखेड तालुक्यातील चिकाळा तांडा पांढरगाव कांमळज निवघा बोरगाव सीता सरेगाव वरदडा तांडा कोल्हा माळकौठा मुगट वाडी नियम तुलापुर हजापूर पिंपळकोठा मगरे न्याहाळी खुजडा डोणगाव मुदखेड पिंपळकोठा चोर वासरी दरेगाव वाडी हजापूर राजवाडी वैजापूर पार्डी मेंडका रोही पिंपळगाव पिंपळगाव तांडा टाकळी होंडा डोरली तांडा शेंबोली ईजळी या गावांसह उमरी तालुक्यातील शेलगाव शिंदी या सह ४० गावातून ज्येष्ठ नागरिकांची अर्ज भरून घेण्यात आली आहे व ही सर्व अर्ज नांदेड समाज कल्याण विभागाकडे सुपूर्द करण्यात आली आहेत. तसेच मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेचे सुद्धा फार्म भरुन देणे चालु आहे . यात मुदखेड शहरातुन गोविंद गड्डमवार, ऋषी पारवेकर, विठ्ठल आचार्य, यांनी ही प्रभागातुन अर्ज करून समाज कल्यानकडे सुपूर्द केली.

# किनवट वासीयांच्या समृद्धीसाठी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांचे गणेशाला साकडे

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. १५ सप्टेंबर -**
किनवट वासीयांच्या समृद्धीसाठी व सनातनी हिंदू धर्मातील तरुणांना व्यसनमुक्त करून सुआरोग्य प्राप्त कावे यासाठी येथील बालकोंडा गल्ली (भोई गल्ली ) येथील श्रीकृष्णा गणेश मंडळात माजी नगराध्यक्षांनी गणेश याग करून प्रार्थना केली .

बालकोंडा गल्ली (भोई गल्ली ) च्या न्यु श्रीकृष्णा गणेश मंडळाची मागील ३५ वर्षाची गणेश उत्सव परंपरा आहे. सनातनी हिंदू धर्मातील तरुण व्यसनाधिन होत आहेत. हे तरूण व्यसनी होऊ नये. किनवट वासीयांच्या समृद्धीसाठी , तरुण व धर्मप्रेमी यांना सुआरोग्य प्राप्त व्हावे, यासाठी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांनी श्री गणेशाला गणेश याग करून प्रार्थना केली. समर्थ भक्त दिनेश कुलकर्णी छ. संभाजीनगर व सहकारी मंडळी व भाविक- भक्तांनी ही पुजा संपन्न केली.



या कार्यक्रमाला आमदार भीमराव केराम, बाबुराव केंद्रे, स्वागत आयनेनीवार, दत्ता आडे, अजय चाडावार , रवि पवार, संतोष राजुरकर , दीपक चाडावार, सुनिल मच्छेवार, मारोती भरकड, आशुतोष नाईक , आशुतोष बेंद्रे, शिवाजी आंधळे, भूमन्ना बल्लेवार, श्रीनिवास गटलेवार, विनोद कर्णेवार, राजु गटलेवार, गणेश बिटेवार, आशीष पवार , गणेश गटलेवार आतिष राजुरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# प्रा. सोनसळे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १५ सप्टेंबर -**
आंबेडकरी चळवळीतील सक्षम युवा नेतृत्व प्रा. राजू सोनसळे यांनी रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा सरसेनापती आनंदराज आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत काल मुंबई येथे रिपब्लिकन सेनेत प्रवेश केला. यावेळी प्रा. सोनसळे यांची नांदेड उत्तर जिल्हा अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. पक्षाचे राष्ट्रीय सचिव संजय बोधनकर, प्रदेश अध्यक्ष काकासाहेब खंबाळकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

नांदेड जिल्ह्यात गेल्या वीस वर्षापासून आंबेडकरी चळवळीत सक्षमपणे काम करणारे युवा नेतृत्व म्हणून प्रा. राजू सोनसळे यांची ओळख आहे. विद्यार्थी दशेपासून आंबेडकरी चळवळीत स्वतःला वाहून घेतलेल्या प्रा. सोनसळे यांनी अनेक आंदोलने उभारली.

# पंचशील हायस्कूलच्या मैदानावर पावसाळी क्रीडा स्पर्धाचे समारोप

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. १५ सप्टेंबर -**
शहरातील पंचशील माध्य व उच्च माध्य विद्यालयाच्या प्रांगणात पावसाळी खो-खो क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या.

या प्रसंगी विद्यालयाचे सचिव सुनील सोनुले,गटशिक्षणाधिकारी किशन फोले,पोलीस निरीक्षक राजेश पुरी,तालुका क्रीडा संयोजक प्रा.अजय चौधरी,निवृत्त क्रीडा संयोजक बळीराम काळे,शाळेचे मुख्याध्यापक , उपमुख्याध्यापक,पर्यवेक्षक,

निवृत्त उपमुख्याध्यापक तथा क्रीडा शिक्षक भारत ताडेवाड आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत मुलांचे एकूण सोळा संघ सहभागी झाले होते त्यात १४ वर्ष वयोगटातील खरटवाडी येथील संघ प्रथम आला असून १७ वर्ष वयोगटात शहरातील पंचशील हायस्कूलचा संघ प्रथम आला तर १९ वर्ष वयोगटात शहरातील विवेकानंद हायस्कूलचा संघ प्रथम आला आहे. मुलिंच्या खो-खो क्रीडा स्पर्धेत १४ वयोगटात खरटवाडी प्रथम तर १७ व १९ वर्ष वयोगटात कोंडबाराव पाटील विद्यालय वाळकी यांनी प्रथम क्रमांक पटकावला. या क्रीडा यशस्वी करण्यासाठी कदम,प्रा.अजय चौधरी, श्रीसागर, संतोष वाकोडे, दत्ता मिराशे, ओकार पवार, तवर,दीपक हूलकानेसह पंचशीलच्या सर्व शिक्षकांनी मोलाचे सहकार्य केले,कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व नियोजन निवृत्त शिक्षक भाऊराव डोरले यांनी केले.

# फ्लॅश आऊट ऑपरेशन अंतर्गत ४५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १५ सप्टेंबर -**
जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या फ्लॅश आऊट ऑपरेशन अंतर्गत जिल्हाभरात विविध ठिकाणी कारवाई सुरु असून, नुकतेच विशेष पथकाने उमरी तळेगाव रोडवर स्वस्त धान्यांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



उमरी तळेगाव मार्गावर वाहनातून धान्याचा काळाबाजार होत असल्याची माहिती मिळाल्यावरुन पोलिसांच्या विशेष पथकाने आयचर ट्रक क्र.एमएच-२६-बीई-७३३७ याची तपासणी केली असता यामध्ये चार लाख रुपये किंमतीचे राशनचे गहू आढळून आले तर ट्रक क्र.एमएच-२६-बीई-७८३५ यामध्ये एक लाख रुपये किंमतीचे तांदुळ आढळून आले. पोलिसांनी धान्य व वाहन असा एकूण ४५ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. हा मुद्देमाल जप्त करुन पुरवठा विभागास कळविण्यात आले आहे. हि कारवाई विशेष पथकातील पोलीस उपनिरीक्षक बी.एम.हालशे, पोका. पी.एम.जुन्ने, एम.बी. कांबळे, बी.डी.लामतुरे, आर.के.मुळे, महाचंद्रमुनी कांबळे, सहायक पोलीस निरीक्षक अंकुश माने, पोलीस उपनिरीक्षक सचिन आरमळ, बी.एम.जाधव, टी.व्ही.केंद्रे, आर.पी.जाधव, ए.व्ही.हैबतकर, अब्दुल रियाज, सय्यद अजमल, दत्तात्रय गुरुपवार यांनी केली.

# अण्णा भाऊ साठेंच्या पुतळ्यास दररोज अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. १५ सप्टेंबर -**
समाज बांधवांच्या वतीने नवीन नांदेड सिडको येथील डॉ. अण्णा भाऊ साठे ह्यांच्या पुतळ्यास दररोज अभिवादन करण्याचा उपक्रम अखंडितपणे सुरु असून १५ सप्टेंबर रोजी या अभिवादन उपक्रमास सहा महिने पूर्ण झाले आहेत. याचे औचित्य साधून नवीन नांदेड सिडको येथील इंदिरा गांधी हायस्कूलचे सहशिक्षक सखारामजी गजले, अण्णा भाऊ साठे पीपल्स फोर्सचे जिल्हाध्यक्ष नामदेव काळे, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी डी.के. डोंपले, अण्णा भाऊ साठे समाज भूषण पुरस्कारप्राप्त आर. जे. वाघमारे आणि प्रा. यशवंत गादेकर यांनी उपस्थित राहून अभिवादन कर्ते बबन बुचडे यांच्या समवेत विशेष रूपाने अभिवादन केले.

# आ. श्यामसुंदर शिंदे यांचे पानशेवडी ग्रामपंचायतवर वर्चस्व कायम

**तभा वृत्तसेवा**
**कंधार, दि. १५ सप्टेंबर -**
कंधार तालुक्यातील मौजे पानशेवडी येथील पूर्वीचे सरपंच सौ. गेनुबाई चव्हाण यांनी राजीनामा दिल्यामुळे सरपंच पद रिक्त झाले होते. त्यामुळे कंधारचे तहसीलदार गोरे यांनी आदेश पारीत करत सरपंच निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला, दि.१२ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मंडळाधिकारी शेख एम. एन.व ग्रामसेवक बालाजी भायेगावे यांच्या प्रमुख उपस्थित ग्रामपंचायत कार्यालय पानशेवडी येथे विशेष बैठक घेण्यात आली, सरपंच पदासाठी श्रीमती उज्वलाबाई मोरे यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे त्यांची बिनविरोध सरपंच म्हणून सर्वांनुमते निवड करण्यात आली.

यावेळी गेनुबाई चव्हाण, कचरूबाई मोरे, ॲड शिवाजी मोरे, चंद्रकांत मोरे, उषा बसवंते, नागीनबाई भालेराव, सुमित्रा नरवडे, हे सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. श्रीमती उज्वला मोरे ह्या आमदार श्यामसुंदर शिंदे व सामाजिक कार्यकर्त्यां

सौ. आशाताई शिंदे यांचे कट्टर समर्थक कोंडीबा मोरे यांच्या त्या मातोश्री आहेत.यावेळी बोलताना नवनिर्वाचित सरपंच श्रीमती उज्वलाबाई मोरे म्हणाल्या की आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या माध्यमातून पानशेवडी गावचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मी कट्टीबंध असल्याचे सांगितले, यावेळी

मोरे यांच्या निवडीचे आमदार श्यामसुंदर शिंदे, सौ.आशाताई शिंदे,लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत दादा शिंदे, आंबड चे तहसीलदार विजय चव्हाण,माजी सभापती ज्ञानेश्वर पा.चोंडे, भगवान पाटील मोरे, जळबा पाटील मोरे आदींनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.


# हे गणराया, राज्यात महाविकास आघाडीचे सरकार येऊ दे!

**तभा वृत्तसेवा**
**माहुर, दि. १५ सप्टेंबर -**
किनवट- माहूर विधानसभेचे माजी आमदार प्रदीप नाईक यांनी भावी राजकारणातील वारस, तरुणाईच्या गळ्यातील ताईत,त्यांचे लाडके पुत्र कपिल नाईक यांचे समवेत तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह माहूर शहरासह तालुक्यातील वाई बाजार,

## माजी आ. प्रदीप नाईक यांचे गणेशाला साकडे

वानोळा आदींसह ग्रामीण भागात स्थापना झालेल्या सार्वजनिक गणेश मंडळांना सहृदयवंदन भेट देत श्रीच्या मुर्तीचे दर्शन घेण्याचा कार्यक्रम सुरू केला असून, दि.१३ रोजी त्यांनी शहरासह ग्रामीण भागातील गणरायाची स्थापना झालेल्या विविध गणेश मंडळांनाभेटी देऊन श्रीचा आशिर्वाद घेतला. यावेळी त्यांनी,हे गणराया !सर्वसामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांना सुखी व समाधानी ठेव ! अशी प्रार्थना करत आगामी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे सरकार येऊ दे! असे श्री चरणी साकडे घातले.

ग्रामीण भागातील नागरिकांतून माजी आमदार प्रदीप नाईक यांचे पुत्र कपिल नाईक यांच्या या स्तुत्य उपक्रमाचे कौतुक होत आहे. माहूर शहरात श्री गणेश भक्तांकडून एकूण १४ ठिकाणी सार्वजनिक मंडळाच्या श्री गणेश मुर्ती शची स्थापना करण्यात आली असून, तालुक्यातील ग्रामीण भागात अनेक ठिकाणी एक गाव एक गणपती या अभिनंदनीय उपक्रमांतर्गत ५४ ठिकाणी श्री गणेश स्थापना करण्यात आलेली आहे.



या सर्व ठिकाणी माजी आमदार प्रदीप नाईक यांचे सह त्यांचे पुत्र कपिल नाईक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे तालुका अध्यक्ष मेघराज जाधव जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष समाधान जाधव,नगराध्यक्ष फिरोज दोसानी, दत्तराव मोहिते, बंडू नाईक,मनोज कीर्तने,विनोद राठोड, बिट्टू जोगदंड यांचेसह नगरसेवक व कार्यकर्ते भेटी देत असून, दिनांक १३ रोजी माहूर शहरातील सर्व गणेश मंडळांना भेटी देण्यात आल्या. यावेळी ब्राह्मण गल्ली येथील नवयुवक गणेश मंडळ येथे भेट दिली असता माजी नाईक यांचा गणेश मंडळाचे सदस्य तथा वृत्तपत्र विक्रेता कृष्णा बेलखोडे,विपुल कान्नव,मंगेश कान्नव,देशपांडे बंधू यांचेसह सर्व मंडळाच्या पदाधिकारी यांच्या वतीने आ. नाईक यांचा सत्कार करण्या आला. माहूर शहरातील सर्व गणेश मंडळांना माजी आमदार प्रदीप नाईक यांनी भेटी दिल्याने नागरिकांतून त्यांचे अभिनंदन होत होते.